
साप्ताहिक
# माणूस
१ जानेवारी ७६ एक रुपया



कोळसा खाणकामगाराचे आयुष्य
किती काळेकुट्ट असावे ?
अकरा कोटी गॅलन पाण्यानेही
धुऊन निघणार नाही इतके !

चासनाला वृत्तान्त : माणूस प्रतिनिधी
पृष्ठ : १३




पीट क्रमांक एक, येथूनच तीनशे पंचाहत्तर कामगार '
खाणीत गेले.



पीट क्रमांक दोन, खाणीच्या परिसरातील
पोलीस बंदोबस्ताची कल्पना यावी.

अपघात होताच ' रेस्क्यू टीम ' धावत आली पण
अपघातच असा विलक्षण की ' हाताची घडी ' घालून
त्यांना स्वस्थ उभे राहावे लागले.



'अँटिगनी' या डॉ. श्रीराम लागू यांनी अनुवादित केलेल्या नाटकासंबंधी एक प्रतिक्रिया 'माणूस' दिनांक १७ जानेवारी अंकात प्रसिद्ध केली होती. ही आणखी एक प्रतिक्रिया....विरुद्ध टोकाची....

# गोष्ट एका राजाची

अशोक प्रभाकर डांगे

परवाच मी एका राजाच्या भेटीला गेलो होतो. राजाच तो. जाताना दडपल्यासारखं वाटणारच. चांगली जवळून मला त्यानं भेट दिली. अगदी दहा-पंधरा फुटांवरून. तसा त्यानं छान भरजरी पोषाख चढवला होता. शिवाय त्याच्याबरोबर त्याचा एक कोवळा सेवक पण होता. म्हटलं असतात तसे एकेकाचे छंद. राजा बसला होता ते आसन एका मोठ्या काळ्या चौकोनी ठोकळ्याचं केलं होतं. त्यालाच आपण त्याचं सिंहासन म्हणायचं. मी चौकशी केली तिथल्याच एका माणसाकडे. तो होता तिथल्या परिस्थितीचा एक सूत्रधार. तो म्हणाला, हा ग्रीस देशाचा राजा आहे आणि याचं नाव राजा क्रिऑन. पुढं सूत्रधार असंही म्हणाला, क्रिऑन इडिपस राजाचाच मेव्हणा. तसा इडिपसराजाही थोडासा ओळखीचाच. म्हणजे तोच की ज्यानं बापाचा खून केला आणि आपल्या आईशी आपला विवाह लावला; पण येवढंच समजून भागलं नाही. आणखीही खूप काही अलगद कळून चुकलं. राजा क्रिऑन चांगलाच अस्वस्थ आहे. तसा तो दिसतच होता. नुकताच सत्तेवर आलेला राजा अस्वस्थतेतं वावरणारच. ती अस्वस्थता कदाचित मोठमोठ्या समस्यांच्या ज्वालामुखीवर बसाव लागल्यानं आली असेल किंवा नसेलही; पण नंतर सूत्रधाराकडून येवढंच कळलं की ही अस्वस्थता सोपी नाहीयेय. ती एका मोठ्या संकटाची जाणवती प्रतिक्रिया आहे येवढंच आणि ते संकटही त्याच्या घरातनंच जन्माला आलंय. राजा क्रिऑन सत्तेवर आलाय तो वंशपरंपरागत सत्ताप्रवाहातला एक दुवा म्हणून नव्हे. नसे त्या सत्तेला दोन सारखे वारस पण होते अगदी कालपरवापर्यंत म्हणजे इडिपस राजा मेल्यावरही. ते होते त्याचेच दोन औरस पुत्र. थोरला इटोक्लीज आणि धाकटा पॉलिनिसस. बाप मेल्यावर त्यांनी गादीवर हक्क सांगणं योग्यच; पण तसं इडिपस मेल्यावरच अशी तडजोड झाली होती की दोघा भावांनी आलटूनपालटून एक एक वर्ष राज्य करायचं; पण सत्तेचाच मोह तो! इटोक्लीजचा मोह न सुटला तरच आश्चर्य. मग स्वाभाविकच त्यानं आपलं सत्तेचं वर्ष भरल्यावरही पॉलिनिससकडे राज्य सोपवायचं नाकारलं. मग पॉलिनिससला आपला डावलला गेलेला हक्क प्रस्थापित करणं भाग पडणारच आणि हक्कासाठी लढणं हाच तर क्षत्रियाचा धर्मच! म्हणूनच इटोक्लीज आणि पॉलिनिसस या दोन भावांत चांगलीच यादवी जुंपली. इडिपसाच्या पोरांचं काहीच चुकलं नाही; पण राजाच्या मुलांतच यादवी माजल्यावर गोंधळ हा उडणारच आणि युद्ध म्हणजे युद्ध. त्याचा शेवट कुणाच्या तरी विजयात व्हायलाच हवा. नाही तर ते निर्णायक कसलं? आणि एकाचा विजय म्हणजे दुसऱ्याचा पराजयच की आणि त्याबरोबर त्या पराभूताचा मृत्यूही तसा अटळच; पण इडिपसाच्या ह्या दोन वारसांच्या यादवीत दोघेही मरून गेले. दुर्दैवानं त्यांचं एकमेकांशीच युद्ध जुंपलं आणि त्या सख्ख्या भावांनी परस्परांच्या उरात तलवारी घुसविल्या आणि मेलेपण अगदी उदात्तपणे एकमेकांच्या शेजारी. त्या दोघांचीही शरीरं घोड्यांच्या टापांनी इतकी तुडवली की त्यांचा मामा क्रिऑनला युद्धभूमीवर त्या प्रेतांची ओळखही पटू शकली नाही. आता इडिपस मेलेला. मग राज्यात पसरलेली यादवी. तिच्यामागून चालत आलेला वारसांचा संहार. हे सगळं नुसतं उघड्या डोळ्यांनी पहात रहाणं इडिपसाचा मेव्हणा क्रिऑनला शक्यच नव्हतं. तसा तो ह्या काळात तटस्थही कधी नव्हताच. त्यानं आपल्या थोरल्या भाचाचीच बाजू तेव्हा तरी उचलून धरली होतीच. त्याचं बळही वाढवलं होतं. म्हणूनच राजा झालेल्या क्रिऑननं इटोक्लिजलाच हीरो बनवून टाकलं. शिवाय लोकांनाही कोणाला तरी वर उचलायला हवं होतंच की. बरं झालं त्यांनाही एक आयताच हीरो पण मिळाला. राजा क्रिऑननं मग थोरल्याचं दफनही शाही इतमामानं केलं. खरं तर त्याला सुद्धा ठाऊक नव्हतं आपण खरं कोणाचं दफन करतोय; पण रणांगणावरनं उचलून आणलेल्या त्या दोघांतल्या एका प्रेतालाच त्यानं इटोक्लिज हे नाव दिलं. आता इटोक्लिजला देशप्रेमी हीरो ठरवल्यावर, पॉलिनिससला देशद्रोही म्हणणं आलंच. कारण तसं ते आपोआपच ठरलं असतं, मग क्रिऑनने तेच केलं. त्यानं देशद्रोही पॉलिनिससचं प्रेत वेशीबाहेर सडत ठेवलं. अगदी कोल्ह्याकुत्र्यांनी खाऊन टाकावं म्हणून.

देशद्रोह्याला दुसरं शासन कोणतं शोभणार? वर राजानं दवंडी पिटवली की पॉलिनिससाठी कोणी रडता कामा नये किंवा त्याच्या प्रेताच्या दफनाचाही प्रयत्न करू नये. तसा नुसता प्रयत्न करणारालाही फासावर जावं लागेल! हे मात्र जरा भयंकरच होतं. वेगळं होतं. राजाचाच हुकूम तो. साऱ्यांनीच

**चासनाला दुर्घटना : आणखी काही छायाचित्रे मलपृष्ठ १ आणि २ वर**

# साप्ताहिक माणूस

**वर्ष पंधरावे – अंक : चौतिसावा**

**३१ जानेवारी १९७६**

**मूल्य : एक रुपया**

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४३४५९


तो अचूक पाळलाही; पण त्याची प्रतिक्रिया मात्र भलतीच झाली. राजाच्या घरातच विरोधाची लाट उभी राहिली. राजाची भाची अँटिगनी त्याच्या विरोधी बोलू लागली आणि आपल्या भावाच्या—पॉलिनिससच्या अंत्यसंस्काराचा प्रयत्न तिनं एकदा नव्हे दोनदा केला. दुसऱ्या वेळी तिनं स्वतःला पकडूनच घेतलं. मामा क्रिऑननं तिला वाचवण्याचा आटोकाट प्रयत्न केला; पण ती बधताना दिसली नाही. कारण अँटिगनीला केवळ मरायचंच होतं. सहाजिकच अँटिगनीला देहांताचीच शिक्षा मिळाली. त्याशिवाय दुसरा पर्याय तिनं क्रिऑनपुढे ठेवलाच नाही आणि ती मेली म्हणूनच तिचा प्रियकर क्रिऑनचाच तरुण मुलगा हिऑन सुद्धा आत्महत्या करून बसला! राजाची कामसू प्रेमळ बायकोनंही गरीब भिकाऱ्यांसाठी विणायला घेतलेल्या स्वेटरची अर्धी ओळ पूर्ण केली आणि खोलीत जाऊन शांतपणे तिने आपला गळा कापून घेतला. एकंदर अखेर राजा क्रिऑनच्या आयुष्याची दुर्दशा उडाली आणि एक ग्रीक शोकांतिका घडली गेली. या साऱ्याचं तसं खरं कारण अँटिगनी; पण मनात पसरत गेला राजा क्रिऑन, त्याच्या सगळ्या व्यक्तिमत्त्वासकट. अँटिगनी ह्या साऱ्या शोकनाट्याची नायिका. ह्या साऱ्या दुर्घटनांचं कारण. म्हणून त्यांची सुरुवात तिच्यापासूनच होते. बाप मेलेला. त्याच्यामागून दोन्ही रक्ताचे भाऊ आपापसात लढून मेलेले. एक सन्मानानं पुरला गेलेला. दुसरा उघड्यावर बेवारशी सडत पडलेला. हिला त्याचा अंत्यविधी करायचाय. जसं तो शिकारीवरून दमूनभागून परत आला असता तर तिनं त्याच्या पायांशी बसून त्याचे बूट काढले असते, सेवा केली असती, बिछाना घातला असता तसंच तो मरून आल्यावर त्याचं विधिवत दफन करणं हेच तिचं पवित्र कर्तव्य आहे असं सुरुवातीला तरी तिला वाटलं. कारण तिची कल्पनाच साधी भाबडी आहे की ज्याचं दफन वगैरे होत नाही, तो अनंत काळपर्यंत पिशाच्च होऊन भटकत रहातो, हीच तिची मूळ धारणा. म्हणून तर आपल्या भावाला मरणोत्तर पिशाच्चयोनीतून वाचवणे हेच तिचं उद्दिष्ट. त्यासाठी विधिपूर्वक मंत्रोपचार, मग प्रेतावर फेकली जाणारी मूठभर सांकेतिक माती हे सारं व्हायलाच हवं; पण मूलतः ही सारीच ढोंगं. परंपरांची देखणी परिणती. नरक, पिशाच्च असल्या गोष्टी सामान्य माणसांना चांगल्याच झपाटतात, भेदरवून सोडतात. त्याच गोष्टी, संस्कार कोणाची सोयही ठरून जातात. म्हणूनच ह्या अर्थशून्य गोष्टी मोठ्या केल्या जातात. आता धर्माचं हे ढोंगही अँटिगनीला मुळीच समजलेलं नाही. किंबहुना ते समजून घेणंच मुळात तिच्या कक्षबाहेरचं आहे. म्हणूनच राजा क्रिऑनचा हा विरोधी युक्तिवाद ती सहज स्वीकारते म्हणजे आपण काय क ीत आहोत याचं भानच अँटिगनीला नाही. तिला संस्कारही पटतात आणि त्यातली व्यर्थताही चटकन पटते आणि मग आपण स्वीकारलेल्या भूमिकेवरून ती खाली उतरताना दिसते. मुळात अँटिगनीला जगणंच स्पष्ट झालेलं नाही. जगातलं बाह्य सौंदर्य म्हणजे जीवन नव्हे म्हणूनच तिला मृत्यूचाही अर्थ उमगलेला नाही आणि तसा तो न उमगल्यानेच तिचा स्वतःचाच गोंधळ उडालेला दिसतो आणि तिची ही माघारही त्याचंच द्योतक ठरते.

आता कर्तव्याला बाजूला ठेवून अँटिगनी नव्या भूमिकेत शिरते. क्रिऑनच तसं तिला भाग पाडतो. हे असतं भावाचं प्रेम. म्हणूनच ती म्हणते की रात्री उशीरा घरी परतलेला पॉलिनिसस तिला गोरापान दिसत होता. फार सुरेख दिसत होता. आल्याबरोबर त्यानं तिला एक सुंदर कागदी फूल दिलं. म्हणाला, 'हे बघ मी तुझ्याकरता काय आणलं ते?' हेच भावाचं प्रेम आता तिला झपाटत रहाते. तशी ह्या प्रेमाबाबतीत ती उदारही नाही. थोरल्या इटोक्लिजला ती दुर्लक्षूनच टाकते. पण इटोक्लिज काय किंवा तिला प्रेमळ वाटणारा पॉलिनिसस काय दोघेही प्रेम करण्याच्या किंवा घेण्याच्याही लायकीचेच नव्हते. पॉलिनिसस जुगारी, दारुड्या, उधळ्या, रंडीबाजवृत्तीचा तर इटोक्लिज तितकाच बदमाश व दारुड्या पॉलिनिसस बापाच्या तोंडात मारण्याइतका निर्दय तर इटोक्लिज बापाच्या खुनाचा प्रयत्न करण्यायेवढा कृतघ्नही होता आणि हे ओळखूनच राजा इडिपसानं दोघांनाही बरीच वर्षं दूर नेऊन ठेवलेलं. त्यांच्यासाठीच तो अखेरपर्यंत झुरला.

पृष्ठ ३१ वर

# मुक्काम पुणे

प्रकाश जोशी

## □ इतिहासाचार्य

भारत इतिहास संशोधन मंडळ व चाफ्याचे फूल.

इतिहास संशोधन मंडळ म्हटले की जुने दस्तऐवज, पोथ्या, नाणी, पत्र व जुन्या कागदांचा सर्वत्र दरवळणारा एक वेगळा दर्प.

पण प्रा. ग. ह. खरे यांना ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या सत्कारसमारंभात चाफ्याचा सुगंध दरवळला.

आपलं सारं आयुष्य भारत इतिहास संशोधन मंडळासाठी खर्च करणाऱ्या खऱ्यांच्या सत्कारसमारंभाला म. म. द. वा. पोतदार अध्यक्षस्थानी असणे हा एक योगच.

म. म. द. वा. पोतदार नेहमीच्या शैलीत बोलले. इतिहास संशोधन मंडळाचा पसारा उभारताना मला ग. ह. खऱ्यांचा फार मोठा आधार वाटला. इतिहाससंशोधनाशी संबंधित भाषाशास्त्र, नाणेशास्त्र, मूर्तिशास्त्र, शिलालेख-अभ्यास या सर्व विषयांत त्यांना गती होती. त्यामुळे मंडळात येणाऱ्या प्रत्येक अभ्यासकाला त्यांच्याकडून काही तरी मिळेल असा विश्वास मला नेहमीच वाटत आला. इतिहाससंशोधनात व्यापक दृष्टी व बिनचूकपणा हवा. खरे यांनी कधीही चालढकल केली नाही किंवा कामात कसूर ठेवली नाही.

पोतदार, ग. ह. खरे यांच्यासारख्या संशोधकांच्यानंतर इतिहास संशोधन मंडळाचे काय होणार अशी भीती व्यक्त करून या लोकांनी शिष्यवर्ग निर्माण करण्याकडे लक्ष द्यावे अशी सूचना एका वक्त्याने सुरुवातीला केली होती. त्याचा समाचार घेताना पोतदार म्हणाले, 'प्रोफेसरलोकांचे काय, ते सभेला कधी नियमित येत नाहीत. ते संशोधन काय करणार ? तशी अपेक्षाही नाही. आमच्यामागे इतिहास संशोधन मंडळाचे काय होईल याची काळजी करू नका. आम्ही मेल्यावर वेळ पडलीच तर भूत होऊन या वास्तूत राहू !"

इतिहास संशोधन मंडळ स्थापन झाल्यावर सुरुवातीला ते तात्यासाहेब बेंद्रे यांच्या घरात होते. मंडळाला स्वतंत्र इमारत असावी म्हणून दारोदार फिरून पैसे गोळा करण्यात आले. आबासाहेब मुजुमदार यांच्या वजनाचा खूप उपयोग झाला.

इतिहास संशोधन मंडळाच्या इमारतीत पहिले पाऊल ठेवतानाची आठवण सांगताना पोतदार म्हणाले, 'त्या वेळी मी लहान होतो. राजवाडे, तात्यासाहेब मेहेंदळे व मी अशा तिघांनी सर्वप्रथम मंडळाच्या इमारतीत पाऊल ठेवले. त्या तिघांपैकी फक्त मीच आता जिवंत राहिलो आहे !'

इतिहास संशोधन मंडळाची इमारत व त्यातील कागदपत्रे हा देशाचा अमोल ठेवा आहे. त्याचा विमा उतरविला गेला नसेल तर तो तातडीने उतरविला पाहिजे अशी सूचना डॉ. न. का. घारपुरे यांनी फक्त पाचच मिनिटे बोलतो असे सांगून बराच वेळ लांबलेल्या भाषणात केली होती. तिचा उल्लेख करून पोतदार म्हणाले, 'मंडळाच्या इमारतीचा विमा उतरविला आहे; पण मंडळाकडे असलेल्या मौल्यवान कागदपत्रांचा विमा कसा उतरविणार ? विमा उतरवयाचा म्हणजे किंमत ठरविली पाहिजे. शिवाजीने पाठविलेल्या पत्राची किंमत एक लाख रुपये आहे असे मला वाटते. आयुर्विमा महामंडळाच्या अधिकाऱ्याला तसे वाटले पाहिजे. समजा त्याने ती किंमत मान्य केली तर त्यावर हप्ता किती बसेल ?'

आयुष्याच्या अखेरपर्यंत अधिक जोमाने व नेटाने इतिहाससंशोधनाचे कार्य करीत रहावे असा उत्साह या सत्कारसमारंभामुळे मिळाल्याचे ग. ह. खरे यांनी आपल्या भाषणात सांगितले. माझ्या चाहत्यांनी व्यक्त केलेल्या अपेक्षांना मी अपुरा पडणार नाही. या समारंभानिमित्त मला आणखीही खूप खूप बोलायचं आहे. या प्रसंगी सगळं बोलून होईल असं वाटत नाही. उरलेल्या भावना मी लेखरूपाने व्यक्त करीन.

जो मनापासून सतत काम करतो, ते काम लोकांना कळले की लोक मदत करतात. त्याला काही कमी पडत नाही असा माझा अनुभव आहे. मी एखादी गोष्ट ठरविली की ती पैशाअभावी अडून राहिली नाही लोकांनी प्रेमाने, आपल्या कुवतीपेक्षासुद्धा अनेक वेळा अधिक मदत केली. मी ५१ साली संशोधक–मित्र–भाग–१ प्रसिद्ध केले तेव्हा लोकांनी मला पंचवीसशे रुपये गोळा करून दिले. त्याच भावनेतून हा समारंभ आयोजित केला असावा असे वाटते.

या समारंभात अनेक विद्यार्थ्यांनी तात्यांच्या गुणग्राहकतेबद्दल, काम करण्याच्या पद्धतीबद्दलचे अनुभव सांगितले. डॉ. कमलाबाई गोखले यांनी तात्यांच्या आठवणी सांगितल्या. त्यांनी आता ऐतिहासिक कागदपत्रे गोळा करीत हिंडून वेळ घालविण्यापेक्षा आजपर्यंत जमा केलेल्या साधनांच्या साहाय्याने वस्तुनिष्ठ इतिहासलेखन करावे अशी इच्छा व्यक्त केली.

राजवाड्यांची परंपरा पुढे चालविणाऱ्या प्रा. खरे यांनी 'इतिहासाचार्य' ही पदवी या प्रसंगी घ्यावी या आचार्य वि. प्र. लिमये यांनी केलेल्या सूचनेचे उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाटात स्वागत केले. आचार्य लिमये म्हणाले, 'राजवाड्यांना इतिहासाचार्य ही पदवी कोणी दिली, केव्हा दिली याची माहिती उपलब्ध नाही. त्याचे संशोधन खरे यांनी करावे.'

तात्यांच्याच इच्छेनुसार त्यांना काम करण्यासाठी १०० वर्षे दीर्घायुरारोग्य लाभो हीच प्रार्थना. ◘

## □ दिल्लीदौरा रेंगाळला

पुणे महापालिकेच्या, निरनिराळ्या समित्यांनी निरनिराळ्या ठिकाणी काढलेले दौरे हे दौरे संपल्यानंतर गाजत. अनेक किस्से रंगत, अफवांचे पीक उठे.

पण प्राथमिक शाळांची पाहणी करण्यासाठी शिक्षण मंडळाने आयोजित केलेला दिल्लीदौरा मात्र सूप वाजण्यापूर्वीच गाजू लागला आहे.

या दिल्लीदौऱ्याचा ठराव १७ डिसेंबरच्या सभेत पब्लिक वादळ निर्माण करून अपूर्णच राहिला. या ठरावाखाली दौऱ्याला, प्रवासासाठी लागणाऱ्या १३ हजार रुपयांच्या खर्चास नामंजुरी देणारी स्थायी–समितीची टीप होती.

हाच ठराव पुन्हा चर्चेसाठी आला आणि अर्धा तास प्रचंड गोंधळ व आरडा-ओरडा घडवून गेला. या ठरावावर काँग्रेस कार्यकर्त्यांनी आणलेल्या हरकतीच्या मुद्द्यावर नागरी आघाडीतील नगरसेवकांना बोलण्याची परवानगी नाकारण्यात आल्याने वीस सेवकांनी सभात्याग केला.

या सभात्यागामुळे कोरम भरला नाही तरी कामकाज चालूच. त्यामुळ सभात्याग करणाऱ्या नगरसेवकांनी प्रेक्षकांची गॅलरी, सभागृहाच्या दारात उभे राहून 'बेकायदेशीर कामकाज करू नका !' 'लोकशाहीचा विजय असो !' अशा घोषणा दिल्या.

त्याला सभागृहातून प्रत्युत्तरे मिळाली. शेवटी कुणी तरी मार्शला बोलावन गॅलरीतील नगरसेवकांना बाहेर काढा अशी मागणी केली. त्याबरोबर घोषणांना ऊत आला. सभापतींनी शिपायाला दार बंद करायल सांगितले. तेवढ्यात गॅलरीतील नगरसेवक आत आले व कोरम भरला.

कोरमअभावी आधी झालेले कामकाज बेकायदेशीर आहे,ते मिनिटस्मधून काढावे असा हरकतीचा मुद्दा भैय्या वैद्य यांनी काढला; परंतु त्यावर चर्चा होण्यापूर्वीच काँग्रेस नगरसेवकाने मांडलेली तहकुबी संमत झाली व दिल्ली-दौरा प्रकरण पुन्हा एकदा रंगाळलं. □




## □ चित्रनगरी

तसा चित्रपटसृष्टीचा व पुण्याचा संबंध जुना आहे. प्रभात स्टुडिओच्या आठवणी फक्त आता शिल्लक राहिल्या आहेत. त्याच जागेत फिल्म इन्स्टिट्यूटने पाय रोवल्याने प्रभातचे जुने अवशेष तरी स्मृती म्हणून मागे उरले आहेत.

पुण्याच्या आसपास अधूनमधून आउट डोअर शूटिंग चालू असते; पण स्टुडिओजची सोय नसल्यामुळे फारसं चित्रीकरण होत नाही. इतक्या विविध सोयी शहरात असताना स्टुडिओज्ची सोय नसावी हे काही खरं नाही.

महापालिकेतील चित्रशौकीन व व्यवहारचतुरांनी पुण्यात 'चित्रनगरी' उभारण्याचा संकल्प सोडला आहे. कात्रजजवळ महापालिकेची १४ एकर जागा पडून आहे. तिचा कसा उपयोग करावा हाच प्रश्न होता; पण चित्रनगरीच्या कल्पनेमुळे तो जवळजवळ सुटला आहे.

पुण्याचे हवामान सिनेतारकांच्या नाजुक प्रकृतीला मानवण्यासारखे आहे. मुंबईही फारशी लांब नाही. पुण्याच्या चित्रनगरीचे सिनेसृष्टीत स्वागत व्हायला हरकत नाही. फिल्म इन्स्टिट्यूटच्या पोरांचीही जवळच्या जवळ सोय होईल. कोर्स पूर्ण करीत असतानाच इंडस्ट्रीतल्या माणसांशी त्यांची ओळख होऊ शकेल. ठराविक साच्यातील सिनेमे काढणाऱ्या निर्मात्या–दिग्दर्शकांना वेळ मिळाल्यास फिल्म आर्काइव्हचे श्री. नायर यांच्या सहकार्याने काही चांगले चित्रपट पाहता येतील.

कात्रजजवळ चित्रनगरी उभारण्याचे धोरण पक्षप्रमुखांच्या बैठकीत ठरल्यावर त्या दृष्टीने हालचाल करणे आलेच. महापौर, पक्षप्रमुख व 'चित्रनगरी'तील तज्ज्ञ लवकरच कात्रजला भेट देणार आहेत. कात्रज येथे चित्रनगरी उभारल्यामुळे बोटिंगसाठी कात्रज तलाव, आउटडोअर शूटिंगसाठी आसपासचे डोंगर, घाट, बोगदा यांचाही चांगला उपयोग करून घेणे शक्य आहे.

या चित्रनगरीसाठी सहकार्य देण्याचे आश्वासन राजकपूरकडून मिळविण्यात मंडळींना यश आले आहे. □

## फिरोदिया करंडक व्हरायटी शो

महाविद्यालयांच्या स्नेहसंमेलनांमध्ये बाहेरचे, 'प्रोफेशनल ऑर्केस्ट्राज्' मागवण्याचं प्रमाण वाढू लागल्याने महाविद्यालयातील उदयोन्मुख कलावंतांची कुचंबणा होत आहे याची जाणीव होऊन 'राष्ट्रीय सहमती मंच : युवक आघाडी'च्या वतीने गेल्या वर्षापासूनच 'फिरोदिया करंडक–व्हरायटी शो कॉम्पिटिशन' नावाची स्पर्धा सुरू करण्यात आली.

दहा तारखेची रमाबाई हॉलमधली संध्याकाळ एका निराळ्याच उत्साही वातावरणाने भरून गेलेली होती. ५–५। पासूनच रंगीबेरंगी कपड्यांनी व चेहऱ्यांनी हॉलला एखाद्या कार्यस्थळाचं स्वरूप आलेलं होतं आणि तसं कार्य होतंही मोठंच. पुण्यातल्या तेरा कॉलेजेस्चे व्हरायटी शोज् आजपासून तीन दिवस इथे साजरे होणार होते.

साडेपाच वाजले...पावणेसहा झाले... सहा... ! तरी उद्घाटक पाहुणे आलेले नव्हते ! 'किशोरकुमार' व 'चोरी चोरी' आलटूनपालटून गात होते. शेवटी सहा वाजून पाच मिनिटांनी समारंभाचे प्रसिद्ध पाहुणे, प्रमुख कथाकार श्री. शंकर पाटील व समारंभाचे अध्यक्ष, स. प. महाविद्यालयाचे प्राचार्य के. पं. मंगळवेढेकर आले. प्रथम संस्थेचे अध्यक्ष श्री. रमाकांत कुलकर्णी यांनी प्रास्ताविक भाषण केलं; पण गर्दीची आज असलं काही ऐकण्याची तयारीच नव्हती. टाळ्या, शिट्ट्या, आरडाओरडा यांनी हॉल मधूनच भरून जात होता. सभेचा नूर ओळखून शंकररावांनीही आपल्या ग्रामीण कथेतला एक किस्सा सांगितला व स्पर्धेचं उद्घाटन झाल्याचं जाहीर केलं. माननीय प्राचार्यांनीही छोटंसं आशीर्वादात्मक भाषण केलं व अवघ्या वीस मिनिटांत सर्व समारंभ संपला. प्रेक्षकांसह सर्वजण या सुखद धक्क्याने भारावून गेले.

निरनिराळ्या तेरा महाविद्यालयांनी सादर केलेल्या या व्हरायटी शोज्मध्ये एक

[ पृष्ठ ९ वर ]

ग्रामीण कर्जमुक्ती, कमाल जमीनधारणेवर मर्यादा व भूहीनांना घरबांधणीसाठी जागा या वीस कलमी कार्यक्रमापैकी पहिल्या तीन कलमांचा विचार गेल्या अंकातील पहिल्या अंकात लेखकाने केला.

पहिली तीन कलमे व या अंकात दिलेली चार ते आठ ही पाच कलमे प्राप्तपरिस्थितीत सुधारणा घडवून आणण्याच्या उद्देशाने कार्यक्रमात समाविष्ट झालेली आहेत. नऊ, दहा व अकरा ही कलमे सामाजिक दुष्प्रवृत्ती आणि अवैध व्यवहार यांविरुद्ध आहेत......

# वीस कलमी कार्यक्रम

लेखांक दुसरा : प्रा. रा. म. बिवलकर

## ४ : वेठबिगारीला बंदी

वेठबिगारी म्हणजे गुलामगिरीची सख्खी बहीण ! सरंमजाशाही अर्थव्यवस्थेचे ते एक व्यवच्छेदक लक्षण ! कर्जाच्या अगर उपकाराच्या ओझ्याखाली जमीनदार, मालगुजार अगर खोता-देशमुखांनी गरीब भूहीनाला अगर अल्पभूधारकाला पिढयान् पिढया पोटावारी राबवणे ही गोष्ट सामाजिक न्यायाची तर नाहीच; पण अमानुष आहे. पंजात अडकवून ठेवलेल्या या मंडळींच्या जीवनातील सर्वस्व—त्यांची बायका-मुले ही सुद्धा आपलीच मालमत्ता आहे अशा थाटात त्यांना वागवणे—राबवणे याला माणुसकी कसे म्हणता येईल ? या देशात वेठबिगारीची पद्धत फार पुरातनकाळापासून जोपासली गेली आणि समाजातील आर्थिकदृष्टचा दुर्बल आणि जातिदृष्टचा शूद्र ठरविलेल्या मंडळींची ससेहोलपट सबल घटक करीत आले. स्वातंत्र्योत्तरकाळात मालगुजाऱ्या—जमीनदाऱ्या नष्ट झाल्या, तत्पूर्वी खोतीहक्क, देशमुखी वतने हीही संपुष्टात आली. अलीकडे राजेरजवाडे, संस्थानिकही सामान्य नागरिकांच्या पंक्तीला आले. त्यामुळे वेठबिगार खूपच कमी झाली यात शंका नाही. तरीपण अधिकार म्हणून, धनको म्हणून, जुनी खानदानी संपली नाही म्हणून अजूनही या देशातील लाखो दुर्बल मंडळी वेठबिगार करीत आहेत. कारण वेठबिगारीची समस्या खूपच गुंतागुंतीची आहे. वेठबिगारीची माहिती मिळणे कठीण होते. नावापुरते नोकरनामे लिहून घेऊन सुटका होते. दडपणाखाली, जुलूम-जबरदस्तीच्या भयाने पिळले जाणारे तसे सांगायला तयार नसतात. तयार झाले व त्यामुळे वेठबिगारीतील शिळी-कोरडी अर्धी भाकरी गेली तर करायचे काय ? रोजगार कोण देणार ? ही न सुटणारी प्रश्नचिन्हे.

वीस कलमी कार्यक्रमाने सर्व राज्यांत वेठबिगार बेकायदेशीर ठरविली जाईल असे म्हटले. ज्या करारनाम्यात वेठबिगाराची सेवा अंतर्भूत आहे असे सर्व प्रकारचे करार अवैध ठरवले जातील असे जाहीर केले तरी कागदावरचे करार आणि प्रत्यक्ष वागणूक यात जिथे महदंतर असते तिथे वेठबिगार खणून काढणे शासनालाही कठीण !

पंतप्रधानांच्या कार्यक्रमाला केरळ राज्याने त्वरित प्रतिसाद दिला आहे. त्या विधानसभेने वेठबिगारीला बंदी करणारे विधेयक मंजूर केले आहे. त्यामुळे बेरोजगार होणाऱ्यांसाठी 'कल्याणनिधि' उभारला आहे. इतर अनेक राज्ये मात्र 'आमच्या राज्यात वेठबिगार कुठे चालतच नाही !' असा दावा करून या कलमाबाबत अजूनही स्वस्थ आहेत. वास्तविक ज्या राज्यात लाखो आदिवासी आहेत, भूहीन मजूर आहेत, अल्पभूधारक शेतकरी आहेत तिथे छुप्या स्वरूपात वेठबिगार व्यवस्थित चालू आहे; पण ती उकरून काढायची तर राजकारण आड येते अगर कुणाचे मिरासदारी हक्क संपुष्टात येतात. लाखोंनी बंधमुक्त होणे या मूठभरांना मंजूर नाही !

म्हणूनच केंद्रशासनाने परवा २४ ऑक्टोबर रोजी राष्ट्रपतींच्या नावे वेठबिगारीला सर्व राज्यांत बंदी करणारा वटहुकूम काढला. महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, केरळ, ओरिसा, उ. प्रदेश व कर्नाटक या राज्यांनी यापूर्वीच वेठबिगारी नाहीशी केल्याचा दावा असला तरी वेठबिगारीचा प्रश्न सर्व देशांचा आणि त्याबाबतची उपाययोजना सर्वत्र सारखी असावी हा या वटहुकुमाचा हेतू आहे.

या वटहुकुमान्वये वेठबिगारी—पद्धतीचा अवलंब करणे हा आता फौजदारी गुन्हा झाला आहे. वटहुकुमाच्या तरतुदी अशा :

(१) वेठबिगारी—पद्धतीच्या संबंधात कारागृहात असलेल्या मजुरांची तात्काळ सुटका होईल.

(२) सावकाराने वेठबिगार—मजुरास घरातून हुसकावून दिले असेल तर त्या सबडिव्हिजनचा एक्झिक्यूटिव्ह मॅजिस्ट्रेट ते घर त्याला परत मिळवून देईल.

(३) वेठबिगार—मजूर वा त्याच्या कुटुंबातील एखाद्या व्यक्तीची मालमत्ता, कर्जवसुलीसाठी सावकाराने बळजबरीने बळकावली असेल तर ती त्यास परत करण्यात येईल.

(४) या वटहुकुमातील कोणत्याही बाबीसंबंधीचा विचार करण्याचे अधिकारक्षेत्र कोणत्याही सिव्हिल कोर्टाला राहाणार नाही.

(५) जिल्हा व सबडिव्हिजनल पातळीवर दक्षतासमिती स्थापन करण्याची तरतूद या वटहुकुमात आहे. ही समिती वरील आदेशांची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांना सल्ला देईल. बंधमुक्त मजुरांचे आर्थिक पुनर्वसन करण्याकडेही ही समिती लक्ष देईल.

ज्या राज्यांनी वेठबिगारबंदी वटहुकूम याआधीच काढले असतील त्यातील वेगळे भाग अगर कलमे केंद्रीय वटहुकुमान्वये रद्द ठरली

आहेत. वटहुकुमातील तरतुदींचा भंग करणाऱ्यास २ हजार रु. दंड अगर ३ वर्षे सक्तमजुरी अगर दोन्हीही, अशी शिक्षा भोगावी लागेल. या वटहुकुमाने भारतात शतकानुशतके चालत आलेला सामाजिक कलंक धुऊन काढण्याचा प्रयत्न होत आहे ही गोष्ट अभिनंदनीय आहे. भारत स्वतंत्र झाला तेवढा भारत बंधमुक्त झाला याचा आनंद सर्वांना व्हावा.

वेठबिगारांची सर्व कर्जे आता रद्द झाली आहेत व जुन्या कर्ज-वसुलीसाठी जारी केलेल्या जप्त्याही आता रद्द ठरल्या आहेत. वेठ-बिगाराची कोर्टाच्या ताब्यातील मालमत्ताही त्याला परत मिळेल.

सरकारचा वटहुकूम अधिकाऱ्यांनी नेकीने अंमलात आणला पाहिजे आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी अधिकाऱ्यांशी संपूर्ण सहकार्य करायला हवे. बंधमुक्त वेठबिगारांच्या रोजगारीचा प्रश्न भेडसावणारा खराच; पण सरकारने त्याकरताही तातडीने पावले उचलली पाहिजेत.

## ५ : शेतमजुरांना किमान वेतन

१९४८ सालच्या किमान वेतन कायद्याने, जम्मू आणि काश्मीर-व्यतिरिक्त भारतातील सर्व राज्यांतील शेतमजुरांचे किमान वेतन ठरवून द्यावे असे ठरविले; पण महाराष्ट्र आणि तामिळनाड या राज्यांनी काही विशिष्ट भागातील शेतमजुरांची किमान मजुरी ठरवून दिली आणि केंद्रसरकारने आपल्या अखत्यारीखालील कृषि-संस्थांतील व लष्करी शेतातील मजुरांची मजुरी ठरवून दिली या-पलीकडे इतर राज्यांनी किमान वेतन कायद्याची फारशी दखल घेतलेली दिसत नाही.

कृषिमजूर संघटित नाही. देशभर विखुरलेला आहे. कृषि हा विषय राज्यांच्या कक्षेतला आहे. देशातील बहुविध राज्यसरकारे श्रीमंत शेतकऱ्यांची आहेत अगर त्यांच्या वजनाखाली आहेत. अशा अनेक कारणांमुळे त्यांच्या किमान वेतनाचा प्रश्न आजवर कुठेच धसास लागला नाही. औद्योगिक मजुरांची मजुरी उपभोक्त्यांच्या किंमतनिर्देशांकाशी जोडून त्यांना वाढत्या महागाईपासून संरक्षण दिले जाते आणि शेतमजूर मात्र उघडा पडावा यात न्याय नाही. अन्नधान्याच्या आणि शेतीजन्य औद्योगिक कच्च्या मालाच्या वाढत्या किंमतींमुळे शेतीतील उत्पन्ने वाढती आहेत हे खरे असले तरी किमान वेतन कायद्याअभावी भूमिहीन शेतमजुरांना त्याचा फायदा मिळण्याऐवजी महागाईच्या आचीने अंग भाजून घ्यावे लागते. शेत-मजुरीचे दर ठरवून दिले तर कृषिउत्पादनमूल्य वाढून शेतमालाच्या भडकत्या किंमतीत तुपाची धार पडेल, हा किमान वेतनदर ठर-विण्याला विरोध करणाऱ्या श्रीमंत शेतकऱ्यांचा दावा खरा नाही. शेतीउत्पन्नावर कर नसल्याने अगर अत्यल्प असल्याने श्रीमंत शेतकरी गबर झाल्याचे दाखले दिसत असताना शेतमजुरीचे दर ठरविल्याने उत्पादनखर्चात वाढ झाली तरी शेतमालाच्या किंमती भडकण्याची आवश्यकता नाही ! जादा वेतन मिळू लागले तर अन्नधान्य आणि कापडचोपडादी इतर वस्तूंची ग्रामीण भागातील मागणी वाढून आज शहरांना होणारा अन्नधान्यपुरवठा घटण्याची शक्यता नाकारता येणार नाही; पण जमीनवाटप, कसणुकीची शाश्वती, शेतकऱ्यांना कर्ज, उत्तम बी-बियाणे, खते यांचा पुरवठा इत्यादी मार्गांनी शेत-मालाचे उत्पादन वाढवून ग्रामीण आणि शहरी मागणीचा समतोल साधणे शक्य व्हावे.

महाराष्ट्रराज्याने शहरी भागात रु. ४·५०, निमशहरी भागात रु. ३·७५ व ग्रामीण भागात रु. ३/– अशी किमान शेतमजुरी २४ मार्च १९७४ पासून ठरवून दिली आहे. वाढत्या महागाईच्या संदर्भात शेतमजुराला दोन वेळा पुरेसे खायला घालायलाही ती समर्थ नाही ही गोष्ट लक्षात घेता याबाबत अधिक व्यवहारी निराळे धोरण शासनाने स्वीकारले पाहिजे असे सुचवावेसे वाटते.

## ६ : मध्यमवर्गीयांना दिलासा !

नोकरदार वा घरमालक यांसारख्या स्थिर उत्पन्न असलेल्या मध्यम-वर्गीयांना वाढत्या महागाईची झळ विशेष जाणवते. किंमती वाढल्या की त्यांचे उत्पन्न उलट प्रमाणात घटत असल्यामुळे स्थिर उत्पन्न गटातील मध्यमवर्गीयांचे हाल कुत्रा खात नाही ! अशा लोकांना दिलासा देण्यासाठी करमाफ उत्पन्न ६ हजारांवरून ८ हजारांवर नेण्यात आले. या सवलतीचा फायदा सुमारे ८ लाख करदात्यांना मिळणार असून, सरकारला कर–उत्पन्नात ४५ कोटी रुपये खोट येणार आहे. यातून वार्षिक ८००१ रुपये उत्पन्न असणाऱ्यांना २८४ रु. चा फायदा मिळणार असून १५ हजारपेक्षा अधिक उत्पन्न-गटातील मंडळींनाही ४४ रु. इतका फायदा मिळेल. आवश्यक वस्तूंच्या किंमती स्थिर राहिल्या तर आयकरातील ही सूट बचत म्हणून ठेवली जाण्याची शक्यता आहे. किंमती उतरल्या तर बचत वाढण्याचीही शक्यता आहे. नाही तर मध्यमवर्गीयांच्या खर्चाची तोंड-मिळवणी करायलाही ही सवलत पुरणार नाही. करमुक्त उत्पन्न वाढ-वले गेले तरी व्यवसाय–कर डोक्यावर बसल्यामुळे या सवलतीने मध्यमवर्गीयांना हवा तसा दिलासा मुळीच मिळालेला नाही. महागाई-भत्ता मूळ पगारात मिळवून दाखवलेली प्राध्यापकांची नवी वेतनश्रेणी; त्यांतच परीक्षांची उत्पन्नेही सामावलेली आहेत असे म्हणून, तो उत्पन्न प्राध्यापकांना नाकारणाऱ्या सरकारी आदेशाने, एका हाताने दिले त्या-पेक्षाही दुसऱ्या हाताने अधिक छिनावून घेतले असे जसे झाले, तीच स्थिती वाढत्या महागाईमुळे आणि व्यवसाय–करामुळे आयकरातील सुटीची झाली आहे! मध्यमवर्गीयांना तीमुळे कितीसा दिलासा मिळणार ?

## ७ : विद्यार्थ्यांना दिलासा !

ग्रामीण भागातून येणाऱ्या बुद्धिमान पण गरीब विद्यार्थ्यांना शहरातील महाविद्यालयातून अगर विद्यापीठांतून उच्च शिक्षण घेणे आजकाल फारच कठीण झाले आहे. या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खर्च कमी व्हावा या दृष्टीने विद्यार्थ्यांची वसतिगृहे व भोजनालये यांना आवश्यक अशा वस्तूंचा पुरवठा ग्राहक–सहकार–भांडारांमार्फत करण्याची योजना पंतप्रधानांच्या वीस–सूत्री कार्यक्रमात अंतर्भूत आहे. या योजनेखाली एक लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या सर्व शहरांचा समावेश होणार असून शिवाय सर्व विद्यापीठे आणि डिग्री. कॉलेजेस् यांच्या वसतिगृहांचाही त्यात अंतर्भाव होईल. तामिळनाड राज्यातील काही भागात आणि केंद्रशासित दिल्लीत या प्रयोगाची सुरुवात झाली आहे. इतर राज्यांनी ही योजना मनावर घेतलेली दिसत नाही. या योजनेची महत्त्वाची वैशिष्ट्ये अशी–

१. ग्राहक–सहकारी भांडारे, विद्यापीठे आणि महाविद्यालये यांच्या वसतिगृहांना आवश्यक वस्तूंचा पुरवठा सवलतीच्या दराने,

अग्रक्रमाने करतील.

२. आवश्यक वस्तूंत अन्न–धान्य, डाळी, मसाला, वनस्पती, गोडेतेल, चहा, कॉफी, धुण्याचा व अंगाला लावण्याचा साबू, साखर, पाव, अंडी, लोणी, मीठ, कापड, होजियरी-वस्तू, सायकलींचे टायर्स व ट्यूब्ज्, कागद, स्टेशनरी वस्तू, वह्या, बॅटरीसेल्स् इत्यादी गोष्टींचा समावेश असेल. यांत पाठ्यपुस्तकांचा समावेश करण्याचाही विचार आहे.

३. जिथे विद्यापीठाचे अगर महाविद्यालयाचे सहकारी दुकान नसेल तिथे संबंधित सहकारी भांडार विद्यापीठाचे अगर कॉलेजचे आवारात आपली शाखा काढील.

४. अशा भांडारासाठी विद्यापीठाने अगर महाविद्यालयाने योग्य ती जागा, नाममात्र भाड्याने उपलब्ध करून द्यावी आणि इतर सुविधा पुरवाव्यात.

विद्यार्थ्यांना आवश्यक असलेल्या वस्तूंच्या किमती सख्तपणे नियंत्रित राहतील.

उत्तरप्रदेश सरकारने पाठ्यपुस्तके व शिफारशित ग्रंथ यांच्या किमती ठरवून दिल्या आहेत. आंध्र प्रदेश सरकारने १३३ तालुक्यांच्या गावी विद्यार्थ्यांसाठी भांडारे उघडण्याचे निश्चित केले आहे. सर्व शैक्षणिक संस्थांतून व वसतिगृहांतून अशी भांडारे उघडण्याचे व तिथे पाठ्यपुस्तके व स्टेशनरी रास्त भावाने उपलब्ध करून देण्याचेही त्या सरकारने ठरविले आहे.

देशभर उच्च शिक्षणार्थी विद्यार्थ्यांना तरी वरील सोई उपलब्ध झाल्यास विद्यार्थ्यांचा शिक्षणावरील खर्च कमी होईल यात शंका नाही; पण ही सगळी योजना सहकारी-ग्राहक-भांडाराच्या प्रामाणिकपणावर व नेकीवर अवलंबून आहे. या देशातील सहकारी भांडारांचा अनुभव फारसा उत्साहजनक नाही. त्यामुळेच योजनेच्या यशासंबंधी विसंवादी पाल मनी चुकचुकल्याशिवाय राहत नाही !

## ८ : शहरातील जागांचे समाजीकरण

देशातील शहरे वाढत आहेत. गर्दी खेचत आहेत. त्यामुळे तिथला निवासी जागांचा प्रश्न दिवसेंदिवस भयंकर स्वरूप धारण करीत आहे. पागडचांचा आकडा आकाशाला भिडला आहे. सामान्य गरीब व मध्यमवर्गीयांचे जीवन झोपडपट्ट्यांतून अगर चाळींच्या खुराड्यांतून व्यतीत होत आहे. यातून अनैतिकता वाढणे, गुन्हेगारी बळावणे क्रमप्राप्तच. काळा पैसावाल्यांनी जागांच्या टंचाईचा फायदा घेऊन त्यातून गडगंज संपत्ती मिळवली आहे. शहरातील रिकाम्या जागांवर स्पेक्युलेशन चालते. समुद्र हटवून, जंगलतोड करून, दलदलीचे भाग भरून अधिक जागा उपलब्ध झाल्या तर त्यावर गगनचुंबी स्कायस्क्रेपर्स उभे राहतात, श्रीमंताचे चोचले भागविणाऱ्या चैनी उभ्या राहतात. गरीब मात्र झोपडपट्ट्या वाढवीत राहतात. मध्यमवर्गीय दोन दोन, तीन तीन कुटुंबे एका खोलीत गुजराण करतात. ही विषमता संपवावी, शहरात गर्दी करणाऱ्या पोटभरू सामान्यांचे जीवन थोडेफार सुसह्य करावे या हेतूने, शहरातील रिकाम्या जागांचे समाजीकरण करावे, मालकी हक्कांवर मर्यादा घालाव्यात. शहरी व शहरीकरण होण्यालायक जमिनी ताब्यात घ्याव्यात, नव्या इमारतींतील भाडेकरूंची पाहणी करावी, शक्यतो निवासी जागांचे न्याय्य वाटप करावे या गोष्टी वीस कलमी कार्यक्रमात अंतर्भूत करण्यात आल्या.

केंद्रसरकारने वटहुकूम काढून अजून या गोष्टी केल्या नाहीत; पण रिकाम्या जमिनीचा ताबा व मालकी यावर कमालधारणा ठरविणारा, जादा जमीन संपादन करणारा, नव्या इमारतींची प्लिथ-एरिया मर्यादित करणारा आणि शहरी व शहरीकरण योग्य जमिनींचे समाजीकरण करणारा कायदा त्वरित अंमलात आणण्याचा केंद्रीय शासनाचा विचार आहे. असा कायदा झाला की, शहरी जागांबाबत चालणारे 'स्पेक्युलेशन' बंद पडेल. मोठ्या शहरातील जागांच्या आकाशाला भिडलेल्या किमती उतरतील. जमिनीला भरमसाठ किमती मोजून त्यावर उभारली जाणारी अलीशान बांधकामे विविध मार्गांनी निर्माण होणाऱ्या काळ्या पैशांतून केली जातात, हे आता उघडे गुपित ठरले आहे. शहरी जागांचे समाजीकरण या अवैध गोष्टींना आळा घालील. घरबांधणी मंदावेल, घरांचा व निवासी जागांचा प्रश्न काही काळ अधिक तीव्रही होईल; पण सरकारने मोठ्या प्रमाणावर घरबांधणी योजना आखून तो सोडविताही येईल.

महाराष्ट्र राज्यात शहरी घरबांधणीवर निर्बंध घालणारा कायदा होता; पण १९५७ साली घरबांधणीला उत्तेजन देण्यासाठी तो रद्द केला गेला. कायदा रद्द करण्याचा हेतू साध्य झाला. मुंबईसारख्या शहरात हजारो इमारती क्षितिजरेषा भंगून भराभर उठल्याही ! पण त्या साऱ्या श्रीमंतांच्या हौशी–मौजी भागविणाऱ्या ! सामान्य माणसांना त्यात इंचभरही जागा मिळाली नाही. म्हणून आता महाराष्ट्र सरकारने या कलमाची अंमलबजावणी त्वरित करण्यासाठी दि. ११–११–७५ रोजी एक नवा वटहुकूम जारी केला आहे. शहरातील मोकळ्या जमिनींचा अनधिकृत वापर करणारांना आता चांगलाच पायबंद बसेल.

## ९ : तस्करीविरोधी मोहीम

स्वातंत्र्योत्तरकाळात, सोने, उंची कापड, अत्तरे, चैनीच्या वस्तू, मद्ये, घड्याळे, फ्रीज, टेपरेकॉर्डर्स अशा अनेक वस्तूंची फार मोठ्या प्रमाणात चोरटी आयात होत होती व आहे ही गोष्ट गुपित राहिलेली नाही. समाजातील उच्च थरांतील अनेक मंडळी या व्यवसायाशी संबंधित असल्यामुळे चोरट्या आयातदारांचे काम सुलभ होत असे. त्यांच्या मूठदाबीला सवकलेले जकातअधिकारी जशी साथ देत तशी राजकारणी मंडळीही त्यांना पाठीशी घालतात अशी वदंता होती. या धंद्यामुळे परकीय चलनाचा फार मोठा ओघ जो वैध मार्गांनी या देशात यायला हवा होता तो अवैध धंद्याकडे फिरवला गेल्याने या देशाचे फार नुकसान संभवत होते. संबंधी मंडळी कोट्याधीश बनत होती. त्यांचे अलीशान राजवाडे, फाइव्ह स्टार हॉटेले, राजविलासी सिनेमाथिएटरे मोठमोठ्या शहरांतून उठत होती. उच्च स्तरावरील अनैतिकतेला जणू उधाण आले होते. देशातील सांपत्तिक विषमता दिवसेंदिवस वाढत होती. काळ्या पैशाची प्रतिअर्थव्यवस्था अस्तित्वात येऊन हा भस्मासुर शासनाच्याच डोक्यावर हात ठेवू पाहत होता. पंतप्रधानांना याची जाणीव असली तरी त्याविरुद्ध हात उचलणे मोठे कठीण झाले होते. तरीही धीराने पावले उचलून

' कन्झर्व्हेशन ऑफ फॉरिन एक्स्चेंज अँण्ड प्रिव्हेन्शन ऑफ स्मगलिंग अॅक्टिव्हिटीज अॅक्ट ' लोकसभेत मंजूर करून, कस्टम्स् अॅक्टाची प्रामाणिकपणे अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेऊन देशभर अनेक तस्कर-बादशहांना पकडण्याची मोहीम त्यांनी सुरू केली. अनेकांना पकडले. अनेक भूमिगत झाले. पकडले ते कायद्याच्या तांत्रिक मुद्द्यावर परत मुक्त झाले. तस्करीला आळा बसला तरी तिचे समूळ उच्चाटन करण्याच्या दृष्टीने आणखी जालीम उपाय हवे होते. घटनेतील ' स्वातंत्र्ये ' आड येत होती. आणीबाणी जाहीर झाल्यावर १ जुलै रोजी जाहीर केलेल्या २० सूत्री कार्यक्रमात तस्करीविरोधी मोहिमेला महत्त्वाचे स्थान मिळाले. या सूत्रानुसार तस्करांची मालमत्ता आता जप्त होत आहे. तस्करांनी दुसऱ्या कुणाच्या नावे दाखविलेली मालमत्ताही उकरून काढून जप्त होत आहे. अवैध व्यवहारांतून निर्माण झालेली संपत्ती तस्करांच्या नातेवाइकांनाही उपभोगता येऊ नये, त्यातून नवे तस्कर निर्माण होऊ नयेत म्हणून ही उपाययोजना.

आता अनेक तस्कर तुरुंगाच्या गजाआड पुन्हा गेले आहेत. पळून गेलेल्यांची मालमत्ता सरकारजमा झाली आहे आणि होत आहे. अशी मालमत्ता हुडकून काढण्याकरता सरकारी अधिकारी ठिकठिकाणी छापे घालीत आहेत.

चोरटी आयात करण्याकरता लागणारे परकीय चलन, परकीय प्रवासी, भारतातील नातेवाइकांना परदेशांतून पैसे पाठवू इच्छिणारे भारतीय नागरिक, आयात जादा दाखवणारे व निर्यात कमी दाखवणारे व्यापारी, भारतातून चोरट्या मार्गाने बाहेर जाणारे मौल्यवान धातू, कलाकुसरीच्या वस्तू, कित्येकदा तांदूळ-डाळींसारखे जिन्नस या मार्गाने मिळत असे. कोटचवधी रुपयांचे परकीय चलन असे अवैध व्यवहारात गुंतत असे. तस्करी-उद्योगात हजार-पाचशे कोटी रुपयांची उलाढाल प्रतिवर्षी चालत असली पाहिजे, याची खात्री तस्करीविरोधी मोहिमेचे फलित म्हणता येईल असे हे आकडे पाहून यावी. अर्थराज्यमंत्री ना. मुखर्जी यांनी ते नुकतेच जाहीर केले. तस्करीविरोधी मोहिमेने गती घेतल्यापासून दरमहा जादा २० कोटी रुपये विनिमय बँकांद्वारे देशात येऊ लागले आहेत. एप्रिल १९७५ ते जुलैअखेरच्या चार महिन्यांत एकूण ३१३ कोटी रु. देशात आले. गतवर्षी याच काळातला हा आकडा १९६ कोटी रु. होता. १९७४–७५ सालात, परदेशी चलनाचा अवैध धंदा करणाऱ्या २२३० ठिकाणी सरकारी अधिकाऱ्यांनी धाडी घातल्या. यंदा एप्रिल ते जुलैअखेरच्या चार महिन्यांत १०२३ धाडी घातल्या गेल्या. अशा धाडींतून या चार महिन्यांत भारतीय चलनातील १९·४२ कोटी रुपये व परदेशी चलनातील ७·४१ कोटी रुपये सरकारने हस्तगत केले. रिझर्व्ह बँकेने अलीकडे केरळ राज्यातील दोन जिल्ह्यांची जी पाहणी केली त्यावरून सरकारने ' मिसा 'खाली तस्करांविरुद्ध मोहीम सुरू केल्यानंतर त्या जिल्ह्यांत वैधमार्गांनी येणाऱ्या परकीय चलनाचा ओघ वाढल्याचे दिसून आले आहे. खेडोपाडींही मुक्तपणे विकला जाणारा ' दोन ' नंबरचा माल आता कुठे दिसत नाही. तो ' गुप्त ' झाला असे म्हणण्याऐवजी त्याचा ओघच खंडित झाला असे म्हणणे अधिक सयुक्तिक होईल.

## १० : आयात-परवान्याच्या गैरवापराला आळा

वीस कलमी कार्यक्रमाने आणखी एका अवैध व्यवहाराला चांगलीच खीळ घातली. पाच वार्षिक विकास योजना सुविहीतपणे साकार करण्याकरता परवान्याविना नवे उद्योग सुरू करण्यावर बंदी आली. गेल्या २५ वर्षांत उद्योग-परवाने कसे दिले गेले, त्यामुळे विकासकार्यक्रमांची चोंदी कशी झाली, देशातील बड्या उद्योग-घराण्यांनी आपल्या फायद्यासाठी त्या योजना कशा राबवल्या, उद्योग-परवान्याबाबत मिळालेल्या आयात-परवान्यांचा कसा गैरवापर केला ही सारी सुरस आणि चमत्कारिक कथा ' सुविमल दत्त समिती 'ने आपल्या अहवालात साद्यंत आणि साधार वर्णिली आहे. त्याला आता ५–६ वर्षे होऊन गेली. आयात-परवान्याबाबतचा काळाबाजार अनेक प्रकरणांतून उघडकीस आलेला आहे. नव्या भांडवलगुंतवणुकीच्या दृष्टीने तर आयात-परवान्यांची पद्धत अडचणीची ठरलीच; पण तिने अनेक अवैध आणि विकासयोजना-बाह्य गोष्टींना उत्तेजन दिले. या देशाचे आयात–निर्यात धोरण अनेकदा आयात–निर्यातदारांच्या फायद्याच्या दृष्टीने राबवले गेले. ही परिस्थिती बदलावी, आयात–निर्यातक्षेत्रातील अनागोंदी संपावी या दृष्टीने आयात–निर्यात–नियमात योग्य ते बदल करून त्यांची कडक अंमलबजावणी करण्याचे शासनाने ठरविले आहे. आयात–निर्यात-नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर त्वरित खटले भरले जातील. दंड, शिक्षा, आयातमालाची जप्ती अशा विविध मार्गांनी या क्षेत्रात शिस्त निर्माण्याचा हेतू या निर्णयामागे आहे. गेल्या ४ महिन्यांत तो खूपसा साध्य झाला आहे.

## ११ : करचुकव्यांना हादरा !

कर-आकारणीतील समता आणि न्याय या तत्त्वांना धाब्यावर बसविणारी करचुकवेगिरी हे देशाच्या आर्थिक व्यवस्थेतील एक अरिष्टच म्हटले पाहिजे. करचुकवेगिरीने या देशात विषमता पोसली. अन्याय वाढवला. अवैध उद्योग आणि व्यवसाय यांना चालना दिली. अमाप काळ्या पैशाची प्रतिअर्थव्यवस्था इथे निर्माण केली. त्यामुळे शासनाच्या हाती पत आणि पैसा नियंत्रित करणारी जी साधने आहेत तीच सारी बोथट होऊन आर्थिक अराजकसमान परिस्थिती इथे निर्माण झाली. लोकशाहीत अनुस्यूत असलेल्या स्वातंत्र्याच्या गैरवापरामुळे हे शक्य झाले आणि लोकशाहीत निर्माण झालेल्या मिरासदाऱ्यांनी त्याला खतपाणी घातले.

याला कारणे अनेक. या देशातील सीमांत करदर अतिभारी आहे. अतिभारी करदराची नीती इंग्लंडात जन्मली आणि आमच्या करनीतीने आजवर इंग्लंडचाच कित्ता गिरवला. परिणामतः करउत्पन्न वाढते त्यापेक्षा कितीतरी बुडवले जाते. या देशातील करवसुली-यंत्रणा अकार्यक्षम आहे आणि लाचलुचपतीने बरबटलेली आहे व करचुकवेगिरीला प्रोत्साहन देणारी आहे हे अनेकांनी अनेकदा स्पष्ट केले आहे. या देशातील सामाजिक नीतिमत्ता जवळजवळ रसातळाला गेली आहे, ही रोजच्या अनुभवातली गोष्ट आहे. करचुकव्यांशी सोयरसुतक जमविलेली राजकारणी मंडळी या गोष्टींकडे अगदी परवा परवा आणीबाणी जाहीर होईपर्यंत दुर्लक्ष करीत आली आहेत ही स्वतःसिद्ध गोष्ट आहे. या देशाची करसंहिता चुकवेगिरीला

आणि बुडवेगिरीला पुष्कळच सोयीची आहे, हे अनेकदा सांगितले गेलेले सत्य आहे.

त्यामुळे चुकवेगिरीला आळा घालण्याचे अनेक प्रयत्न अनेकदा होऊन गेले. चुकवलेले उत्पन्न जाहीर करा, कर कमी आकारू. शिक्षा-दंड करणार नाही. चुकवलेले उत्पन्न सामाजिक महत्त्वाच्या संस्थांना देणग्या म्हणून द्या, पैसा कुठून आणलात विचारणार नाही. सर्व घोषणा झाल्या. करसंहितेत जुजबी सुधारणा करून झाल्या. १९७० साली वांछू समितीनेही सीमांत करदर कमी करण्याची, प्रा. कॅल्डर यांच्याप्रमाणेच सूचना केली, तोही प्रयत्न सरकार करू इच्छित आहे; पण चुकवेगिरी हटत नाही.

वीस कलमी कार्यक्रमाने आता करचुकव्यांविरुद्ध 'डायरेक्ट ॲक्शन' आरंभली आहे. कर चुकवून निर्माण झालेला काळा पैसा अलिशान घरे, चैनी वस्तू, सोने, रुपे, जवाहीर, जमीनखरेदी, काळे व्यवहार, अवैध धंदे यात गुंतवलेला आढळतो. सरकारने करचुकव्यांच्या अलिशान बंगल्यांवर आयकर अधिकाऱ्यांमार्फत मोठ्या प्रमाणावर, धाडी घालायला सुरुवात केली आहे. मुंबई, दिल्ली, मद्रास, कलकत्ता अशा बड्या शहरांतून, अशा धाडींतून कोट्यवधी रुपयांची बेहिशेबी संपत्ती उजेडात आली आहे. हिमनगाप्रमाणे हा प्रकाशात आलेला भाग अगदीच अल्प असावा, पाण्याखाली खूप भाग अजून आहे याची जाणीव शासनाला आली आहे. आर्थिक गुन्हेगारीविरुद्ध कडक उपाय योजणारे कायदे तयार करण्याचे सरकारने ठरवले आहे. यांतून चुकवेगिरीला आळा बसावा, काळा पैसा उकरला जावा, अत्यावश्यक वस्तूंची साठेबाजी व काळाबाजार यांना आळा बसावा अशी रास्त अपेक्षा आहे. सरकारने वातावरण चांगले तयार केल्यामुळे प्रत्यक्ष करांच्या उत्पन्नात एप्रिल ७५ ते जुलैअखेर या ४ महिन्यांत २१·८ टक्के वाढ झाल्याचे दिसून आले आहे. जास्तीत जास्त लोकांना करजाळ्यात पकडण्याचे सरकारी प्रयत्न यशस्वी झाले आहेत. त्या दृष्टीने सारा देश विंचरून काढला जात आहे. १९७४–७५ साली १ लक्ष ३३ हजार नव्या आयकरदात्यांना आणि २७७० नव्या संपत्तिकरदात्यांना 'कर भरा' नोटिसा मिळाल्या. त्यामुळे जी घबराट पसरली त्यामुळे १ लक्ष ८ हजार व्यावसायिकांनी, आपणहून आपली उत्पन्न–पत्रके, आयकर-अधिकाऱ्यांच्या स्वाधीन केली आहेत. वीस कलमी कार्यक्रमाचे हे यशच म्हटले पाहिजे. जुलै ते ऑक्टोबर ७५ अखेरच्या ४ महिन्यांत करउत्पन्न १४० कोटी रुपयांनी वाढले, हेही नसे थोडके ! □

[ लेखांक तिसरा : पुढील अंकी ]

---

## पुणे वार्ता : पृष्ठ ४ वरून

गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती अशी की 'व्हरायटी शो'ची स्पर्धा असूनही या महाविद्यालयांनी तीस मिनिटांत जे काही सादर केले त्यात 'व्हरायटी' फारच कमी होती. बऱ्याच महाविद्यालयांनी या एवढ्या वेळात फक्त संगीताचे किंवा सिनेसंगीताचे ऑर्केस्ट्राच सादर केले. तसंच या गायन-वादन-ऑर्केस्ट्रामध्ये एक गंमत पहायला मिळाली ती अशी की, कोणत्याही कॉलेजचे साथीदार कोणत्याही कॉलेजला तबला-पेटी किंवा इतर वाद्यांसाठी साथ करत होते. एका कॉलेजचे पेटीवादक तर किमान ४५–५० वर्षांचे असावेत. हे योग्य नव्हे. कारण मग जर स्पर्धेच्या दृष्टिकोनातून पाहिलं तर असा 'व्हरायटी शो' म्हणजे फक्त त्याच कॉलेजातल्या कलागुणांचा आविष्कार होऊ शकणार नाही. तोंडाने म्हटल्या गेलेल्या किंवा वाद्यांवर वाजवलेल्या गाण्यांच्या संदर्भात कलाकारांनी शब्दांशी व चालीशी अधिक इमान राखायला हवं होतं असं वाटलं.

लहान एकांकिका, नाट्यछटा किंवा नकला या कार्यक्रमांमधून अभावानेच पहायला मिळाल्या; पण तरीही त्यांचा दर्जा समाधानकारक होता. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा नृत्याशीही हल्ली फारसा संबंध राहिलेला नाही की काय (अर्थात, गणपती शिमगा सोडून) अशी शंका या कार्यक्रमांवरून आली. कारण तेरा कार्यक्रमांमध्ये मिळून फक्त तीनच नृत्यं व एक समूह-नृत्य सादर झालं. नृत्याची जोपासना विद्यार्थिनींकडून अधिक केली जावी हे खरंच आहे; पण विद्यार्थीसुद्धा उत्तम समूह-नृत्य सादर करू शकतात आणि पारितोषिकेही मिळवू शकतात हे ज्यांनी कोपरगावचा 'युवक महोत्सव' पाहिला असेल त्यांच्या लक्षात येईल.

या व्हरायटी शोज्‌मध्ये काव्यवाचन आणि मराठी शेर-शायरीही झाली; पण श्रोतेच हे ऐकायला तयार नव्हते. तसंच दोन कार्यक्रमांच्यामध्ये केलं जाणारं निवेदनही अशा प्रकारच्या कार्यक्रमात प्रत्यक्ष आयटेम्‌इतकंच महत्त्वाचं असतं. या स्पर्धेत मराठी, हिन्दी व इंग्लिश अशा तिन्ही भाषांमधून निवेदनं झाली; पण निवेदनातली चमक फारच कमी वाटली. काही ठिकाणी निवेदनाची भाषा चांगली होती; पण सर्वच निवेदन पडद्याआडून झाल्यामुळे ते फारसं 'इफेक्टिव्ह' होऊ शकलं नाही.

अशा 'व्हरायटी शोज्'चं यशापयश बऱ्याच वेळा प्रेक्षकांच्या किंवा श्रोत्यांच्या प्रतिसादावरून ठरवलं जातं; पण या स्पर्धेच्या बाबतीत जर ह्यावरून मोजमाप करायचं झालं तर मोठीच पंचाईत होईल. कारण इथे आलेले बहुतेक महाविद्यालयीन तरुण हे आगामी कालात आपापल्या कॉलेजमध्ये होणाऱ्या 'गॅदरिंग'ची 'पूर्वतयारी' किंवा 'रंगीत तालीम' करण्यासाठीच आल्यासारखे वाटत होते. चांगल्या किंवा वाईट कोणत्याही कार्यक्रमाला ते सारखीच वागणूक देत होते. काही वेळा तर कलाकारांच्या अंगावर पैसे फेकणे, बाण मारणे, यांसारखे हीन व निंद्य प्रकार घडले. संयोजक आणि स्वयंसेवकही याबाबतीत आवाहनापलीकडे फारसं काहीच करू शकत नव्हते. त्यामुळे कोणत्याच कॉलेजचा कार्यक्रम संपूर्ण शांततेत आणि योग्य त्या प्रतिसादात पार पडू शकला नाही. याचं प्रमुख कारण हॉलमध्ये उपलब्ध असलेल्या आसनव्यवस्थेच्या संख्येपेक्षा अधिक प्रेक्षक हॉलमध्ये सोडलं जाणं हे होतं. पुढील वर्षी स्पर्धा आखताना संयोजकांनी या प्रकाराचो गंभीर दखल घ्यावी. अन्यथा उदयोन्मुख कलाकारांना उत्तेजन देणं हा या स्पर्धेचा मुख्य उद्देशच फसेल. कारण यामुळे यंदा बऱ्याच स्पर्धक कलाकारांचा तक्रारीचा सूर होता.

या स्पर्धेचा निकाल स्पर्धा झाल्यानंतर चार दिवसांनी लागला. इंजिनियरिंग कॉलेजचा प्रथम क्रमांक येऊन त्यांनी फिरोदिया करंडक मिळवला. वाडिया कॉलेजचा दुसरा क्रमांक आला, तर तिसरं स्थान श्री शाहू कॉलेज व स. प. महाविद्यालाने विभागून मिळालं. विद्यार्थ्यांची या निकालाबाबतची प्रतिक्रिया बऱ्याच अंशी समाधानकारक होती.

—सतीश कामत

## प्रगतिपथावरील राष्ट्र

# अधिक आराम, जास्त वेग यांच्या दिशेने-



भारतीय रेल्वेकडून रोज 10 हजारावर गाड्या सोडण्यांत येतात: त्यांत, दूरवरचा प्रवास करणाऱ्या दुसऱ्या वर्गाच्या प्रवाश्यांसाठी झोपण्याची सोय असलेले 2,570 डबे (शयनयानें) असतात ! तसेंच सगळीकडे गाड्यांची जा-ये देखील अगदी वेळेबरहुकूम असते. मालगाड्यांकडून रोज 5.5 लाख टन मालाची — अत्यावश्यक पुरवठा वस्तूंची — वाहतूक होत असते.

रेल्वे-वाहतूकींत सुधारणा करण्यास तुम्हीहि हातभार लावूं शकाल. विनातिकिट प्रवासाला, आणि रेल्वे — मालमत्तेच्या भुरट्या चोऱ्यांना आळा घाला.

**वज्रनिर्धार आणि कठोर परिश्रम हेच आपल्याला तारतील**

davp 75/455

# अर्धी चड्डी :

## एक बेपत्ता प्रावरण

सध्या सर्वत्र साफसफाईची लाट आली आहे. राजकारणात नेहमी कुणी तरी कुणाला सफाईने साफ करण्याच्या उद्योगात असते. तशी ही साफसफाई नाही. ही साफसफाई म्हणजे जी रोज केल्याशिवाय आपल्या घराचे घरपण टिकत नाही–तशी साफसफाई. नुकतीच पुण्याच्या पर्वती लेण्याची अशी साफसफाई टप्प्याटप्प्याने सुरू झालेली आहे, असे नुकतेच आम्हाला कळले.

पुण्यातील एका महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी हे काम अंगिकारले असून कामाचा पहिला टप्पा पुराही झाला आहे. दुसऱ्या टप्प्याचे काम विद्यार्थी–विद्यार्थिनी प्रत्यक्ष करीत असताना त्यांचे एक छायाचित्र पुण्याच्या एका दैनिकात प्रसिद्ध झालेले आम्ही पाहिले. यावरून साफसफाई ही केवळ कागदोपत्री नसून, कागदोपत्री नमूद होण्याजोगी आहे, हे आमच्या लक्षात आले. महाविद्यालयांतील 'राष्ट्रीय सेवा योजने'च्या शाखेने हा अभिनंदनीय उपक्रम केलेला असून सफाईकार्याला बरीच गती आली आहे.

प्रसिद्ध झालेल्या छायाचित्रात सुमारे ८–१० विद्यार्थिनी व ७–८ विद्यार्थी काम करताना दिसतात व एक प्राध्यापक-सदस्य गृहस्थ दूर उभे राहून हे कार्य पाहत आहेत असे दिसते ! एका राष्ट्रीय सेवायोजनेचे हे कार्य असूनही वृत्तपत्रांनी त्याची दखल घेतली याबद्दल वृत्तपत्रांच्या संपादकांचेही आम्ही अभिनंदन करतो. कारण सेवा दोन प्रकारची मंडळी करतात. पुढारी सेवाच करतात आणि स्वयंसेवकही सेवाच करतात. परंतु यात जमीन–अस्मानाचे अंतर असतं. सेवा करणारा पुढारी उर्मट असला, मूर्ख असला, अहंमन्य असला, जातीय असला, संधिसाधू असला तरी तो जे काही करतो ती सेवा असल्याने, त्याला सर्व गुन्हे माफ असतात. त्याला हारतुरे व मानसन्मान व प्रसिद्धी विनासायास मिळते; परंतु स्वयंसेवक हा स्वतःच सेवा करण्यासाठी निघालेला असल्याने, तो नम्र, मितभाषी, सेवाभावी, मानसन्मानाची अपेक्षा न करणारा असाच असावा लागतो. देशात कुठे धरणीकंप झाला, दुष्काळ पडला, धरण फुटले, रक्तदानाची गरज लागली तर स्वयंसेवकानंच तन-मन-धन विसरून सेवाभावी राहावे व समाजापासून फक्त कृतघ्नपणाचीच अपेक्षा ठेवून पुनः सेवा करण्याची संधी कधी येते याची वाट पाहायची असते असा प्रचलित रिवाज असल्याने, साफसफाईसाठी पुढे आलेल्या स्वयंसेवकांचे कौतुक करण्याचा पायंडा वृत्तपत्रांनी पाडावा याबद्दल वृत्तपत्रांचेही अभिनंदन करणे योग्य होईल. त्यांचे धाडस कौतुकास्पद आहे.

परंतु या सेवारत मंडळींची छबी पाहताच आम्हाला एक गोष्ट फार खटकली. तंग तुमानी आणि बुशकोट घालून ही मंडळी लेण्यातला गाळ काढणे, दगड-माती वाहणे, वगैरे कामे करीत होती. वस्तुतः ही प्रावरण हा सेवेचा गणवेष नसून, कॉलेजच्या तासाला वा वाचनालयात बसण्यावेळी घालावयाचा तो पोषाख होय. अशी प्रावरणे घालून फक्त हिंदी सिनेमातले नायकच खेडोपाडी काम करताना दिसतात. कारण तिथे सेवा महत्त्वाची नसून, चांगले दिसणे व प्रेम करणे महत्त्वाचे असते. त्यांना आम्ही दोष देत नाही–कारण चांगले दिसण्याबद्दलच त्यांना पैसे मिळतात. प्रेम करणे हा मुख्य विषय असतो. श्रम, सेवा आणि अर्धी चड्डी यांचे नाते अतूट आहे. कैदी–पोलीस आणि स्वयंसेवक हे अर्धी चड्डी घातल्याशिवाय जातिवंत वाटत नाहीत. कैदी हे केलेल्या पातकांचे, पोलीस हे शासनाचे आणि स्वयंसेवक हे स्वतःवर लादलेल्या देशसेवेच्या अहंकाराचे नम्र गुलाम असतात आणि काही गुलामांनी अर्धी चड्डी घातल्याखेरीज, मालकाला सुटलेल्या पोटाला झाकणारी पायघोळ धोतरे नेसता येत नाहीत !

तेव्हा महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना जर खरोखरच श्रमसेवा करायची असेल, श्रमदान करायचे असेल तर त्यांनी प्रथम अर्ध्या चड्ड्या घालणे अतिशय आवश्यक आहे. यामुळे वस्त्रांचा खर्च निमपट होऊन, काम दुप्पट होईल यात आम्हाला शंका नाही ! पूर्वी राष्ट्रसेवादलाची मुले, रा. स्व. संघाची मुले आणि इतर सेवामार्गी तरुण अर्ध्या चड्ड्या घालीत असत. या मंडळींच्या चड्ड्या तूर्त कुणीच वापरीत नसल्याने पडून आहेत. जर श्रमसेवाभावी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी या चड्ड्या मिळवल्या तर त्यांचेही काम होईल व चड्ड्याही कारणी लागतील.

ही प्रावरणे अर्धेच अंग झाकीत असली तरी ती बेपत्ता राहणे कुणाच्याच हिताचे नाही !

—आदित्यदास

# फ्रान्स

## नव्या बंडाचे हादरे

वा. दा. रानडे

फ्रान्समध्ये १९६८ साली सार्वत्रिक संपाच्या लाटेने द गोल सरकारच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाला होता; पण सरकारविरोधी शक्तींची एकजूट कायम न राहिल्याने त्या वेळची क्रांती यशस्वी झाली नाही. दोन महिन्यांपूर्वी फ्रान्समध्ये एका नव्या बंडाची लाट आली. १९६८ एवढा त्याचा जोर नाही व तितके ते सार्वत्रिक किंवा व्यापक नसले तरी लष्कर आणि न्यायसंस्था या प्रस्थापित सत्तेचे मोठ्या आधारस्तंभांना त्याने हादरा दिला.

बर्लिफ लॉरी वर्क्स कारखान्यात झालेल्या अपघातात दोन कामगार मरण पावले. मॅनेजरच्या हलगर्जीपणामुळे हे घडले असा अभिप्राय व्यक्त करून लियाँ येथील एका कोर्टाने त्या मॅनेजराला कारावासाची शिक्षा दिली. ही काही अशा प्रकारची पहिलीच शिक्षा नव्हे. गेल्या काही महिन्यांत देशभर न्यायालयांनी अशाच प्रकारचे निकाल दिलेले आहेत. आतापर्यंतची प्रथा अशी की अशा प्रकरणात केवळ संशयावरून कामगाराला शिक्षा होई आणि मालकाने कमालीचा निष्काळजीपणा दाखविलेला असला तरी तो निर्दोषी सुटे; पण ही प्रथा आता बदलायची असे 'मॅजिस्ट्रेटस् युनियन' या न्यायमूर्तींच्या संघटनेने ठरविले. वर उल्लेखलेल्या निकालासारखे निकाल न्यायमूर्ती निर्भयपणे देऊ लागले. न्यायमूर्तींची ही संघटना १९६८ साली स्थापन झाली.

या निर्णयांनी सत्ताधाऱ्यांच्या गोटात खळबळ उडाली. न्यायमूर्ती हे काही इतर सनदी नोकरांसारखे नोकर नव्हेत. त्यांना युनियन काढण्यास बंदी करावी. न्यायमूर्ती राजकारणातील अमले पाहिजेत असे विल फ्रेंच नॅशनल असेंब्लीच्या एका सभासदाने असेंब्लीकडे पाठविले; पण या हालचालींमुळे खचून न जाता न्यायमूर्तींच्या संघटनेने आपले

आठवे अधिवेशन भरविले. न्यायमूर्तींना राजकारणापासून अलिप्त राहता येणार नाही. समाजातील वास्तवतेचे प्रतिबिंब न्यायसंस्थेतही पडणे अपरिहार्य आहे. त्यामुळे न्यायदान ही एक राजकीय कृतीच (पोलिटिकल अॅक्ट ) असते अशी भूमिका मांडणारा ठराव अधिवेशनात पास झाला. कामगाराच्या शब्दाला मालकाच्या शब्दाइतकेच महत्त्व जेथे राहील अशी न्यायालये स्थापन झाली पाहिजेत हा या संघटनेचा उद्देश आहे. तिचे सभासद फारसे नाहीत; पण संघटनेच्या मतांचा प्रभाव तिचे सभासद नसलेल्या न्यायमूर्तींवर पडू लागला आहे. वर ज्या निकालाचा उल्लेख केला तो देणारे न्यायमूर्ती काही या संघटनेचे सभासद नाहीत.

सैनिकांचे मनोधैर्य खचेल असा प्रचार केल्याचा आरोप पंधरा सैनिकांवर एका स्पेशल सिक्युरिटी कोर्टात ठेवण्यात आला व त्यांना शिक्षा झाली. सैनिकांच्या बराकीतून त्यांच्या बेकायदा संघटना स्थापण्यात येत आहेत. बंडाला प्रवृत्त करणारी पत्रके वाटण्यात येत आहेत. अशा हालचालींविरुद्ध सरकार योजणार असलेल्या उपायांपैकी हे पहिले पाऊल आहे असे गृहमंत्र्यांनी या खटल्यासंबंधी बोलताना सांगितले.

न्यायमूर्तींच्या संघटनेने स्पेशल सिक्युरिटी कोर्टाच्या या निर्णयावर आपल्या अधिवेशनात टीका केली. विरोधकांना दडपून टाकण्यासाठी आणि सैनिकांमध्ये व इतर नागरिकांमध्ये मतप्रकटनाच्या स्वातंत्र्याला खीळ घालण्यासाठी या कोर्टाचा उपयोग करण्यात येत आहे असे ठरावात म्हटले होते. कायदा व सुव्यवस्थेच्या नावाने कामगारसंघटनांच्या कार्यकर्त्यांवर जे हेतुपूर्वक हल्ले केले जात आहेत त्याचा त्यात निषेध केला.

सैनिकांच्या तक्रारी व गाऱ्हाणी दूर करण्यासाठी कोणत्या स्वरूपाची यंत्रणा असावी या प्रश्नावर सध्याचा संघर्ष निर्माण झाला आहे. लष्करात वर्ष-दीड वर्षापूर्वी ज्या सुधारणा करण्यात आल्या त्यानुसार सैनिकांची गाऱ्हाणी ऐकण्यासाठी कमिशन्स नेमण्यास परवानगी देण्यात आली; पण कमिटया नेमण्यास मात्र नकार देण्यात आला. कमिशन्सऐवजी कमिटया असाव्यात अशी सैनिकांची मागणी आहे. कमिशन्स अधिकारी नेमतात व फार मर्यादित क्षेत्रातील प्रश्नच कमिशन्सपुढे मांडता येतात. उलट कमिटयांचे सभासद सैनिकांमधून निवडलेले असतात आणि बराकीतील जीवनाशी संबंधित सर्व प्रश्नांची चर्चा तेथे करता येते. पश्चिम जर्मनी, स्वीडन व इतर काही देशांतील लष्करात अशा कमिटया असतात. फ्रान्समध्येही तसेच करावे असे या मागणीच्या पुरस्कर्त्यांचे म्हणणे. नुसती मागणी करूनच न थांबता गेल्या दोन वर्षांत अशा अनेक बेकायदा समित्या स्थापन करण्यात आल्या. यात आपण काही विध्वंसक करीत आहोत असे या कमिटयांच्या सभासदांना वाटत नाही. समाजवादी पक्षाचा या कमिटयांना पाठिंबा आहे. पोर्तुगाल व जर्मनीतून आलेल्या सैनिकांच्या प्रेरणेनेही काही कमिटया स्थापन झाल्या आहेत.

लष्करात सुधारणा करून अशा कमिटया नेमण्याचे समर्थन करणारी गुप्त पत्रके वाटण्यात येत आहेत; पण तेवढयावरच न थांबता काही पत्रकांत बंडाची चिथावणी दिली जात आहे. ' तुमची शस्त्रे नीट चालवायला शिका! एक दिवस ती तुम्हाला तुमचे अधिकारी, मालक आणि ज्या समाजरचनेचे ते रक्षण करीत आहेत त्या समाजरचनेविरुद्ध वापरावी लागतील, ' असे एका पत्रकात म्हटले होते. तर ' आम्हाला अखेर लष्कर नष्ट करायचं आहे! ' असे दुसऱ्या एका पत्रकात म्हटले होते. अशा बातम्या आहेत.

लष्कराला अशी बंडाची चिथावणी देणारांविरुद्ध कडक कारवाई करण्यात येत आहे. या प्रकाराची झळ लष्कराच्या फारच थोडया भागास लागलेली आहे हे संरक्षणमंत्री जनरल बिगार्ड यांनी मान्य केले. लष्करात ऐंशी बेकायदा कमिटया स्थापन करण्यात आल्या. त्यांपैकी वीस विसर्जित करण्यात आल्या. साठ अजून अस्तित्वात आहेत. आमच्या लष्करी पथकांपैकी फक्त एकदशांश पथकांत कमिटया आहेत. एक कमिटी फक्त साडेचार टक्के सैनिकांचे म्हणजे (४८० जणांचे) प्रतिनिधित्व करते व ते हा सारा गोंधळ निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे असे त्यांनी सांगितले.

लष्करात कमिटया स्थापन करणारांविरुद्ध नुसतीच कारवाई करून न थांबता सरकारने त्याला मोठी प्रसिद्धी दिली. त्यामागे राजकीय उद्देश आहे. समाजवादी पक्षाविरुद्ध सरकारचा मुख्यतः रोख आहे. लष्करातील असंतोषाचे खापर आमच्यावर फोडून आम्हाला बदनाम करण्याचा हा प्रयत्न आहे असे समाजवादी नेत्यांचे म्हणणे आहे. समाजवादी पक्षाचे बळ वाढत असल्याने त्याच्याविरुद्ध ही प्रचारमोहीम सुरू करण्यात आली आहे. मार्सेयचे समाजवादी मेयर गॅस्टाँ डेफरे याबाबत बोलताना म्हणाले, ' आम्हाला लोकांचा पाठिंबा वाढत आहे तेव्हा स्वाभाविकच आम्ही एक नंबरचे लक्ष्य झालो आहोत. पोटनिवडणुकांत समाजवाद्यांना मिळालेले विजय लक्षात घेता भावी निवडणुकांत सरकार स्थापण्याइतके यश ते मिळवितील असे वाटू लागले आहे. त्यांची प्रक्रिया डागळण्याच्या उद्देशानेच त्यांच्याविरुद्ध ही प्रचारमोहीम सुरू करण्यात आली आहे असे त्यांना वाटते.

समाजवाद्यांच्या भूमिकेचा विपर्यास करण्यात आला आहे. कमिटयांच्या स्थापनेचा पुरस्कार करताना सैनिकांच्या किरकोळ गाऱ्हाण्यांची दाद अशा कमिटयांमार्फत लागावी एवढाच त्याचा मर्यादित उद्देश आहे. ' अधिकाऱ्यांचे हुकूम पाळू नका 'अशी बंडाची चिथावणी त्यांनी दिलेली नाही. कामगार संघटनांच्या धर्तीवर सैनिकांच्या संघटना असाव्यात अशी कम्युनिस्ट रेव्होल्यूशनरी लीगसारख्या काही कम्युनिस्ट गटांची व कामगार संघटना कार्यकर्त्यांची भूमिका आहे. त्याला समाजवाद्यांनी मुळीच पाठिंबा दिलेला नाही हे लक्षात घेतले पाहिजे. केवळ कमिशन्स नेमण्याचा सध्याचा उपाय अपुरा आहे. कामगारसंघटनांच्या धर्तीवर सैनिकांच्या संघटना स्थापण्याने लष्कराच्या शिस्तीस बाध येईल तेव्हा कमिटया स्थापणे हाच सैनिकांच्या न्याय्य गाऱ्हाण्यांची दाद लावण्याचा योग्य मार्ग आहे. यात कोठेही बंडाला, बेशिस्तीला चिथावणी नाही अशी समाजवाद्यांची भूमिका आहे.

फ्रान्समधील या घडामोडींसंबंधी आपल्याकडील वृत्तपत्रांत काहीच बातम्या आलेल्या नाहीत. तेथील राजकारणातल्या या नव्या प्रश्नांची व प्रवाहांची कल्पना यावी एवढयाच उद्देशाने ही माहिती दिली आहे. □ □

एक आठवडा माणूस प्रतिनिधी म्हणून अनिल बर्वे धनबाद-चासनाला या भागात वावरले. मजुरांना-अधिकाऱ्यांना भेटले. या भेटीगाठीतून व पाहण्यातून तयार झालेला हा चासनाला दुर्घटनेचा वृत्तान्त....

# अकरा कोटी गॅलन पाणी

प्रेषितांचे पाय मातीचे असतात.

तसेच पोलादाचेही पाय कोळशाचे असतात.

पोलादाशिवाय राष्ट्राची उन्नती नाही.

पण कोळशाशिवाय पोलादाची निर्मितीही नाही !

तेल आणि कोळसा ही जगातली प्रमुख इंधने.

यात कोळशाचा वाटा पंच्याऐंशी टक्के !

तेलाच्या झारीत अरब शुक्राचार्य अडले;

कोळशाचे महत्त्व पुन्हा वाढले.

मोहनकुमार मंगलम् कोळशाला राष्ट्राचे 'हृदय' म्हणत.

विनाकारण निश्चितच नाही.

असा हा कोळसा.

आपण वखारीत कधी पाहिला असेल तो दगडी कोळसा.

निसर्गाची देणगी, विपुल पण दुर्मिळही.

विपुल अशासाठी की, ती विपुल आहे.

भारतातच दोनशे अब्ज टन कोळसा आहे.

पण दुर्मिळ अशासाठी की,

तो निर्माण व्हायला सहा सहा लाख वर्षे लागतात.

अंदाधुंदपणे कोळशाचा सत्यानाश केला...

तर तो पुन्हा निर्माण करता येत नाही.

असो.

एकंदरीतच हा कोळशाच्या नशिबाचा ललाटलेख आहे की काय कोणास ठाऊक;

पण कोळसा जाळणारे सोन्याचा धूर काढतात.

—आणि कोळसा खणणारे स्वतःचा जीव जाळतात !

लाकडाचा कोळसा करणाऱ्या भट्टीत काम करणाऱ्या कातोडयांचे आयुष्य अंधारे होते.

तुम्हा-आम्हास ऐकून माहीत आहे.

दगडी कोळशाच्या खाणीत काम करणाऱ्या मजुरांचेही आयुष्य काळेकुट्ट आहे.

किती काळेकुट्ट ?

इतके... इतके... इतके की,

अकरा कोटी गॅलन पाण्यानेही धुऊन निघणार नाही.

चासनाला खाणअपघात,

तीनशेपंच्याहत्तर मजूर जिवानिशी गेले,

अकरा कोटी गॅलन पाण्याने...

रशियन पंप येताहेत; पोलीश पंप आले आहेत.

अमेरिकेनेही पंप देऊ केलेत.

चासनाला खाणीतले पाणी उपसण्यासाठी.

पाणीही काही थोडेथोडके नव्हे;

अकरा कोटी गॅलन पाणी !

अकरा कोटी गॅलन पाणी म्हणजे ?

—म्हणजे तीनशे पंच्याहत्तर मजूर !

बिलकुल चूक;

अकरा कोटी गॅलन पाणी म्हणजे ?

चार लाख कोळसा खाणकामगार;

सतत मृत्यूच्या छायेत.

चासनाला अपघाताच्या आधी दहा दिवस...

चिनाकुरी कोलीयरीत छत कोसळून तीन ठार... दोन जखमी.

...मग चासनाला ?

तीनशे पंच्याहत्तर अनधिकृतपणे ठार;

अनधिकृत अशासाठी की;

अधिकृतपणे अजून प्रेते हाती लागलेली नाहीत.

चासनाला घटनेला अजून बारा दिवस नाही लोटले...

...सितलपूर कोलीयरीत छत कोसळून एक ठार;

दुर्घटनेची चौकशी चालू आहे.

छत कोसळते; स्फोट होतात; आगी लागतात; पाणी भरते;

मजूर मरतात.

मजूर मेले की... मग ती दुर्घटना ठरते.

दुर्घटनेची चौकशी चालू होते.

चला...

हेही काही कमी नव्हे.

निष्कर्ष निघोत, ना निघोत;

दुर्घटनेनंतर चौकशी तर होते आहे !

अशीच चौकशी करायला मीही निघतो आहे.

' माणूस 'च्या वाचकांसाठी, ' माणूस प्रतिनिधी ' म्हणून
माझ्या चौकशीतून निष्पन्न काय होणार ?
...तसे काहीच नाही.
पण निदान ' माणूस 'च्या वाचकांना तरी कळेल;
ज्या महानगरातून ते राहतात...
औद्योगिक जीवनाचे लाभ घेतात;
ते जीवन निर्मिणारे; कोळसा खाणकामगार,
साध्या ' माणुसकीच्या ' आयुष्याला वंचित आहेत.
त्यांचे दुःखही जळून गेले आहे.
आणि अश्रू आटून गेले आहेत.
...बरे झाले आटून गेले;
खरेच जर वाहिले असते तर ?
...तर साचले असते जलाशयाएवढे;
अकरा कोटी गॅलन पाण्याएवढे !
¤


विहार...
दलितांना शोषून प्रेषितांना जन्माला घालणारी भूमी.
गौतमीपुत्राला दलितांच्या दुःखाचा कळवळा आला. त्याने एक धर्म स्थापन केला; तो भगवान बुद्ध झाला.
राजपुत्र वर्धमानानेही गोरगरिबांचा कैवार घेतला;
त्याने एक धर्म स्थापन केला; तो महावीर जैन झाला.
मौर्य सम्राटाने लढाई मारली; रक्ताचे पाट वाहविले; त्याला पश्चात्ताप झाला; तो देवांना प्रिय राजा अशोक झाला.
अगदी अलीकडे म्हणजे आपले बापूजी...
त्यांनी निळीच्या मळ्यातील मजुरांचे आंदोलन उभारले;
ते राष्ट्रपिता महात्मा झाले.
तर अशी मजा.
विहारातल्या दलितांचे दुःख इतके पर्वतप्राय मोठे की,
त्यातून हिमालयाच्या शिखरांएवढे उत्तुंग महात्मे निर्माण झाले.
पण दलितांचे दुःख कधी हटले नाही.
हटणार तरी कसे ?
ते खोल आहे. अगदी कोळसाखाणीएवढे खोल !
चासनाला खाण पंधराशे फूट खोल होती.
तर विषय चालला आहे चासनालाचा.

कडाक्याच्या थंडीत पाटण्याला उतरलो.
शहर अगदी शांत आहे.
कायदा आणि सुव्यवस्था ठणठणीत आहे.
वर्षापूर्वी येथे म्हणे, ' सर्वंकष क्रांती चालली होती !
कोठे गेली ती क्रांती ?... आणि क्रांतीचे नेते ?
शहर शांत आहे.
या शांततेला स्मशानशांतता म्हणणे चुकीचे आहे.
ही खाशी थोर परंपरेची ऐतिहासिक भारतीय शांती आहे.
एक राजा हरला; एक राजा जिंकला.
युद्ध संपले...निशाण बदलले...नवे राजघराणे आले.
जनता शांत सुरळीत जीवन जगते आहे.

खुल्क खुदाका; मुल्क बादशहाका; अंमल अपनी परंपराओंका;
आपल्या परंपरेशी बिहारनेही प्रतारणा केलेली नाही.

' आर्यावर्त ' आणि ' जनशक्ती ' ही पाटण्यातील दोन दैनिके.
दोन्ही दैनिकांच्या कचेरीतून गेलो; फाइली चाळल्या.
पुण्या-मुंबईला आली तेवढीच चासनालाची माहिती.
खरं तर शंभर मैलांवर चासनाला...
या दैनिकांना स्पेशल रिपोर्ट प्रसिद्ध करायला काय हरकत होती ?
काहीच नव्हती. सरकारचीही नव्हती. चासनाला पत्रकारांना खुला होता.
पण ' जनशक्ती ' आंतरराष्ट्रीय क्रांतिवाल्या कम्युनिस्टांचा;
तर ' आर्यावर्त ' सर्वंकष क्रांतिवाल्या जेपीवाल्यांचा !
दोघेही क्रांतिकारक; क्रांतीत तर रक्ताचे पाट वाहतात.
तीनशेपंच्याहत्तर मजूर तर रक्त न वाहवता नुसते गुदमरून मेलेले...
त्यांची क्रांतिकारकांनी कशासाठी पर्वा करावी ?

उद्वेगाने पाटणा सोडले.
धनबादला जाणारी ट्रेन पकडली
आणि मनात पाल चुकचुकली;
पत्रकारांना जायला निश्चितच बंदी असावी.
—— नसता दोन्ही दैनिकांतून स्पेशल रिपोर्टिंग आलेच असते.
जायचा मार्ग बदलावा; आडमार्गाने कोठून जावे ?
नाही तर हद्दपार व्हायला लागायचे !
धनबादहून जाणारा मार्ग हा राजमार्ग.
उलट होजिअडीला उतरून दामोदरनदीवरचा रेल्वेपूल ओलांडून—
चासनालाला जायचा मार्ग हा आडमार्ग;
खिडीच्या वाटेचा.
चंद्रपुराला उतरलो. विगरतिकीटचा दंड भरला.
उलट जाणारी पॅसेंजर पकडली.
पहाटे पहाटे होजिअडीला उतरलो.
होजीअडी जंक्शन...
फलाटावरून चवडे उंच करून पाहिले की, चासनाला खाणीची दोन्ही चानके दिसतात. होजिअडी जंक्शन खरे; पण आहे खेडेगाव. तुरळक तुरळक वस्त्यांतून पाच–सात हजारांची वस्ती. तरी स्टेशनाचे महत्त्व मोठे...
दोन प्लॅटफॉर्मच्या या स्टेशनावरनं रोज अठराशे वॅगन नुसता कोळसा जातो. टाटानगर, बोकारो, बनपूर, भिलाई इथल्या पोलाद-कारखान्यांना. हे सर्व पोलादकारखाने कोळसाखाणीच्या क्षेत्राच्या जवळपासच आहेत. चासनालापासून शंभर किलोमीटरवर टाटानगर, पन्नास किलोमीटरवर बोकारो आणि त्रेपन्न किलोमीटरवर बनपूर पोलादकारखाना.
रेल्वेच्या वॅगनचा आधीच तुटवडा आणि कोळशाची टंचाई पोलाद-कारखान्यांना न परवडणारी. कोळशाअभावी एकदा का झोतभट्टी थंड पडली की पुन्हा पेटायला नऊ महिने लागतात, आणि हा हिशोब सर्वज्ञात आहे. रेल्वेसंपाच्या वेळी जॉर्जभाई म्हणूनच ठणकावून




म्हणाले होते की, दीड महिना संप चालवला तर पोलादकारखाने बंद होतील. सरकार नाक मुठीत धरून शरण येईल.

पण सरकार शहाणे. नाक मुठीत धरायच्याऐवजी ओंजळ ओंजळ करीत त्याने पुरेसा कोळसा साठवून ठेवला आणि मग जॉर्जभाईंनाच नाक मुठीत धरून शरण जावे लागले. संप बारगळला.

सरकारपेक्षा कारखानदार जास्त शहाणे. संप-वॅगनच्या भानगडीत आपली वाट लागायला नको म्हणून 'इस्को' ने आपल्या बनपूर कारखान्यापासून चासनालापर्यंत डायरेक्ट 'रोप-वे' टाकून दिला. आशियातील हा सर्वांत मोठा 'रोप-वे'. या 'रोप-वे' वरून रोज हजार टन कोळसा चासनाल्याहून बनपूरला रवाना होत असतो. एकेका टबमध्ये दोन दोन टन कोळसा मावतो.

'इस्को' हा 'इंडियन आर्यन अ‍ॅन्ड स्टील कंपनी' चा शॉर्टफॉर्म. बनपूरचा पोलादकारखाना आणि चासनालाची कोलीयरी दोन्हींची मालकी 'इस्को' ची. गेल्या साठ–सत्तर वर्षांत 'चासनाला कोलीयरी' सतरा वेळा एकाकडून दुसऱ्यास विकली गेली. प्रत्येक मालकाने अगदी निर्दयपणे आणि बेजबाबदारपणे ती फोडता येईल तेवढी फोडून खाल्ली. अखेर १९६४ मध्ये सर बीरेन मुखर्जी यांनी 'इस्को' साठी ती खरीदली. ब्रिटनच्या इंटरनॅशनल कन्स्ट्रक्शन कंपनीच्या कोलॅबरेशनने वर्ल्ड बँकेकडून कर्ज घेऊन चाळीस कोटी रुपयांचा प्लॅन आखला आणि खाणीच्या आधुनिकीकरणानंतर ती चालू केली. चासनाला कोलीयरीची गणना आशियातल्या 'मॉडर्न आणि वेल इक्विप्ड' अशा कोलीयरीमध्ये होते.

...तेव्हा इतक्या वेल् इक्विप्ड आणि मॉडर्न खाणीत इतकी भयंकर दुर्घटना कशी काय झाली?

होजिअडीस्टेशनच्या बाहेर पडलो.

देवळाच्या आडोशाने झाडाच्या सावलीला कोणा 'गणपत वाण्याचे' किराणा दुकान कम चहाचे हॉटेल होते. हॉटेलाच्या फळकुटाच्या दरवाजांवर चिमटीत मावणाऱ्या खडूने जाडीभरडी वेडीवाकडी सूचना लिहून ठेवली होती,...

'पानी उबालके और छानके पीजिये।'

बाय ऑर्डर

चासनाला खाणीतील उपसलेले पाणी दामोदरनदीत सोडले जात आहे. खाणीतले पाणी मिथेन आणि इतर रसायनांनी दूषित झाले आहे. मानवी आरोग्यास हानिकारक आहे म्हणून ही सूचना.

...मग इतक्या दूषित विषारी पाण्यात जरी– 'एअर पॉकेट्स' निर्माण झाली असली तरी कामगार कसे काय जगतील? का लोकांच्या समाधानासाठी ही खोटी आशा?

हॉटेलातल्या शेगडीत दगडी कोळसा धडधडत होता. तो कोळसा जणू सांगत होता, 'बघ; जगप्रसिद्ध 'झारीया कोल फिल्ड' मध्ये तू आला आहेस!'

चासनाला जगप्रसिद्ध झारीया कोलफील्डमध्ये आहे. चासनालाच्या जवळपासच 'जामाडोबा' 'टिस्कोची' कोलीयरी तर पाथर्डीला 'भारत कोकिंग कोल' ची कोलीयरी आहे. बंगाल–बिहार सीमे-

लगतच्या या क्षेत्रात कोठेही खणा. आधी कोळसा लागेल मग पाणी. अख्खे दामोदरनदीचे खोरे म्हणजेच कोळशाची खाण. हिंदुस्थानचा सत्तर टक्के कोळसा या बंगाल–बिहार सीमाप्रदेशातच आहे. इथल्या भूगर्भात आपल्याला दोडशे वर्षे पुरेल एवढा कोळसा आहे.
¤

पोट खपाटीला गेलेला; हातापायांच्या काड्या असलेला तो दहा-बारा वर्षांचा पोर लुकलुकत्या डोळ्यांनी माझ्याकडे पाहत होता. मी सारखं त्याला विनवीत होतो; 'चासनालापर्यंत मला पोचव, म्हणून !' पण तो एक शब्दसुद्धा बोलत नव्हता. कडाक्याच्या थंडीत नको तिथं फाटलेली एक हाफचड्डी आणि आता उसवायला जागाच नाही म्हणून उसवायचा थांबलेला टेरिलिनच्या हाफशर्टमध्ये तो मख्ख चेहऱ्याने आणि लुकलुकत्या डोळ्यांनी माझ्याकडे पहात नुसता बसून होता. अखेर कंटाळून मी उठलो...चार पावलं चालू पडलो...तेव्हा तो बोलला,...

'ओ बाबूजी; सचमुच रुपया देगा क्या ?'

मी थबकलो. खिशातून पाकीट काढले आणि म्हणालो,

'मंगता है तो पहले ले लो !'

माझ्यासमोर तो आला ते अजून आठवतेय. हॉटेलासमोरच्या दगडावरून माझ्यापर्यंत येताना त्याच्या दोन हडकुळ्या तंगड्या-तेवढ्या पुढेमागे होत होत्या. कमरेच्या वर तो प्रेतासारखा ताठ होता. थंडी होतीच तितकी कडक. एकावर एक दोन कपडे; पुन्हा स्वेटर; स्कार्फ; हातमोजे आणि वर अंगावर शालीसारखे ब्लँकेट घेऊनही माझ्या नाकाला थंडीने पाण्याची धार लागली होती.

'नाम क्या है तुम्हारा ?' मी विचारले.

'कन्हैय्या.' त्याने उत्तर दिले.

पाकिटातून नोट काढून त्याला दिली. तेव्हा तो म्हणाला,

'नोट नको; चिल्लर दो !'

निमूटपणे त्याला चिल्लर दिली. चिल्लर ठेवायला त्याच्या पोशाखाला खिसाच नव्हता. मग शर्टालाच त्याने ती पुरचुंडी करून बांधून टाकली.

## एटाकी दिच्छो आमार मानूस के आनो !'

चासनाला शेजारील कान्ड्रा खेडे. या खेड्यातील अठ्ठावन्न स्त्रिया विधवा झाल्या आहेत. अपघातातील बहुतेक मजूर तिशीच्या आसपासचे होते; यावरून वैधव्याची कुऱ्हाड किती जिव्हारी लागली ते कळून येईल.

खाणमंत्री चंद्रजित यादव कामगारांच्या घराघरांतून सांत्वन करीत हिंडत होते. अशाच भरत नावाच्या कामगाराच्या विशी-बाविशीच्या तरुण पत्नीला चंद्रजित यादव सांगू लागले, '...सरकार तुम्हाला जागा देईल.' पण मंत्रीमहाशयांचे बोलणे पूर्ण व्हायच्या आधीच त्या तरुण बाईने यादवांचा शर्ट पकडला व ती ओरडली...

'एटा की दिच्छो आमारके मानूस आनो !' 'हे काय देताय ? माझा नवरा मला आणून द्या !' ......पण जगातील कोणतीही राजसत्ता गेलेले प्राण परत आणू शकत नाही. ¤

...त्या विचाऱ्या कन्हैय्याचा रिझर्व बँकेच्या नोटांवर विश्वास नव्हता की काय कुणास ठाऊक ? एवढं मात्र खरं की गाठीला रुपया बांधल्यावर त्याचं वितभर पोट मात्र थंडीत उघडं पडलं.

मघाशी त्याच्या पायाच्या काड्या हलल्या; आता हाताच्या. त्यानं माझी सूटकेस उचलली; डोक्यावर घेतली; मी नको नको म्हणत असताही हातातील ब्रीफकेसही घेतली आणि समोर तो तुरुतुरु चालू लागला आणि विनाकारण मला त्या वेळी त्याच्या सांध्यांचा आवाज येतोय असे वाटू लागले.

—'थंडी नही लगती क्या तुमको ?' मी विचारले.

'लगेगी तो जायेगा कहाँ ?' तो म्हणाला.

'स्कूलमे जाता है क्या ?' मी.

'स्कूलमे जाके करेगा क्या ?' तो.

'बाप क्या करता है तुम्हारा ?' मी.

'मर गया !' तो.

'क्या करता था ?' मी.

'खदानमे था !' तो.

'कैसे मर गया ?' मी.

'खदानमे जलके मर गया ! 'तो.

'माँ क्या करती है ?' मी.

'झाडू लगाती है !' तो.

'कितने भाई–बहन हो ?' मी.

'गिने नहीं !' तो.

बाहेरच्या थंडीने ओठ फुटले होते आणि पोराच्या थंड शब्दाने काळीज फुटत होते.

वळणावळणाची, खाचखळग्यांची नागमोडी वाट संपली आणि दामोदर नदीवरचा पूल आला. पूल पाहूनच डोळे फाटले. शेजारी-शेजारी, अप् आणि डाउन ट्रेनचे सिंगल् ट्रॅक्टचे रेल्वेब्रिज होते ते. लाकडी स्लीपर्सवर रुळांच्या मध्ये दोन–अडीच वितांचा पत्रा होता. त्या पत्र्यावरून चालत जायचं आणि पूलही थोडाथोडका नव्हे; तर दीड–दोन फर्लांगांचा. जरा तोल गेला की, खाली शंभर फुटांवर दामोदरनदीचं पाणी, वाळवंट आणि खडक.

'ए, इस पूलपरसे कैसा जायेगा ? हम नहीं जायेगा !' मी म्हणालो.

'तो धनबादसे जाओ !' ...तो शांतपणे म्हणाला आणि मागे वळला.

'चलो, चलो,'—मी अगतिकतेने म्हणालो. पुन्हा तो तुरुतुरू चालू लागला. त्याचे सांधे करकर वाजू लागले. माझं पाऊल जरा स्लीपरच्या पुढेमागे पत्र्यावर पडलं की पत्रा आणि पत्र्यावरोबर जीव खालीवर व्हायचा. पाऊल नेमके स्लीपरवरच पडावं म्हणून खाली पाहू लागलो की, नदी...वाळवंट, खडक, डोळे फिरायचे ! डोंबाऱ्याची कसरत करत चाललो होतो. चालता चालता त्याला विचारले...

'चलते चलते गाडी आ गयी तो ?'

'ऐसा बाजू खडा रहनेका !' असे म्हणत तो दोन टांगा टाकीत पुलाच्या गर्डरवर जाऊन उभा राहिला. तिथं हाताला आधारही काही नव्हता.

'और गिर गया तो ?'

'मर जायेगा !' तो थंडपणे म्हणाला.

मी जेव्हा पुलाच्या अर्ध्यावर आलो होतो तेव्हा दुसऱ्या तीरावर माझ्याकडे लुकलुकत्या डोळ्यांनी आणि मख्ख चेहऱ्याने बघत सूट-

केसवर तो बसला होता.

मी क्षणभर थांबलो. त्याला नीट निरखून घेतलं.

राष्ट्राचे उद्योग-चक्र चालू ठेवणाऱ्या कोळसा खाण-कामगाराचे कुटुंब त्याच्यानंतर कसे देशोधडीला लागते ते पाहून घेतले !

¤

'ये कान्ड्रा गाँव और ये चासनाला !'

हा सूर्य तो जयद्रथाच्या चालीवर त्याने मला सांगितले.

गावात एक गारठलेली शांतता आणि गोठलेली उदासीनता होती.

'एरिया मॅनेजरचे ऑफिस कोठे आहे ?' –मी एकाला विचारले.

'मंदिरके सामने !' त्याने उत्तर दिले.

–इथंही मंदिर आहे तर !

चालू लागलो. हळूहळू गटागटाने गस्त घालणारे सी. आर. पी. चे पोलीस दिसू लागले. चासनालात माणसांपेक्षा पोलीसच जास्त दिसत होते. संपूर्ण खाणभागात सुमारे दोन हजारांच्या आसपास सी. आर. पी. चे जवान आहेत. उंच अशी ती दोन 'चानके' नसती तर चासनाला कोलीयरी न वाटता सी. आर. पी. चा कँपच वाटला असता.

'काय, सर्व ऑलवेल आहे ना ?' गस्त घालणाऱ्या शिपायांच्या एका गटात शिरकाव करून घेत विचारले.

'आज तरी ऑलवेल आहे. उद्याचं काय सांगावं ?'

'का बाबा ?'

'असं पहा, पहिल्या दिवशी थोडी गडबड झाली. माणसं जगायची आशा दाखवून दादापुता करून थांबवली; पण उद्या पाण्यातून प्रेतं निघू लागतील तेव्हा ?'

त्यांची भीती खरी होती. खाणीत अडकलेल्यांचे 'जीवन धोक्यात' हा शब्द म्हणजे नरो वा कुंजरो वा टाइप. स्पष्टच सांगायचे म्हणजे सर्वजण मेले आहेत. त्यांची प्रेतं वर काढली जाऊ लागतील तेव्हा वातावरण तापत जाण्याचा धोका आहे.

एरिया मॅनेजरचे ऑफिस आले.

ऑफिससमोरच तात्पुरते कल्याण केंद्र काढलेले. महामारीप्रतिबंधक लस टोचणे चालू होते.

ऑफिससमोर मंदिर...आणि दोन-चार वडासमान झाडे.देवळाच्या मंडपात भटारखाना लागला होता. सी. आर. पी. चे जवान जेवणाची तयारी करत होते. मंदिरात डोकावले.

पाषाणाच्या देवीवर असंख्य हार. डोक्यावर फुलांचा डोंगर. मी देवीला...मूर्तीला...फुलांना निरखून पाहिले. उजवीकडे एकही फूल पडलेले नव्हते.

किती नवस वांझोटे ठरणार होते ?

¤

'मी मायनिंग इंजिनियर आहे'...त्याने ओळख करून दिली. त्याचे नाव मी तुम्हाला सांगणार नाही. फक्त त्याने जे जे सांगितले ते ते माझ्या नोटस्‌प्रमाणे तुम्हाला सांगणार आहे.

......'खाणीचे क्षेत्रफळ असेल २७०० बिघे. खरी उत्पादन क्षमता आहे ४००० टन; पण सध्या जेमतेम ४०० टनच उत्पादन होतंय. अपघाताच्या वेळी खाणीत १३५० फूट खोल काम चालू होते. काम काही थोड्या भागातच चालू होते. सर्वत्र काम चालू राहिले असते तर एवढे पाणी साठले नसते. आता आत ८५० फूट पाणी उभे आहे !'

'का हो, अपघाताची काही कल्पना होती का ?

मी त्या मायनिंग इंजिनियरला प्रश्न विचारला आणि त्याच

## शेकडो बळी घेणारे खाणअपघात !

भारतातील मोठे खाणअपघात मोजायचे झाले तर; प. बंगालमध्ये १९३६ ला पोधी कोलीयरीत स्फोट होऊन चारशे कामगार मेले. पाचव्या दशकात तर अनेक मोठे खाणअपघात झाले. उदा. अमदलाबाद कोलीयरी स्फोट, धर्मवंद कोलीयरी दुर्घटना, न्युटन चिकली कोलीयरी, बुराधेमू कोलीयरीतील पूर; चिनाकलीतील स्फोट इत्यादी इत्यादी.

¤ न्यूटन चिकली दुर्घटना १९५४ ची. त्यात ७४ जीव दगावले.

¤ चिनाकरीच्या स्फोटात १९५८ साली १८७ बळी पडले.

¤ धोरी खाणीतील स्फोटात १९६५ साली २६८ प्राणास मुकले.

¤ जीतपूर खाणीतील स्फोटात १९७३ साली ३८ मृत्युमुखी. एखाद्या छोटया लढाईत पडतील असे बळी खाणअपघातात पडतात....निःशस्त्र खाणकामगारांचे. पण.........,

सैनिकांना वीरमरण लाभते;

खाणकामगारांना ?

## ७५ सालचे 'सिंगल कॉलम' अपघात !

चासनाला अपघाताला आठ कॉलमी जागा वृत्तपत्रांनी दिली. अग्रलेखाचा मानही दिला. कारण अपघात खूप मोठा ना ! पण ज्या अपघातांची 'सिंगल' कॉलमात बोळवण झाली त्यांचे काय ?.........अशा छोटया अपघातांतूनच या वर्षी २६७ कामगार मृत्युमुखी पडले आहेत !

हजारीबाग विभाग.........मायल कोलीयरीत पाच जण ठार.

धनबाद विभाग.........केसरगढ कोलीयरीत चाळ कोसळून बारा ठार.

त्याच्याच पुढल्या आठवड्यात हजारीबाग विभागातच भैकालीटन कोलीयरीत सहा ठार आणि याच जिल्ह्यात १४ मे ला आरा कोलीयरीत चार ठार.

मध्यप्रदेशात सिलबेरा कोलीयरीत पाणी शिरून दहा ठार.

डिसेंबर महिन्यात आसनसोल विभागात मॉडर्न सतग्राम कोलीयरीत तीन ठार......चिनाकुरी कोलीयरीत तीन ठार.

पण या अपघातांची खळबळ माजली नाही. कारण माणसांच्या जिवापेक्षा क्वान्टिटीला आम्ही महत्त्व जास्त देतो. चासनालाची क्वान्टिटी मोठी म्हणून आमची झोपमोड.

एकदम 'ब्रेन डिसॅस्टर' झाला. तो तावातावाने, संतापाने मुठी आपटीत बरेच काही बोलला. त्याची अनेक विधाने 'साम्राज्य-वाद्यांची हस्तक, उजवी प्रतिगामी, डावी साहसवादी आणि फॅसिस्ट' प्रवृत्तीची निदर्शक ठरतील. तेव्हा त्याची ती सर्व विधाने वीस कलमी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी तसेच 'विचारस्वातंत्र्याच्या' हक्का-साठी माझ्यापाशी राखून ठेवून थोडी विधाने......जनतेचे नीतिधैर्य खचणार नाही इतक्या सौम्य भाषेत सांगतो—

......'दुर्घटनेआधी चार दिवस म्हणजे २३ डिसेंबर ७५ ला 'कोलमाइन्स ऑफिसर्स असोसिएशन' आणि 'सुपरवायझरी स्टाफ असोसिएशनने' प्रसिद्ध केलेल्या आपल्या अहवालात म्हटले आहे की,

—'अत्यंत खेदजनक गोष्ट म्हणजे राष्ट्रीयीकरणानंतरही कोळसा-खाणीतील सुरक्षाविषयक नियम, कायदे धाब्यावर बसविण्यात आले आहेत.'

नफेखोर खाजगी मालकांसारखीच राष्ट्रीयीकृत खाणीतूनही सुर-क्षिततेच्या उपाययोजनेबाबत इतकी उदासीनता, बेफिकिरी असावी ?

अरेरे !

राष्ट्रीयीकरणानंतर कोळसाखाणीचे उत्पादन वाढतेय. तोटचा-तल्या राष्ट्रीयीकृत उद्योगांचा जाहिरात करणाऱ्या...त्यांचे वाभाडे करणाऱ्या साखळी वृत्तपत्रांनी याची कधी दखल घेतली नाही; पण कोळसा-उत्पादन वाढतंय. खाणकामगार स्वतःचे बळी देऊन वाढवतोय ! ७४ च्या तुलनेत ७५ साली १५ टक्के उत्पादन वाढले आणि बळींची संख्या ? ती खालीलप्रमाणे वाढली.

| | | |
|---|---|---|
| १९७३ | खाणअपघातातील बळी | १८३ |
| १९७४ | ,, | २११ |
| १९७५ | ,, | ६३३ |

अर्थात सरकार दखल घेत नाही असे नाही. प्रत्येक मोठ्या दुर्घटनेनंतर सुरक्षाविषयक संमेलने, चौकशीसमित्या नेमल्या जातात. म्हणजे सरकार अपघातांची दखल घेते. फक्त संमेलने आणि चौकशी-समित्यांचीच दखल घेत नाही.

—१९५४ ते ७३ पर्यंत सहा चौकशीकमिशनने सरकारने नेमली. चौकशीकमिशनांचे काय झाले याची चांभारचौकशी आपण करायची नाही.

१९५८ ते ७३ पर्यंत प्रत्येक मोठ्या खाणदुर्घटनेनंतर एकेक करीत आजवर तीन सुरक्षाविषयक संमेलने झाली. या संमेलनांतून सर्वमताने काही सूचना सरकारपुढे मांडल्या गेल्या.

—आजही त्या सूचना सरकारच्या 'विचाराधीन' आहेत, नाही असे नाही.

तिसऱ्या सुरक्षासंमेलनाच्या वेळी मात्र गंमतच झाली. अहो, प्रत्यक्ष संमेलनाचे अध्यक्ष, प. बंगालचे मुख्य मंत्री सिद्धार्थ शंकर रे यांनीच विचारले, 'पहिल्या दोन परिषदांची फलश्रुती शून्य असताना या तिसऱ्या परिषदेचे प्रयोजनच काय ? या तिसऱ्या परिषदेने काय साधणार ?'

खरे म्हणजे काँग्रेसच्याच मुख्य मंत्र्यांनी असे बोलायला नको होते; पण एका सदसद्विवेकबुद्धीच्या क्षणी महाशय बोलून गेले. सत्ताधाऱ्यांना सदसद्विवेकबुद्धी नसते असे थोडेच आहे ?

१९७२ मध्ये सुरक्षासंमेलनाच्या सूचनांचा विचार करून एक विधेयक संसदेत आणले गेले होते; पण खाण व ऊर्जा-मंत्रालयाच्या विरोधाने त्या विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले नाही.

......आज 'खाण आणि ऊर्जा' खात्याचे मंत्री—चासनालातील आपद्ग्रस्तांचे सांत्वन करीत हिंडत आहेत. ते जो काही ही माणुसकी दाखवीत आहेत त्याबद्दल आपण त्यांचे अभिनंदन करू. जमल्यास कधी सत्कारही करू.

¤

## एक बातमी

बनारस हिंदू विश्वविद्यालयाच्या 'खाणअभियांत्रिकी' विभागाच्या पन्नासाव्या वर्षजयंतीनिमित्त 'भारत कोकिंग कोल लि.'ने सादर केलेल्या प्रबंधात चासनालाविषयी म्हटले आहे की—

......'शेजारील पडीक खाणीतील एकत्रित पाणी एकवीस मीटर उंचीचा बांध फोडून खाणीत शिरले. खाणीत प्रतिसेकंद एक लाख क्युबिक फूट या हिशोबाने पाणी शिरले. पाण्याचा वेग सेकंदाला सात फूट होता. तीन मिनिटांत संपूर्ण खाण भरली !'

## एक आयविटनेस

मी अपघाताच्या वेळी या इथेच उभा होतो. अपघात झाला. दोन-तीन मिनिटांत पाणी भरले गेले. खाणीतली हवा वेगाने बाहेर पडली. इतक्या वेगाने की, 'हवेचाच स्फोट' झाला ! हवेच्या वेगाने चानकातील पोलादी इक्विपमेंटस्‌ही वाकडीतिकडी झाली.

**एक प्रश्न** :— खाणीत एअरपॉकेटस् तयार होऊन माणसे वाचू शकतील का ?

**एकच उत्तर** :— एअरपॉकेटस् तयार होतील; पण बहुसंख्य माणसे वाचणार नाहीत. कारण जी एअरपॉकेटस् तयार झाली असतील तिथे हवेचा दाब इतका असेल की, श्वास घेणाऱ्यांची फुफ्फुसे तुटतील ! पुन्हा तीन आठवडे हवा पुरेलच असे नाही आणि पाणीही विषारी ! तात्पर्य माणूस जगण्याची शक्यता नाही. क्वचित कोणी जिवंत निघाला तर 'नशीब !' एवढेच कारण असेल.

१९६६ मध्ये असनसोलमधील बडा धेमू कोलीयरीत पाणी शिरले होते. पाणी उपसल्यावर १९ दिवसांनी ११ लोक जिवंत बाहेर निघाले होते; पण ती खाण कमी खोल होती. त्यामुळे आत तयार झालेली एअरपॉकेटस्‌ही कमी दाबाची होती. तसेच शिरलेले पाणी सरोवराचे होते नि ते इतक्या प्रचंड वेगाने शिरलेले नव्हते.

......तेव्हा बडा धेमूचा चमत्कार चासनालात घडण्याची शक्यता नाही !

¤

गुरखा पीट नंबर एकमध्ये सोडण्यास तयार नव्हता. दादापुता ते अद्वातद्वा प्रकारची सारी भाषा झाली. अखेर सिक्युरिटी ऑफिसरची (आता सिक्युरिटीचे काम पोलीसच बघत आहेत.) परवानगी घेतली. अखेर गुरख्याला सोडावेच लागले.

पीट नंबर एकजवळ जाताना पाय थरथरले. आपण जिथे पाऊल टाकत आहोत तिथे हजार फूट खाली तीनशे पंचाहत्तर प्रेते आहेत, ही भावनाच विलक्षण अभद्र होती !

पीट नंबर एक (डाउन कास्ट). येथूनच सर्व कामगार लिफ्टमधून

आत गेले होते. पीट नंबर एकमध्येच रशियन पंप लागलेत. एक चालू आहे, एक बंद. तंत्रज्ञांची धावपळ चालू आहे. दोन-चार रशियन भाई तिथे होते. ते इतके मन लावून काम करत होते की त्यांना डिस्टर्ब करवले नाही. एका बंगाली बाबूला पकडले......

'का हो, हे रशियन पंप सारखे बंद का पडताहेत ?'

'तुम्हाला काही तांत्रिक ज्ञान ?'

'नाही.'

'मग समजावणं कठीण. हे बघा, विमानाने पंप आणले. घाईगर्दीने लावले. हे काम काही रशियनांनीच केले असे नाही. आम्हीही केले. त्यात आम्हाला पंपांची माहिती, अनुभव नाही. विजेचा दाब कमी-जास्त होतोय. हवामानाचाही यंत्रावर परिणाम होतोच. त्यात नाना अडचणी. चानकांची तोंडे लहान. जास्त पंप लावता येत नाहीत. त्यात चार प्रकारचे चार पंप्स आणि त्यांचे अठरा प्रॉब्लेम्स. रशियन पंप खोलवरचे पाणी उपसताहेत. त्याने चिखलगाळ वर येतोय. त्या चिखलगाळाने इंडियन पंप्स बंद पडतात. इंडियन पंप्स सुरू करायला जावे तर जरा व्होल्टेज कमीजास्त होते आणि रशियन पंपांची मोटरच जळते. फ्यूज उडतो. काय वाट्टेल ते होते!'

'रशियन आणि पोलीश पंप आले तेव्हा वीज कमी पडत होती. तुम्हाला आश्चर्य वाटेल ऐकून; पण बोकारो स्टीलच्या कामगारांनी आणि इंजिनियर्सनी अक्षरशः चोवीस तासांत ६.६ किलोवॅटचा स्वीचबोर्ड तयार करून दिला. सदर बोर्ड एखाद्या सबस्टेशनप्रमाणे स्वयंपूर्ण आहे. आता इतक्या घाईगर्दीने बनवलेला स्वीचबोर्ड विजेच्या लोडमध्ये कमीजास्त होणारच.'

'एकंदर चार ठिकाणी सोळा पंप बसवले आहेत. पडीक-खाणीवर दोन...दोन्ही पीटस्‌मध्येही. अहोरात्र पंप पाणी खेचताहेत. खाणीतल्या पाण्यात पोत्यापोत्याने ब्लिचिंग पावडर टाकली जात आहे. एक मोठा पाइप पिटातून बाहेर गेलेला. तो फक्त खाणीतील घाण हवा बाहेर खेचतोय. नाही तर काम करणं अशक्य व्हायचं.'

पाणी किती काढले जाते आहे, त्याचे रोज आकडे प्रसिद्ध होत होते; पण प्रथम जाहीर केल्याप्रमाणे फक्त अकरा कोटी गॅलनच पाणी उपसायचे नाहीय. कारण आत कुठून पाणी आले याचा पत्ता नाही. जुन्या खाणीत किती पाणी आहे याची माहिती नाही. तूर्त रोज वीस लाख गॅलन पाणी खाणीत शिरते आहे. म्हणजे वीस लाख गॅलनच्यावर निघेल तितकेच पाणी रोज उपसले असे समजायचे. पुन्हा पाणी उपसणे वाटते तितके सोपे नाही! खाली खाणीच्या तळाला १६० सेंटिग्रेड तपमान आहे. तिथे तर पाणी चक्क उकळते आहे.

अपघात झाला तेव्हा अपघाताच्या ठिकाणी एकही पंपसेट नव्हता. अत्यंत वेगाने धावपळ करूनही पाणी काढायला अठ्ठेचाळीस तासांनी सुरुवात झाली. पंप बसविण्यासाठी पीटमधील एका वेळी साठ-साठ कामगारांना खाली नेणारी अवाढव्य लिफ्ट काढून टाकावी लागली.

'लिफ्ट काढली तेव्हा लिफ्टच्या तळाला एक लँपकॅप लोंबकळत होती. ती कशी तिथे आली? कोणा दुर्दैवी कामगाराने सुटायची धडपड केली होती का ?'

रशियन, पोलीश पंप आले. वीज कमी पडू लागली. बोकारोहून चार जानेवारीला स्वीचबोर्ड आला. अहोरात्र पंप धडधडताहेत. उसंत न घेता पंप चालू आहेत; तरी पण पाणी काढायला किमान दोन आठवडे!

काढलेले पाणी दीड फर्लांगावर पाइपमधून नेले जात आहे. तिथून दामोदरनदीपर्यंत कालवा खणला आहे. हा कालवा चार-पाच फर्लांगांवरील नदीला जाऊन भिडला आहे. हा कालवा अक्षरशः चोवीस तासांत खणलाय.

थोडक्यात पाणी उपसण्यात हयगय झाली नाही. महिना-महिना खाणारी कामे चोवीस तासांत उरकण्यात आली आहेत; पण पाणीही काही कमी वेगाने आले नाही. सालं प्रकाशाच्या वेगाने आले की काय कुणास ठाऊक ?

तीन मिनिटांत......अकरा कोटी गॅलन पाणी!

अकरा कोटी गॅलन पाणी म्हणजे एकशे चाळीस मजल्यांइतके पाणी......!

¤

कोणीएक जबाबदार अधिकारी पंप कसे चालतात ते पाहत उभा होता. मी गेलो नि त्याला म्हणालो, 'माणसं जगायची शक्यता कमीच नाही ?'

'कमी नाही...बिल्कुल नाही!'

'प्रेते मिळणेही अवघडच आहे!'

'हो तर; इतक्या दिवसांत बॉडी डीकंपोझ झाल्याशिवाय थोडीच राहणार? पाण्यात सारखी ब्लिचिंग पावडर ओतताहेत. नुसते हाडांचे सापळे काढावे लागतील वर...!'

'मग, पाणी उपसायचा एवढा आटापीटा ?'

'हा आटापीटा माणसांसाठी नाही...खाणीसाठी चालला आहे. माणसं हातची गेलीच आहेत; निदान खाण तरी जाऊ नये!'

## हा निव्वळ योगायोगच काय ?

चासनाला कोलीयरीचे मुख्य कार्यपालक अधिकारी श्री. जे. एन्. वहरी यांची ख्याती अशी की, ते ज्या ज्या ठिकाणी गेले त्या त्या ठिकाणी अपघात झाले. पैकी जीतपूर आणि चासनाला हे मोठे अपघात. जीतपूर दुर्घटनेबाबत चौकशीसमितीने सुरक्षा नियमांकडे दुर्लक्ष केले म्हणून अधिकाऱ्यांवर ठपका ठेवला होता. वहरी तेव्हा जीतपूरला एक जबाबदार अधिकारी होते आणि आज चासनालाला आहेत. वहरी आणि अपघात यांचे काय काय साटेलोटे आहेत कोणास ठाऊक ?

## आरमारही हतबल झाले!

भारतीय आरमाराचे कमांडर श्री. एच. धिंग्रा मुंबईहून आठ जानेवारीला चासनालाला आले. खाणीत अडीचशे फूट खोल जाऊन त्यांनी निरीक्षण केले.........आणि हतबल होऊन वर आले.........

एक तर विषारी पाणी. त्यात पुन्हा खाणीची आत परिस्थिती काय याची कल्पनाच नाही आणि म्हणूनच आरमारातील पाणबुडे आणून 'अडकलेली माणसे' बाहेर काढण्याचा विचार सोडून द्यावा लागला.

'म्हणजे ?'

'म्हणजे असं की, पाणी अधिक काळ आत राहिले तर खाणीतील कोळशाचा दर्जा घसरेल. पाण्याने आतील कोळशाचे खांब कोसळले तर खाणच बंद पडेल आणि या खाणीतून कोकिंग कोल निघतो· खाण हातची जाता कामा नये !'

'असंय तर !'

एकंदर कोळशाचे शास्त्रीय प्रकार अनेक. जवळपास सात. विदूमनी, एंथ्रासाइट, लिग्नाइट, पीट इत्यादी; पण व्यावहारिक प्रकार दोनच. एक कोकिंग कोल, दुसरा नॉन कोकिंग कोल. कोकिंग कोल पोलाद कारखान्यासाठी प्रामुख्याने वापरला जातो. नॉन कोकिंग कोल रेल्वे, पॉवर-हाउसेस इत्यादींच्या कामाचा. आपल्या देशात कोकिंग कोल कमी. पोलाद कारखान्यांसाठी त्याची गरज मात्र जास्त. चासनाला ही कोकिंग कोलची खाण.

ती वाचलीच पाहिजे......वाचवलीच पाहिजे !

¤

कॉलेजच्या पोरांना पाहून थक्क झालो.

या कुग्रामी यांची काय ट्रिपबिप आलीय की काय ? पुढे होऊन चौकशी केली. धनबादच्या मायनिंग इन्स्टिटयूटचे विद्यार्थी होते. आपल्या प्राध्यापकांबरोबर अपघात कसा घडला, पाणी कसे काढत आहेत याच्या पाहणीसाठी आले होते. त्यांच्यातलाच एक होऊन त्यांच्यात मिसळून गेलो. प्रोफेसर काय सांगतात ते ऐकू लागलो. सगळेच काही समजले नाही...पण समजले ते असे...

खाणीचे प्रकार दोन. एक ओपन कास्ट माइन. (मैदानी खाण.) दुसरी अंडरग्राउंड माइन. (भूमिगत खाण.) कोळशाचे भूपृष्ठालगतचे थर वरील माती-दगड काढून फोडले जातात. मैदानी खाणीत अपघाताचा धोका कमी; पण अशा फारच थोडया खाणी भारतात शिल्लक आहेत.

दुसऱ्या महायुद्धाच्या व नंतरच्या काळात कोळशाची मागणी वाढली आणि जमिनीत खोलवर दडलेले साठे काढायची गरज भासू लागली. वरचा जमिनीचा थर काढून कोळसा काढणे शक्यच नव्हते. तसा काढला असता तर हिऱ्याच्या भावात पडला असता म्हणून मग अंडरग्राउंड माइन्स खणायला सुरुवात झाली. जमिनीला सरळ दोन उभे छेद घ्यायचे. वरच्या दोन्ही तोंडांना, एकाला डाउन कास्ट दुसऱ्याला अपकास्ट म्हणतात. डाउन कास्टमधून बाहेरील ताजी हवा आत जाते. अपकास्टमधून खाणीतील हवा बाहेर खेचली जाते.अपकास्ट पीट(खाणीच्या तोंडाला चानक किंवा पीट म्हणतात.) मध्ये मोठे एक्झॉस्ट पंखे लावलेले असतात. ते खाणीतील हवा खेचून घेतात. अर्थातच डाउनकास्टमधून ताजी हवा आत जाते.

भूमिगत खाणीतून अपघाताचा धोका जास्त. तो प्रामुख्याने चार कारणांनी. १ : छत कोसळणे. २ : गॅसचा स्फोट. ३ : आग लागणे. ४ : पाणी शिरणे. बाकीच्या इतर तांत्रिक अपघातांची संख्याही वाढतेच.

छत कोसळण्याचे प्रकार फार होतात. दोन शाफ्टना जोडणाऱ्या कुयाराने कोळसा काढला जात असतो. कोळसा काढत जाताना कोळशाचेच खांब तयार केले जातात. (जसे लेण्यांतून एकाच खडकातून खांब, छत तयार केले जाते.) दोन खांबांमधले अंतर १० फुटांपेक्षा अधिक असू नये असा नियम आहे; पण हे दहा फुटांचे छप्परही खांब तोलू शकत नाही. ती काही सीमेंटकाँक्रीटची स्लॅब नव्हे. मध्येच छताचा भाग कोसळतो. खाली माणूस सापडला नाही तर फुकटचा कोळसा मिळाला समजायचे आणि कोसळल्या छताखाली माणूस सापडला तर ?

तर तो अपघात !

छत कोसळण्याचे अपघात वारंवार होत असतात. गॅस एक्सप्लोझनचाही धोका तसाच असतो. कोळशाच्या दोन थरांतील हवेच्या वर्षानुवर्षे दाबामुळे मिथेनमध्ये रूपांतर होते. कार्बन मोनाक्साइड, मिथेन हे स्फोटक वायू खाणीत असतात. फोडल्या जाणाऱ्या कोळशाबरोबर ते मोकळे होऊन खाणीतील हवेत मिसळतात. हवेतील मिथेनचे प्रमाण ५·४ / १४·८ होते तेव्हा स्फोट होतो. अशा स्फोटातून आजवर शेकडो कामगार मेले आहेत. स्फोटाचा धोका टाळण्यासाठी खाणीत जरुरीप्रमाणे कमी-जास्त हवा खेळवली जात असते. गॅसेसचे प्रमाण शोधण्याची उपकरणे, पद्धतीही आहेत. तरीही असे स्फोट वारंवार होतच असतात.

स्फोट साधारणतः दोन प्रकारे होतात. एक म्हणजे कोल डस्ट एक्सप्लोझन. जेव्हा खाणीतील हवेत कोळशाच्या धुळीचे प्रमाण अवास्तव जादा होते तेव्हा ठिणगी पडून आपोआप स्फोट होतो.

दुसरा प्रकार म्हणजे फायर डम्प एक्स्लोझन. गॅसेसचे हवेतील प्रमाण जास्त झाल्याने होते.

अपघाताचा तिसरा प्रकार म्हणजे आग. कोळसाखाणीतील आग हा प्रकार भयानक असतो. खाणीतून स्पॉटेनियस, हीटिंग होते. कोळसा आपोआप पेट घेतो. उदा. कोळशाचे जे पिलर असतात त्यावर वरील जमिनीचे प्रेशर येत असते. त्या प्रेशरने तापत जाऊन कोळसा आपोआप पेट घेतो. चासनालातील पाणी काढतानाही ही आगीची भीती होतीच. पाणी काढले जात असताना कोळशाशी हवेच्या होणाऱ्या घर्षणानेही आग लागण्याची शक्यता असते.

कोळसाखाणीतील आग हा फार भयानक प्रकार असतो. एकदा आग लागली की विझतच नाही. वर्षानुवर्षे आग जळतच असते. धनबादजवळील कत्रास येथील जोगताह कोलीयरीत लागलेली आग गेले वीस-पंचवीस वर्षे अजून जळतच आहे. रात्रीच्या वेळी...पावसाळ्यात जमिनीवर निळया फ्लेमन्स् तरंगत असताना दिसतात. ते दृश्य मोठे मनोहर दिसते.

...पण अशा आगीने गेल्या काही वर्षांतच बावीस लाख टन कोळसा जळून गेलेला आहे. राष्ट्रीय संपत्तीची एवढी हानी राष्ट्राला परवडणारी आहे काय ?

कोळसाखाणीला लागलेली आग विझवता येणे शक्यच नसते. म्हणून मग पाणी आणि वाळू भरून ती सील केली जाते. हेतू निदान आग इतरत्र पसरू नये एवढाच.

खाणअपघाताचा चौथा प्रकार म्हणजे खाणीत पाणी शिरणे. जमिनीत पाण्याचे अंतर्गत प्रवाह असतात. ते कधी खाणीत शिरतात तर कधी शेजारील पडीक खाणीतील पाणी शिरते. चासनालाला हेच घडले आहे. कधीकधी खाणीशेजारील नाल्याचे, सरोवराचे पाणी बंधारा फुटून किंवा पावसाळ्यात पाण्याची उंची वाढून खाणीत शिरते. तेव्हा खाणीत पाणी शिरून होणारे अपघात नव्याने होत आहेत असे नाही.

...सूर्य अस्ताला वगैरे चालला होता; पण ज्या तीनशे पंच्याहत्तर घरांतून कायमचाच अंधार झाला होता, त्या घरांवर काळोख आणखी तो काय पसरणार होता ?

धनबादला जायला हवं... मनाशीच पुटपुटलो. दोन हजारांचे आसपास सी. आर. पी. चे जवान; शेकडो तंत्रज्ञ; अधिकारी यांचे मुळे चासनालात राहायची कुठे सोय उरली नव्हती. जवळपास सारेच पत्रकार धनबादला राहत होते. धनबादहून रोज चासनालाला येत होते. चासनाला धनबादहून जेमतेम सोळा मैलांवर आहे.

चासनाला कोलीयरीच्या मेगनेटमधून बाहेर पडलो तेव्हा वॉचमन आणि ड्युटीवरील इन्स्पेक्टर चमत्कारिक नजरेने माझ्याकडे पाहत होते. आत शिरताना मला पाहिल्याचे काही त्यांना आठवत नसावे. बाहेर तर पडत होतो...

पत्रकारांना बंदी असेल या भीतीने सकाळी विनाकारण द्राविडी प्राणायाम करीत डोंबाऱ्यासारखा चासनालात घुसलो होतो. आता अगदी राजमार्गाने निघालो होतो.

मेनगेटसमोर येताच मी सिंद्रीकडे तोंड करून उभा राहिलो. चासनालापासून पाच मैलांवर तो प्रसिद्ध सिंद्रीचा खतकारखाना आहे. येणाऱ्या टॅक्सीज भरभरून चालल्या होत्या. अखेर एका टॅक्सीवाल्याने टॅक्सी थांबवून दरवाजा उघडला. त्याने दरवाजा उघडताच दोन-चार उतारू बाहेर कलंडले. ड्रायव्हर मला म्हणाला, ' अन्दर आओ. ' त्याच्या या ' आओ ' या अदबशीर दरबारी भाषेचे कौतुक करत ' विरार फास्ट 'ला झोंबल्याप्रमाणे टॅक्सीला झोंबलो. त्याने धाड्कन दरवाजा बंद केला. आतील प्रवाशांसकट टॅक्सी गदगद हालली. पंचम जॉर्ज भूपतीच्या काळातील टॅक्सीनामक तो गाडा धडधडत जाऊ लागला. तशी मी आतील प्रवाशांची संख्या मोजायचा प्रयत्न केला; पण गर्दी जरा जास्तच होती त्यामुळे मोजता आली नाही. माझे नशीब इतकेच की, मला खिडकीपाशी जागा मिळाली होती.

चासनाला ते धनबाद. सोळा किलोमीटरचा रस्ता. वाटेत दोन-चार खाणी आणि गावे. अनिल अवचटांचे ' पूर्णिया ' वाचून बिहारचे मनात उमटलेले चित्र या प्रवासात पुसून जाते. हा सारा भाग पूर्णिया-सारखा लाकडी नांगरावर उपजीविका करणारा नाही. इथे क्रेन्स, रोप वे चे जाळे आहे. पिंपरीहून पुण्याला चालल्यासारखे वाटते. महानगर नसलेली उपनगरे म्हणजेच धनबाद, कत्रास आणि चासनाला !

देशी वसाहतवाद म्हणजे काय ते इथे कळते. खरे तर हिंदुस्थानला पाऊण कोळसा देणारा हा खनिजसंपन्न भाग; पण कारखाने, खाणी सोडल्या तर सर्व ओसाड, वैराण, मागासलेला. बिहारातनं कोळसा आला नाही तर दहा टक्के महाराष्ट्रीयनांना नोकऱ्या शिल्लक राहणार नाहीत.

तरी आमच्याकडे ' शिवसेना ' आणि इथं ?...

बिहाऱ्यांनीही ' मगधसेना ' काढावी की काय ? खरे म्हणजे किती लुटले जाते आहे बिहारला. प्रचंड खनिज संपत्ती असूनही आफ्रिका जसा ' डार्क कंट्री ' राहिला आहे तसाच भारतात बिहार ' डार्क प्रॉव्हिन्स ' बनला आहे.

खाणी बिहारात, कोळसा बिहारच्या मातीत; पण मालक मारवाडी, कच्छी, गुजराथी किंवा युरोपियन्स ! गेले शंभर वर्षं या मालकांनी बिहारातून पोते पोते भरून संपत्ती आपापल्या देशात नेली ! बिहारात ना इन्व्हेस्टमेंट केली, ना सुधारणा ! संपूर्ण कोळसाखाणीचा संपन्न प्रदेश पण धनबाद शहर–सिन्नर, आंबेजोगाईपेक्षा निराळे नाही.

ही लुटालूट वेळीच थांबली पाहिजे. नाही तर बिहारातही प्रांतीयवाद माजायला वेळ लागणार नाही.

धनबाद आले. ड्रायव्हरने दरवाजा उघडून उतारूंना ' बाहेर ' काढले. थंडी जाणवू लागली होती. सोळा मैलांच्या प्रवासातच सोळाशे मैल प्रवास केल्यासारखे अंग आंबून आणि आखडून गेले होते. हॉटेलची चौकशी करत चालू लागलो.

सकाळी कन्हैय्याचे सांधे करकर वाजताहेत असा भास होत होता. आत्ता मात्र माझेच सांधे करकर वाजताहेत हे स्पष्ट जाणवत होते.

□

[ पुढील अंकी चालू ]

## बेकायदेशीर ' हातखाणी ' !

आपल्या देशात काय वाट्टेल ते होऊ शकते. तेव्हा हातभट्टीच्या धर्तीवर ' हातखाणी ' चालू झाल्या तर नवल वाटायला नको. बिहारच्या प्रत्येक जिल्ह्यात जवळजवळ अशा बेकायदेशीर खाणी आहेत. या खाणीतून कोळसा अक्षरश: निर्दयपणे काढला जातो. अर्थातच कोळशाची नासाडी होत आहे. या खाणीतील मजुरांची अवस्था तर गुरांसारखीच असते. पुन्हा खाणी शास्त्रीय पद्धतीने न चालवण्याने जमीन खचणे, आगी लागणे आदी प्रकार घडतच असतात.

या हातखाणी बंद करण्याच्या दृष्टीने सध्या विशेष प्रयत्न चालू आहेत. ज्या खाजगी व्यक्तींकडे खाणीचे जुने पट्टे आहेत ते काढून घेण्याच्या दृष्टीने केंद्र सरकार व राज्य सरकार यांचे दरम्यान विचारविनिमय चालू आहे!

पण हा विचारविनिमय पूर्ण केव्हा होणार?

**चासनाल्यातील शासकीय मदतकार्य उत्कृष्ट चालू आहे.**
**पण आड येणारे हितसंबंध ?**
**पुढील अंकी....**

पुस्तक

# एक प्रवास : एक शोध

लेखक – अप्पासाहेब पंत : अनुवाद – सौ. नलिनी पंत

भारताचे माजी राजदूत श्री. अप्पासाहेब पंत यांनी लिहिलेले 'एक प्रवास-एक शोध' हे आत्मचरित्रात्मक पुस्तक नुकतेच वाचले. ते आवडले. वैशिष्टयपूर्ण वाटले म्हणून त्यावरील माझा अभिप्राय आपणाकडे सुपूर्द करीत आहे.

पुण्याजवळच्या औंधनामक लहानशा संस्थानचे अप्पासाहेब हे राजपुत्र. त्यांचे वडील श्री. भवानराव पंतप्रतिनिधी. हे त्यांच्या अनेक सद्‌गुणांबद्दल महाराष्ट्राला परिचित. त्यांची बलोपासना, नमस्कारांचा अट्टाहास, शिस्तप्रियता, कलाप्रेम, प्रजाहिताविषयीची दक्षता, विद्वज्जनांविषयीचा आदरभाव हे सारे गुण आदर्शवत् असे होते. अशा थोर राजाच्या पोटी जन्माला येणे हीच मुळी परमभाग्याची गोष्ट–अर्थात या परमभाग्याच्या नाण्याला दुसरी बाजूही असू शकते; पण अप्पासाहेबांनी मात्र जन्मजात लाभलेल्या सुसंधीचा कमकसा सदुपयोग केला, जीवनाचा प्रवास सन्मार्गावरूनच व्हावा यासाठी कोणता त्याग केला गांधीजींच्या कठीण सत्त्वपरीक्षेलाही ते कसे सामोरे गेले आणि त्या संचिताचा विनियोग राजदूत म्हणून काम करताना कसकसा होत गेला याचा एक अकृत्रिम, नितांत सुंदर असा आलेख या पुस्तकात आढळतो. भारत स्वतंत्र झाल्यापासून अप्पासाहेबांनी राजदूत म्हणून काम केलेले आहे. पृथ्वीच्या पाठीवर त्यांनी भरपूर प्रवास केला आहे. राजदूत म्हणून काम करताना आलेल्या अनुभवांचे सार या पुस्तकात मराठी वाचकांना वाचायला मिळते. त्याबद्दल वस्तुतः सौ. नलिनीबाई पंत यांचे आभार मानले पाहिजेत. कारण मूळ पुस्तक इंग्रजीत आहे. (The moment in time) सौ. नलिनीताईंनी त्याचा स्वैर अनुवाद मराठी वाचकवर्गासाठी पेश केला आहे.

सुरुवातीच्या अर्पणपत्रिकेपासूनच वाचक भावमंत्रित होतो. शुद्ध काव्यात्म मनाच्या सान्निध्यात पोहोचतो आणि ती भाववृत्ती अखेरपर्यंत टिकून राहते हे या पुस्तकाचे फार मोठे यश आहे. अर्पणपत्रिका सामान्यतः कोणी आवर्जून वाचीत नाही–पण या पुस्तकाची अर्पणपत्रिका म्हणजे अप्पासाहेबांच्या कृतज्ञतेचा मनोज्ञ आविष्कार आहे–एक स्वतंत्र गद्यकाव्यच आहे ते. आपल्या जीवितप्रवासाचे सिंहावलोकन करताना त्यांना प्रथम स्मरण होते ते औंधच्या स्वाभिमानी, गरीब जनतेचे ! 'ऑक्स्फर्डमधल्या माझ्या खर्चात औंधची त्या वेळची २०० कुटुंबे सुखासमाधानाने जगली असती' ही या राजपुत्राला जाण आहे; ऋण फेडण्यासाठी तो बद्धपरिकर आहे...ही उदात्तता केवळ दुर्मिळच म्हणायला हवी. 'मी बोलतो तसा वागतो की नाही हे पाहत राहणारी माझी मुले...मला सतत आव्हान देणारी...' हा स्वतःच्या मुलांचा उल्लेख विलक्षण अर्थपूर्ण आहे ! स्वतःच्या जीवनात अप्पासाहेबांनी जी जी मूल्ये पवित्र, उदात्त, रमणीय, ऊर्जस्वल अशी मानली, त्या सर्वांना हा चिंतनशील ग्रंथ समर्पित केलेला आहे.

अप्पासाहेबांच्या जीवनानुभवात इतकी विविधता आहे की, त्यामुळे पुस्तकाशी वाचक नुसता बांधला जातो ! वाचकांची जिज्ञासा सारखी जागी राहते–ती पुरेशा प्रमाणात शमविलेली मात्र नाही–श्री. पंतांजवळ सांगण्यासारखे खूप आहे; पण निवेदनात त्यांनी आपला हात फार आखडता घेतलेला आहे. त्यांनी सबंध जीवनप्रवासाचे वर्णन अवघ्या १५४ पानांत उरकावे ही गोष्ट मनाला मुळीच पटत नाही. त्यांनी आणखी कितीही तपशीलवार लिहिले असते तरी अनुभवाच्या विविधतेमुळे आणि सुंदर शैलीमुळे ते वाचनीयच ठरले असते.

प्रस्तुत पुस्तकात अनेक संस्मरणीय घटनांचा उल्लेख आहे. त्या घटना लेखकाला जितक्या आशयसंपन्न वाटतात, तितक्याच वाचकांनाही हृद्य वाटतात. उदाहरण म्हणूनच सांगायचे झाले तर–नमस्काराचे व्रत घेण्याचा प्रसंग, बेचाळीसच्या चळवळीसंबंधीचा रोमांचकारी तपशील, औंधमध्ये राजेसाहेबांनी केलेल्या स्वराज्यदानाचा अलौकिक प्रयोग, कोयनांगे या आफ्रिकन पुढाऱ्याने दाखविलेली पित्याची जवळीक आणि त्याला अप्पासाहेबांनी दिलेला अकृत्रिम भावपूर्ण प्रतिसाद–रिम्पोचे यांच्या अध्यात्मिक शक्तीचा आविष्कार, महात्मा गांधींशी झालेली जवळीक, त्यांनी दिलेले अहिंसेचे व्रत, महिना ५० रुपयांपेक्षा जास्त पैसे स्वतःवर खर्च न करण्याचा राजपुत्राचा निर्धार–इस्लामसंबंधीची आस्था, पाऊस थांबविणारे आजो रिम्पोचे, अल् अझर या प्राचीन युनिव्हर्सिटीत दिलेले व्याख्यान, राजदूत म्हणून काम करीत असता घरी दिलेले सूर्यनमस्काराचे प्रात्यक्षिक 'aura' संबंधीचे आशयपूर्ण विवेचन–एक ना दोन–किती प्रसंगांचा उल्लेख करावा ? अखेरची दोन प्रकरणे हे या पुस्तकाचे बलस्थान. त्यात आपल्याला एक अनुभवसंपन्न, विवेकी, संवेदनाशील असा तत्त्वचिंतक दिसतो. राजदूतांनी देशहिताविषयी दक्ष राहण्यासंबंधीच्या सूचना अर्थपूर्ण आहेत. भारताजवळ परदेशांना देण्यासारखे काय आहे आणि त्यांच्याकडून अनुकरण करण्यासारखे काय आहे यासंबंधीही श्री. पंत यांनी विवेचन केलेले आहे. परदेशांत जाणारे लोक पुरेसे जाणीवपूर्वक वागत नाहीत म्हणून त्यांना एक खंत आहे–अन् ती दूर कशी करता येईल यासंबंधीच्या विधायक सूचनाही त्यांनी दिल्या आहेत. त्यांचा विचार होईल तर भारताची प्रतिमा थोडीशी तरी उजळू शकेल.

'व्यक्तिमत्त्वाच्या अदृश्य लहरी' आणि 'माझ्या आयुष्यात गांधीजी' ही प्रकरणे विलक्षण चित्तवेधक उतरली आहेत. व्यक्तिमत्त्वाच्या अदृश्य लहरी असतात ही गोष्ट

तर खरी आहे. त्यासंबंधी इतके सोदाहरण वाचायला मिळाले हे विशेष. मला वाटतं या अदृश्य लहरी जाणवणाऱ्या माणसांची मनेही तितकीच संवेदनशील असायला हवीत—एका विशिष्ट, शुद्ध अध्यात्मिक पातळीवर पोहोचणारांनाच हा 'aura' दिसू शकत असावा. म्हणजे aura पूर्णतया objective नसावा—पाहणाऱ्याच्या दृष्टीवरही थोडयाफार अंशाने अवलंबून असावा—अजो रिम्पोचे, गांधीजी, नेहरू यांच्या aura बद्दल वाचताना भारतीय वाचकाला विशेष प्रकारचा आनंद होतो. मात्र या अध्यात्मिक अनुभवांच्या जोडीला राजकीय पेचप्रसंगांचाही उल्लेख का केला नाही हा प्रश्न पडतो. आंतरराष्ट्रीय पेचप्रसंगांसंबंधी काही विशेष भाष्य केले असते किंवा ते प्रसंगच स्पष्ट केले असते तर पुस्तकाचा आशय आणखी मौल्यवान झाला असता. याबाबतीत न्या. छगलांच्या Roses in December ची आठवण येते. मी काही तुलना करण्याच्या उद्देशाने छगलांच्या पुस्तकाचा नामनिर्देश करीत नाही. फक्त अधिक मोकळेपणाने, हातचे न राखता लिहिलेले पुस्तक दर्शवून देते. अर्थात दोघांच्या भूमिकाच वेगळ्या आहेत. छगलांनी ते सरळ आत्मचरित्र—महत्त्वाच्या स्मृतींची मालिका—सादर केली आहे. अप्पासाहेबांनी सबंध जीवन हा एक प्रवास मानून फक्त नव्या प्रवासातले, नव्या जगातले काही टप्पे दाखविले आहेत. राजकारणी अनुभव न लिहिणे यातही काही खास राजकारण आहे की काय अशी शंका येते.

एक—दोन त्रुटींचा उल्लेख करायला हवा. हा लेखक म्हणजे आदर्श राजाचा आदर्श सुपुत्र आहे. वडिलांविषयीची अपार भक्ती हा त्यांचा जवळजवळ स्थायीभाव. आदर्श पुत्र म्हणून अप्पासाहेब कसे वागले ते निरनिराळ्या प्रसंगांतून दिसते; पण मनात प्रश्न येतो की येथे फक्त आदर्श पितापुत्रांची जोडीच तेवढी का दिसते? वडिलांच्या शिस्तीत तयार झालेला हा आदर्श राजपुत्र पतीच्या आणि पित्याच्या भूमिकेत अजिबात दिसत का नाही? या दोन्ही भूमिकांबद्दल अप्पासाहेबांनी इतके मौन का पाळले?—की त्यांना या भूमिका गौण वाटतात?—की ते वडिलांच्या आदराशीच 'Fixated' असे झाले आहेत?

दोन संदर्भांवरून सौ. नलिनीताई या डॉक्टर असाव्यात असे समजते. मग या डॉक्टरी शिकलेल्या मुलीची राजदूताची पत्नी झाल्यावर काय गडबड उडाली? त्यांच्या ज्ञानाचा त्यांना कितपत विनियोग करता आला? तत्संबंधी संघर्ष निर्माण झाले का? अन् त्यातून मार्ग कसा काढला हे सारे निवेदन आवश्यक होते. त्याचप्रमाणे सतत भ्रमंती करणाऱ्या राजदूताच्या मुलांची खास सुखदुःखे काय असतात, कौटुंबिक जीवनावर काय परिणाम होतो, विद्याभ्यासावर काय संस्कार होतात यासंबंधी अप्पासाहेबांनी निष्कारण मौन पाळले आहे.

अप्पासाहेबांचा मराठी मंडळींच्या सामान्य ज्ञानावर गैरवाजवी विश्वास आहे. त्यामुळे आफ्रिकेतील मावमाव-चळवळ, अशियन गेम्सचे प्रकरण—याचे कोणतेही स्पष्टीकरण देण्याची त्यांना गरजच वाटत नाही. वस्तुत: तशी गरज आहे. वाचकांच्या स्मरणातून ह्या घटना पुसून गेलेल्या असतात—त्यांना थोडा उजळा मिळाल्याशिवाय घटनांचा संपूर्ण संदर्भ लक्षात येत नाही. रिम्पोचे यांच्यासारख्या आध्यात्मिक व्यक्तींप्रमाणेच काही राजकारणी व्यक्तींचा परिचय झाला असता तर बरे झाले असते.

रूढ अर्थाने हे काही अप्पासाहेबांचे आत्मचरित्र नाही. जीवनाकडे 'प्रवास' या दृष्टीने पहाताना जे प्रसंग अर्थपूर्ण वाटले तेवढेच येथे पेश केले आहेत. ही पेशकारी इतकी अस्सल आहे की संपूर्ण जीवनपट पहाण्याची उत्सुकता लागून रहाते. तेव्हा श्री. अप्पासाहेबांना विनंती ही, की त्यांनी मनमोकळेपणाने आत्मचरित्र लिहावे. त्याचे स्वागत करण्यास आम्ही उत्सुक आहोत. तुमचा 'प्रवास अन् शोध' वाचून जितके समाधान वाटले, तितकीच हुरहूरही वाटत राहिली--व्यक्ती म्हणून तुमच्यासारखा आदर्शवादी राजपुत्र कसा जगला हे आम्हाला समजायला हवे आहे.

अखेर सौ. नलिनीबाई पंत यांना विशेष धन्यवाद. त्यांच्या प्रयत्नामुळेच हा 'प्रवास' सर्वसामान्य मराठी वाचकांपर्यंत पोहोचला आहे.

—सुमती देवस्थळे

**एक प्रवास—एक शोध**

प्रकाशन—ओरिएंट लाँगमन्स लिमिटेड

किंमत—अठरा रुपये




# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### ३११।७६ ते ६।२।७६

### मध्यवर्ती मंत्रिमंडळातील बदलाच्या हालचालींना वेग

पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी वीस कलमी कार्यक्रमाच्या परिपूर्तीचा ध्यास घेतला आहे, ही त्यांच्या व भारताच्या सामर्थ्याची एक झलक आहे. त्यामुळे या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीला वेग आणण्यासाठी त्यांना कॉंग्रेस संघटनेत आणि मध्यवर्ती मंत्रिमंडळात आवश्यक बदल करावे लागले तर त्याची चाहूल या आठवड्यात लागेल. महाराष्ट्र व दिल्ली येथे हे बदलाचे आश्चर्यकारक धक्के जाणवतील, असे मकर राशीच्या एकूण ग्रहमानावरून वाटते. भारताच्या राजकीय क्षितिजावर एखादी नवी व्यक्ती झळकण्याची शक्यता आहे. विरोधी पक्षात काही प्रमाणात आत्मसंशोधनाला सुरुवात होईल. आर्थिक गुन्हे पुन्हा भराभर उजेडात येतील. प्रामुख्याने बडी धेंडे 'चमकतील' असे दिसते. व्यापार व उद्योग यांना चोरपावलांनी मंदीची छाया रेंगाळू लागणार आहे. परराष्ट्रीय राजकारणात भारताची प्रतिमा उंचावेल असे काही तरी घडेल.

---

**मेष** : अपेक्षा पुऱ्या होतील

खरे म्हणजे मेष व्यक्तींनी कुरकुरत राहावे असे काही त्यांच्या भविष्यात नाही. एक गुरू तेवढा बारावा आहे. पण तो प्रतिकूल असे काही घडवणार नाही. सामान्यतः हा आठवडा अपेक्षापूर्तीचा आहे. अनेक दिवस मनात बाळागलेल्या इच्छा–अपेक्षा पुऱ्या होण्याचाच हा आठवडा आहे. आर्थिक परिस्थितीचा एवढा धसका घेऊ नका. जमा आणि खर्च यांचा मेळ अगदी बरोबरच येईल असे नव्हे, तरी पण पैशासाठी काही तुम्हाला फार त्रास पडणार नाही. गरजा भागतील. गरजेपुरता पैसा सहज मिळेल. कोर्टकचेरी-स्थावरजंगम-इस्टेटची कामे मार्गी लागतील. महत्त्वाचा पत्रव्यवहार या वेळीपार पडेल. गाठीभेटी सहज होऊन जातील. नोकरी–धंद्याची परिस्थिती एकंदरीत समाधानकारक राहील. महिलांना संसारात व कौटुंबिक जीवनात काही तरी समाधान मिळवून देणारा आठवडा आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यासात मात्र जास्त काळजी घ्यावी.

**वृषभ** : पाऊल पुढेच पडेल

अकरावा गुरू आणि तिसरा शनी तसेच भाग्यस्थानी रवी असा सारा ग्रहसमुदाय तुमच्या मदतीसाठी सज्ज असताना तुम्ही हातपाय गाळून स्वस्थ का बसता? उलट तुमच्या मागे आता ग्रहांचे एवढे सामर्थ्य उभे आहे की, थोडी आक्रमक वृत्ती धारण करा व कामाला लागा. फार छान असा काळ आता तुमच्या वाट्याला येत आहे. त्याचा तुम्ही फायदा घ्या. अनेक दिवस ज्या एका प्रश्नाने तुमचे मन व्यापून टाकले आहे त्यातून उकल होण्याची सुचिन्हे या आठवड्यात दिसू लागतील. आर्थिक परिस्थिती झपाट्याने सुधारू लागेल. व्यवसायातील जुनी थकबाकी वसूल होईल. नोकरीच्या दृष्टीने प्रगतिकारक अशी महत्त्वाची घटना घडेल. बेकारांना आनंद वाटावा अशी मदत मिळावी. महिलांना आर्थिक परिस्थितीचा ताण यापुढे फारसा घडणार नाही. विद्यार्थ्यांना नव्या सुसंधी मिळतील.

**मिथुन** : संकटे टळतील

बारावा मंगळ अनेक संकटे निर्माण करणार आहे व तो सध्याहि करीत असेल; पण गुरू तुम्हाला अनुकूल असल्यामुळे कोणत्याच संकटाने तुम्ही खचून जाऊ नये असे मला मुद्दाम तुम्हाला सांगावेसे वाटते. संकटातून निवारणारा परमेश्वर तुमच्या पाठीशी उभा राहील. नोकरीधंद्यात काही अडचणी असल्या तर त्या हळूहळू कमी होतील. वरिष्ठांनी तुमच्या बाबतीत काही निर्णय घेतले असतील तर त्यांना त्याचा फेरविचार करणारी बुद्धी होईल. नोकरीत सेवानिवृत्तीस आलेल्या लोकांना मुदतवाढ मिळेल. आर्थिक परिस्थिती थोडीफार तंगीची राहिली तरी गरजा भागतील. स्वतंत्र उद्योगात प्रगतीची चिन्हे दिसू लागतील, पण सध्या तरी ती मंदगती असेल. महिलांना मानसिक त्रास आहे. आपले काम की आपण या पद्धतीने वागावे.

**कर्क** : अडथळे दूर होतील

पहिला शनी, अकरावा मंगळ आणि सातवा रवी अशी छान ग्रहरचना आहे. यश आणि प्रगती या दोन्ही चक्रांवर तुमची गाडी भरधाव सुटणार आहे. आशाआकांक्षा, उराशी बाळगलेली स्वप्ने आता पुरी होण्याचा हा काळ आहे. सोमवार ते गुरुवार महत्त्वाच्या कामात प्रगती होईल. व्यवसायाच्या बाबतीत बोलणी, चर्चा करायला हे दिवस अनुकूल आहेत. नोकरीत वरिष्ठांबरोबर जवळचे संबंध प्रस्थापित होतील. परदेशप्रवासाचे बेत आखत असाल तर त्यासंबंधीच्या प्रयत्नाला यश येईल. पैसा गरज भागवील. चैनीचे विचार मनात घोळतील. महिलांनी या आठवड्यात लॉटरीत भाग घ्यावा. नशीब उजळेल असे ग्रहमान आहे. विद्यार्थ्यांना या आठवड्यात चांगला अनुभव येईल.

**सिंह** : प्रतिकूलता जाणवणार आहे

साडेसातीचा खरा त्रास आता तुम्हाला जाणवायला लागणार आहे. साडेसाती ही माणसाला शहाणे व सावध करते. म्हणून तुम्ही बावरून न जाता रोज मारुतिस्तोत्र वाचा, मारुतिदर्शन घ्या व स्वतःच्या कुलदेवतांची भक्तिभावाने भक्ती करा. हे केल्यानंतर साडेसाती तुम्हाला सुसह्य होईल. या आठवड्यात नोकरीच्या बाबतीत काळजी घ्या. स्वतःच्या कामाशी प्रामाणिक राहा. पैशाचे व्यवहार प्रामाणिक ठेवा आणि कोणताही मोह टाळा. व्यवसायात अकस्मात अडचणी निर्माण होतील. नोकर-चाकर आयत्या वेळी गैरहजर राहून तुम्हाला थोडाफार फटका बसेल. पैशाची परिस्थिती मात्र अगदीच वाईट नाही. गाठीभेटी यशस्वी होतील. महिलांना नोकरीत बदलीचा संभव आहे. विद्यार्थ्यांना परीक्षेत आयत्या वेळी विस्मरण होण्याची शक्यता.

**कन्या** : विवंचना कमी होतील

रवी पाचवा आहे. मंगळ भाग्यात आहे. साधारण ग्रहाचे पाठबळ तुम्हाला आहे. त्यामुळे विवंचना कमी होतील. महत्त्वाच्या

अर्जासाठी किंवा गाठीभेटीसाठी हा आठवडा अनुकूल आहे. नोकरीत तुमचे मागणे वरिष्ठांकडे आणि मालकांकडे मांडा. तुमचा चांगला प्रभाव पडेल. लेखक, पत्रकार यांच्या उत्कर्षाचा हा काळ आहे. वाङमयाला मागणी येईल व ती पुरवता पुरवता तुम्हाला नाकी नऊ येतील. पत्रकारांच्या अनेक मागण्या पुऱ्या होतील. नोकरीत कामाचा बोजा फारसा वाटणार नाही. आर्थिकदृष्ट्या हा आठवडा साधारणच आहे. पत्रव्यवहार व महत्त्वाच्या गाठीभेटी होतील. महिलांना शारीरिक स्वास्थ्य गवसेल. आजार कमी होईल. विद्यार्थ्यांना प्रगतिकारक आठवडा आहे.

**तूळ : महत्त्वाचे स्थित्यंतर**

हा आठवडा आपणास व्यावसायिक प्रगतीचा जाणार आहे हे लिहायला मला आनंद वाटतो. चौथा रवी जरी मानसिक अस्वस्थता निर्माण करणारा असला तरी तो तुमचे व्यवसायाचे अगर नोकरीचे असे कोणतेच नुकसान करणार नाही. घडले तर थोडेफार अनुकूल असेच घडेल. तब्येतीचा त्रास कमी होईल. आर्थिक बाजू अगदी भक्कम नसली तरी पैशासाठी नाटयकलावंत व गायक यांच्या लोकप्रियतेत भर पडेल. अनेक कलावंतांना पहिली प्रसिद्धी मिळेल. प्रवासात अनेक नव्या ओळखी होतील. राजकारणी लोकांना प्रतिष्ठा मिळेल. स्पर्धा करावी लागणार नाही. कापडाचे व्यापारी, सौंदर्यप्रसाधनाचे व्यापारी यांना हा आठवडा खूपच प्रगतीचा जाणार आहे. महत्त्वाचा पत्रव्यवहार करा. अनेकांचे दिवस या वेळी मार्गी लागतील. महिलांना मनासारखे दागिने या वेळी करता येतील. विद्यार्थ्यांना कला-क्षेत्रात प्रसिद्धी मिळेल.

**वृश्चिक : उद्योगात प्रगती**

तिसरा रवी तुमचे सारे उद्योगाचे प्रयत्न चांगलेच यशस्वी करण्यास मदत करणार आहे. शेती, व्यापार, खताचे उत्पादन, औषधे यांत ज्यांनी पैसा गुंतवला आहे त्यांना त्याचे फळ पदरात पडणार आहे. तेलाच्या व्यापाऱ्यांना भरपूर नफा मिळेल. इंजिनियरिंग उद्योगात असलेल्या अडचणी कमी होतील. पतिपत्नी यांच्यात जर काही तंटा असेल तर तो या वेळी तडजोडीने मिटेल. मंगळवारी जमिनीच्या अगर फ्लॅटच्या खरेदी-विक्रीचा व्यवहार करा. नोकरीच्या दृष्टीने हा आठवडा जरी फारसा प्रगतीचा नसला तरी त्रासदायकही नाही. वरिष्ठां-बरोबरची भांडणे अजून काही काळ तरी धुमसतच राहतील. दुरावा मिटणे लांबणीवर पडेल. तब्येतीची काळजी घ्या. महिलांनी नोकरीत हाताखालच्या नोकरांवर विश्वासून राहू नये. सही करताना कागद तपासून घ्यावा. विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे नाहीत.

**धनु : मानसिक अस्वस्थता**

तसे या आठवड्याचे ग्रहमान वाईट नाही. परंतु आठवा शनी आहे व सातवा मंगळ आहे. त्यामुळे मनाची अस्वस्थता सारखी धुमसत राहणार आहे. त्याने तुमच्या रोजच्या जीवनात काही फारसा फरक पडणार नाही. पण अदृश्य भीती मात्र सतत शंकाकुल ठेवील. नोकरीत गुप्त शत्रू व तुमचे जवळचे म्हणवणारे मित्र तुमच्याविरुद्ध कारस्थाने रचू लागणार आहेत. जे तुमच्या-बरोबर गोड बोलत होते तेच आता तुमच्या-विरुद्ध निंदा करू लागतील. मात्र असे असले तरी तुम्ही बावरून जाण्याचे कारण नाही. तुम्ही धिम्मेपणाने काम करीत राहा. वरिष्ठांना व मालकांना तुमची बाजू पट लागेल. तब्येत जरा निराश राहील. पण तुम्ही गुरुदत्ताची उपासना करा. रात्री गीता वाचा. तुमचे मन शांत राहील. आर्थिक बाजू मात्र फारशी सुधारणार नाही. महिलांनी अफवांवर व लोक काय बोलतात यावर विश्वास ठेवू नये. विद्यार्थ्यांच्या मनाची अवस्था दोलायमान राहील.

**मकर : सामर्थ्याचा प्रत्यय**

रवी राशीत असताना तुम्ही कोणतेही धाडसी पाऊल उचलले तरी ते तुमच्या सामर्थ्याचा प्रत्यय आणून देणारेच ठरेल. राजकीय क्षेत्रात मोठी कामगिरी तुमच्याकडे येईल. लेखन व नाटक यांत तुमची लोक-प्रियता वाढेल. वृत्तपत्रीय लेखन करणारे या राशीचे लोक लेखनाने गाजणार आहेत. वरिष्ठ अधिकारावर आलेल्या व्यक्तींना नोकरीत मोठी जबाबदारी उचलावी लागणार आहे. चालू नोकरीत बढती-बदलीचा अगर प्रमोशनचा विचार करायला फारच अनु-कूलता आहे. आर्थिक बाजू जरी कम-कुवत असली तरी या वेळी तुम्हाला श्रमाचे पैसे मिळून अडचणी दूर होतील. अनेकांना या वेळी परदेशी जाण्याची सुवर्णसंधी अचा-नक येईल. शुक्रवार विशेष महत्त्वाचा आहे. महिलांना श्रमाचे चीज होत असल्याचे मोठे समाधान मिळेल. विद्यार्थ्यांना शेतीच्या अभ्यासाचे आकर्षण वाटेल.

**कुंभ : आशादायक चिन्हे**

तुमचा पिंड प्रामुख्याने राजकारणी आहे. म्हणून रवी बारावा असताना कोणतेही पाऊल उचलणे गैर ठरेल. तरी पण हा आठवडा तुम्हाला प्रगतीचा व तुमचे मनोरथ पूर्ण करणारा ठरेल. नोकरीत तुमचे पाऊल पुढेच पडेल. वरिष्ठांच्या मर्जीत तुम्ही राहाल व त्यामुळे अनेक फायदे तुमच्या पदरात पडतील. बढती-प्रमोशन असे काही तरी घडेल. या वेळी बदली झाली तरी नाकारू नका. नव्या नोकरदारांनी मात्र जरा काळजी घ्यावी. बेकारांना पैशाची मदत मिळेल. त्यांना नोकरीचे आश्वासन मिळाले तरी ते लांबणीवर पडेल. तब्येतीच्या बाबतीत असलेल्या कटकटी दूर होतील. बचत झाली नाही तरी आर्थिक बाजू लंगडी राहणार नाही. विवाहेच्छूंचे विवाह ठरतील. शनिवार व गुरुवार जास्त महत्त्वाचे आहेत. महिला-अधिकारी प्रमोशनवर बदलल्या जातील. पैसा मिळेल. विद्यार्थ्यांना संशोधनाची आवड उत्पन्न होईल.

**मीन : मनोरथ पुरे होतील**

हा आठवडा तुमचे पाऊल पुढे टाकणारा आहे. गुरू राशीत आहे तोवर विवाहेच्छूंचे विवाह ठरवू लागा. अडचणी येणार नाहीत. घरच्या कुलदेवतेला वंदन करा व मोहिमेवर जा. सर्वसाधारण हा आठवडा प्रगतिकारक आहे. लेखकांना काही तरी नवे मोठे घबाड देणारा आहे. पत्रकारांना शाबासकी मिळेल. त्यांच्या हुशारीचे कौतुक होईल. नोकरीत वरिष्ठांवर मोठे इम्प्रेशन माराल व अनेक कामे त्यामुळे जमून जातील. परदेशी जाण्याची ज्यांची इच्छा असेल त्या पत्र-कारांना अचानक शुभवार्ता कळणार आहे. नोकरीत कामाचा ताण कमी होईल. कृषि-पदवीधर, विज्ञान-पदवीधर, संशोधक यांना जर स्वतंत्र धंदा करायचा असेल तर त्यांनी अवश्य प्रयत्न करावेत. राजकारणात वावर-णाऱ्यांना मोठे पद पदरी पडण्याची शक्यता आहे. महिलांनी स्वतःचा उद्योग सुरू करावयास अनुकूलता आहे. माहेरची मदत मिळेल. विद्यार्थ्यांना खूषखबर मिळेल. परीक्षेत यश मिळेल. □ □

स्टुडिओ चक्कर । रविकिरण साने

# पोलिश दिग्दर्शकाच्या कानपिचक्या

सध्या मुंबईत चालू असलेल्या आंतरराष्ट्रीय चित्रपटमहोत्सवाचे निमित्ताने अनेक लहानथोर परदेशी मंडळी मुंबापुरीत मुक्काम ठोकून आहेत. ऋिझिस्टॉफ झानुसी ही त्यातलीच एक बडी असामी. या महोत्सवात त्यांनी दिग्दर्शित केलेली दोन उत्कृष्ट चित्रे दाखवली जात आहेत. एक आहे 'द स्ट्रक्चर ऑफ अ क्रिस्टल' तर दुसरे 'द बॅलन्स'–यापैकी बॅलन्स अधिक गाजते आहे. हे झानुसी नुकतेच हॉलिवुडचा चित्रनिर्मितीचा अनुभव घेऊन आले आहेत आणि पोलिश चित्रसृष्टीचे आघाडीचे कलावंत आहेत.

एवंगुणविशिष्ट झानुसींची नुकतीच पत्रकार आणि भारतीय चित्रसृष्टीतील नामवंतां बरोबर एक भेटवार्ता झाली. ही गप्पाष्टके गाजली दोन कारणांसाठी. एक त्यांनी सांगितलेले हॉलिवुडचे धक्कादायक अनुभव आणि दुसरे म्हणजे भारतीय चित्रनिर्मात्यांना त्यांनी दिलेल्या कानपिचक्या आणि केलेला हितोपदेश. झानुसींनी स्पष्टच सुनावले की 'भारतीय चित्रनिर्माते फालतु बाष्कळ मनोरंजन करणारी चित्रे युरोपात पाठवून स्वतःची प्रतिमा खराब करून घेत आहेत. नव्हे भारताची अत्यंत वाईट प्रतिमा त्यांनी याआधीच निर्माण केली आहे. भारताची प्रतिमा उजळावी असे त्यांना वाटत असेल तर बाष्कळ प्रेमकहाण्या त्यांनी निर्यात न करता काही तरी गंभीर विचारप्रगल्भ देणारे आम्हाला द्यावे. आमच्या मेंटॅलिटीला तेच मानवते. सत्यजित रे यांचे चित्रपट युरोपात हीट जातात यावरून तरी इतर निर्मात्यांनी तिकडे काय लागते हे समजून घ्यावे आणि आपल्या प्रतिमेला जपावे.'

पोलंडमध्ये सत्यजित रे यांच्या चित्रांचे सिंहावलोकन करणारा एखादा रेंच्या चित्रोत्सवाचा कार्यक्रम करावा असा विचार सध्या झानुसी करत आहेत. 'मायादर्पण' आणि 'गर्म हवा' ही हिंदी चित्रे सध्या तिकडे हीट ठरली असून 'कंकण' हा कन्नड चित्रपटही प्रेक्षकांनी डोक्यावर घेतला आहे अशी पुस्तीही त्यांनी जोडली.

झानुसींची हॉलिवुडमध्ये वर्णी लागली तीही अचानकच. एका व्याख्यानदौऱ्याच्या निमित्ताने ते अमेरिकेत गेले होते तेव्हाच त्यांना काही चित्रांचे दिग्दर्शनासाठी आमंत्रण मिळाले. मोठ्या मिनतवारीने साहेबांनी एक चित्र स्वीकारले. ते जेम्स हॅडले चेसच्या कादंबरीवर आधारित होते. अगदीच उथळ असणाऱ्या त्या कथेत एखादा संदेश टाकून ती थोडी तरी अर्थपूर्ण करण्याचा झानुसींचा प्रयत्न होता; पण एकूणच सारा अनुभव त्यांना उद्विग्न करणारा ठरला.

हॉलीवुडमध्ये सर्वजण अत्यंत परकेपणाने वागतात, इतकेच नव्हे तर आपला संबंध नसलेल्या गोष्टींबद्दल इतकी अनभिज्ञता दाखवतात की ज्याचे नाव ते ! टोटल इन्डिफरन्स' असे अत्यंत समर्पक शब्दात या हॉलिवुडी प्रकाराचे झानुसींनी वर्णन केले. एखाद्या दृश्यासाठी आवश्यक ते सारे काही हॉलिवुडमध्ये उपलब्ध होते, पण हे सारे काही का आणि कशासाठी मिळवायचे हेच तिथल्या तंत्रज्ञ व सहाय्यकांना उमगत नव्हते अशी कडवड प्रतिक्रिया या पोलिशसाहेबाने व्यक्त केली आहे. हॉलिवुडची चित्रनगरी म्हणजे तमाम विकसनशील देशांसाठी अद्भुत नगरीच. तेथे जे काही घडेल ते सर्व प्रमाण अशी आमचीही वृत्ती. तेथले तंत्र–मंत्र सोडून अन्य गोष्टींचेच अप्रुप आपल्याला अधिक वाटते. अशा या अद्भुत नगरीचे असे धिंडवडे या पोलिशसाहेबाने काढावे म्हणजे काय ? पण असो. हे सर्वही हा पोलिशसाहेब बोलला म्हणूनच बरे. त्यावर विश्वास तरी ठेवता येईल; पण एखादा भारतीय चित्रनिर्माता कसे काही बोलता तर ब्रह्महत्येचे पातकच त्याचे माथी येते.

झानुसींनी अशीच एक अगदी अविश्वसनीय कथा ऐकवली आहे. ही गंमत घडली ती अशी; झानुसींना बाथरूममध्ये आत्महत्या घडते असा प्रसंग चित्रित करावयाचा होता. त्यासाठी त्यांनी आपल्या सहाय्यकाला 'एक्स्ट्रॉ बल्ब' आणण्याची कामगिरी सांगितली; पण हा सहाय्यक पडला तद्दन अमेरिकन ! त्याने चक्क एक एक्स्ट्रॉ नट त्यांच्यापुढे उभा केला. कपाळावर हात मारून घेत झानुसींनी हा उद्योग तुला कोणी सांगितला ? असे विचारताच त्याने चक्क त्यांच्याकडेच बोट दाखवले ! आता एक्स्ट्रॉ बल्बच्या जागी हा नट कसा बसवायचा ? शेवटी सर्व सीन त्याला पुन्हा समजावून देऊन हा बल्ब कशासाठी आणायचा हे पुन्हा पुन्हा त्यांनी सांगितले. तेव्हा तो दीडदमडीचा बल्ब त्यांचे पदरी पडला. आता ही कथा आम्हाला तशी नवी नाही. कारण नट म्हटल्यावर नट-बोल्ट आणणारे आमच्याकडे पैशाला पासरी आहेत; पण एकूण हॉलिवुडमध्येही अशी मंडळी आहेत तर, असे म्हणायचे आणि सोडून द्यायचे झाले. चला, निदान हॉलिवुडबाबतचा आमचा भ्रम थोडा तरी कमी व्हायला झानुसींच्या वक्तव्याची मदत झाली तरी पुरे.

एकूण काय झानुसीमहाराजांनी पहिल्याच भारतभेटीत आम्हाला चार गोष्टी सुनावल्याच; पण हॉलिवुडचा बुरखा फाडायलाही कमी केले नाही. यावरून शिकण्यासारखे खूप आहे. ◻

## नीतू-चिंतूची जोडी फुटणार ?

फिल्मी जगतात सध्या गाजत असलेली नीतू सिंह आणि चिंतू कपूर यांची जोडी लवकरच फुटणार असा रंग दिसत आहे. गेली तीन वर्षे चिंतूबरोबर आपले नाव येत राहील अशी सतत काळजी घेणाऱ्या नीतूचे नाव हळूहळू बाजूला पडत आहे असे जाणवू लागले आहे.

बॉबी जेव्हा विक्रमी यश मिळवत होता तेव्हाच नीतू व चिंतू एका सेटवर एकत्र आले होते. माणसांची अचूक पारख असलेल्या आणि फिल्मी अफवांवर स्वार होऊ शकणाऱ्या राजकपूरने नीतू-चिंतूबद्दल एक वार्ता हवेत सोडून दिली. बॉबी हिट गेला तरी बॉबी डिंपल घरेलू औरत बनल्यामुळे तिच्या नावाचा गाजावाजा पुढच्या चित्रांना फारसा उपयोगी

पडणार नव्हता आणि कपूरच्या नावाशी एखादे नवे नाव घोळवले जात नाही हेही त्याला फारसे पटणारे नव्हते. नेमक्या अशा वेळीच नीतू सर्वांसमोर आली. तिची प्रतिमा एक सेक्सी ग्लॅमर गर्ल अशीच निर्माण झाली असल्याने हे प्रकरण त्या वेळी तरी राजच्या फायद्याचे होते; पण एके दिनी चक्क भलतेच घडले. नीतूबरोबरच्या आपल्या नावामुळे वहकलेल्या चिंटू कपुरांनी चक्क सेटवर तिचे दीर्घ चुंबन घेतले आणि पाहता पाहता नीतूचा भाव एकदम वधारला. चक्क लाखाचे घरात गेला ! डझनभर चित्रे तिने त्या वेळी साइन केली. राजने ' पुन्हा सेटवर कोणाचे चुंबन घेऊ नको. तुझ्या चुंबनाची किंमतही फार मोठी आहे ' असा चिंटूला दमही भरला म्हणे! हे पुढचे खरे की खोटे कोण जाणे; पण या चुंबनाने नीतूचा भाव वधारला एवढे मात्र निश्चित आणि आणखी २१४ चित्रांत जी कदाचित बाहेर फेकलीही गेली असती ती नीतू चक्क पाय रोवून उभी राहिली एवढे मात्र नक्कीच खरे!

त्या वेळेपासून नीतूने मात्र आपले नाव सतत चिंटूबरोबर येत राहील असे प्रयत्न चालू ठेवले. त्या दोघांबद्दल उठणाऱ्या वार्ता, अफवा यांचे खंडण करायचे नाही असा मुत्सद्दी पवित्राही घेतला. बर्थ डे पार्टीत केक कापायला चिंटू हवाच आणि तोही प्रेमाने केकचा पहिला तुकडा स्वहस्ते तिच्या मुखात घालीत असे. केकचे एक जाऊ दे; पण शँपेनची बाटली फुटायची तीही चिंटूच्याच हस्ते आणि हे सारे वर्णन फोटोसहित छापले जाते आहे. फिल्मी पत्रकार आपल्या दोघांच्या नावांशी खेळतायत हे ती कटाक्षाने पाहायची. वरं एवढे सगळे करून त्यांच्या लग्नासंबंधी कोणी विचारलेच तर त्यावर मौन! मात्र जाता जाता एक मिस्किल उडते वाक्य टाकून सगळ्यांना गारद करणार ' हम अपनी शादी अपने कौममेही करेंगे ' म्हणजे बघा! पण चिंटूच्या चुंबनाने वधारलेला नीतूचा भाव किती दिवस टिकणार ?

चिंटूच्या नावाचा फायदा आता नीतूला मिळणार नाही एवढे मात्र निश्चित. आर. के. च्या नव्या चित्राच्या यादीत नीतूचे नाव वरच्या क्रमांकाने झळकत होते. खेलखेलमेच्या यशामुळे तिचेच नांव निश्चित होणार हे सर्वजण गृहीत धरून होते; पण झाले भलतेच ! या नव्या चित्रासाठी निवड झाली ती झीनत अमानची आणि नीतूचे नाव चक्क यादीतून कटाप ! आर. के. चा आधार गळून पडल्यामुळे तिच्याकडे येणारे चित्रपट थांबले आहेत. ग्लॅमर गर्ल ही स्वतःची प्रतिमा बदलून तिने काही नवे कौशल्य दाखवले नाही तर लवकरच तिची छुट्टी होण्याचीच लक्षणे सध्या दिसत आहेत. सध्या तिच्या दृष्टीने आशादायक गोष्ट एकच व ती म्हणजे शशीकपूर, डब्बू, धर्मेंद्र, जीतेंद्र, राजेश खन्ना अशा सर्व आघाडीच्या अभिनेत्यांबरोबर ती सध्या कामे करीत आहे. यातलीच एखादी फिल्म हीट गेली तर तिचे नशीब पुन्हा उजळेलही ! पाहू या ती नवा मार्ग काय शोधते ते. ¤

## जुन्या चित्रांची पुनर्निर्मिती

जुन्या काळी हीट गेलेले एखादे चित्र नव्या नटसंचात पुन्हा काढले तर पूर्वीसारखीच धमाल उडवून देईल का ? अशा चित्रांचा आजपर्यंतचा इतिहास तरी याचे नकारार्थीच उत्तर देतो. इतर चित्रांचे कशाला ? हिंदी चित्रसृष्टीतला महत्त्वाचा टप्पा मानल्या गेलेल्या देवदासचे उदाहरण आपल्यासमोर आहेच ना ! देवदासच्या आतापर्यंत एकूण सात चित्रआवृत्त्या निघाल्या. पहिले तर मूक चित्रच होते; पण उरलेल्या सहांपैकी स्व. कुंदनलाल सहगलचा देवदास तेवढा हीट ठरला. त्यानंतर वीस वर्षांनी आलेला बिमल रायचा देवदास मात्र तितका उचलला गेला नाही. खरे तर बिमलजींचे त्या वेळी मोठे नावं झाले होते. शिवाय दिलीपकुमार, सुचित्रा सेन, वैजयंतीमाला अशी जबरदस्त स्टार कास्ट त्यांनी निवडली होती; पण सहगलच्या चित्राचे यश त्यांना मिळाले नाही.

या गाजलेल्या देवदासची कथा शरच्चंद्रांच्या कादंबरीवर आधारित होती. शरतबाबूंची अशीच गाजलेली कादंबरी म्हणजे 'परिणीता'. या कथेवर स्व. बिमल राय यांनी काढलेला 'परिणीता' हाच चित्रपट जास्त गाजला होता. आता याच कथेवर आधारित 'संकोच' नावाचा एक नवा चित्रपट येतो आहे. याचे दिग्दर्शन 'कोरा कागज'चे प्रतिभावान दिग्दर्शक अनिल गांगुली करणार आहेत. नायक आहे जितें आणि नायिका सुलक्षणा पंडित. जुन्या चित्रांच्या पुनर्निर्मितीबाबतचा आतापर्यंतचा अनुभव प्रमाण मानायला संकोचचे निर्माते आर. के. सोरल मात्र तयार नाहीत. ' विषयाच्या मांडणीत जोपर्यंत नावीन्य आहे तोपर्यंत चांगला विषय एकदाच का हजारदा चालला पाहिजे ! ' असा सोरलांना विश्वास आहे. म्हणून तर साधाच जुना विषय नव्या धाटणीने हाताळणारे अनिल गांगुली त्यांनी हाताशी धरले आहेत.

' बिमलदांच्या परिणयशी स्पर्धा करावी असा आमचा उद्देश नाही. ' गांगुलींनी स्पष्टीकरण केले. ' मी कथेचा मूळ गाभा तसाच ठेवणार आहे; परंतु सद्यःस्थितीत जे फेरफार आवश्यक आहेत ते करायला मात्र मी मागेपुढे पाहणार नाही. ' आता या फेरफारांचे स्वरूप आणि प्रमाण काय राहणार यावर मात्र गांगुली आताच काही बोलायला उत्सुक नाहीत. पाहू सोरलांचा विश्वास किती सार्थ ठरतो ते.

एकीकडे परिणयवर नवे चित्र निघत असतानाच आणखी एका जुन्या गाजलेल्या चित्राच्या पुनर्निर्मितीची घोषणा झाली आहे. हे नवे चित्र आहे सोहराब मोदींचे ' पुकार. ' जुन्या जमान्यात या पुकारने लोकांना वेड लावले होते. त्या वेळी चंद्रमोहन जहाँगीरच्या भूमिकेत होते तर नसीम नुरजहाँच्या. स्वतः सोहराब मोदी संग्रामसिंहची भूमिका करीत होते.

नव्याने पडद्यावर येत असलेला ' पुकार ' म्हणजे जंगी शिकारखानाच आहे. तमाम सुपरस्टार्स यात हजेरी लावून आहेत. सोहराब मोदी स्वतः पूर्वीचीच म्हणजे संग्रामसिंहची भूमिका करणार आहेत. जहाँगीरच्या भूमिकेत दिलीपकुमार तर नूरजहाँच्या भूमिकेसाठी सायराबानूची निवड झाली आहे. राजकपूर, प्राण, संजीवकुमार ही बडी त्रयी खास पाहुणे कलाकार म्हणून त्यात चमकणार आहे. राजकपूर बनणार आहे धोबी. प्राण उदयसिंह आणि संजीव हैदरअल्ली. याशिवाय शशीकपूर मंगलसिंहाची भूमिका करणार आहेच. लोकांच्या सर्वांत आवडत्या कुँवरच्या भूमिकेत शबाना आझमी दिसणार आहे, तर धोबन आहे राखी.

या प्रचंड स्टार कास्टवरच ही नामावळी संपत नाही. जुन्या पुकारसाठी चित्रकथा,

संवाद-लेखनाचे काम ज्या कमाल अमरोहींनी केले होते तेच कमालसाब याही पुकारसाठी लेखणी उचलत आहेत. तेव्हा संवादांची फेक तर जबरदस्त ऐकायला मिळणार एवढे निश्चित. जान निस्सार अख्तर पुकारसाठी गीते लिहीत आहेत. या महत्त्वाकांक्षी निर्मितीसाठी सेट्सची जुळवाजुळव करत आहेत. राम येडेकर आणि आर. के.चा जबरदस्त कलर फोटोग्राफर राधू करमकर पुकारवर अँगल साधून वाहे.

सोहराबजींच्या मिनर्व्हा मुव्हिटोनचा ट्रेडमार्कच आहे गर्जना करणारा सिंह मोदीसाब नेहमीच म्हणतात सिंह आजारी असो, नाही तर भुकेला असो तो गर्जना करणारच. निदान मोदींचा सिंह पुकारचे निमित्ताने पुन्हा गर्जायला तरी लागला आहे. मात्र फक्त तो पूर्वीसारखाच गरजतो का म्हातारा झाला आहे हे यथावकाश कळेलच. ◻

## पॉसिडोन अॅडव्हेंचर

पाश्चात्य चित्रसृष्टीमध्ये सध्या अरिष्टपटांची एक नवी क्रेझच आली आहे. मानवी समूहावर कोसळणाऱ्या भीषण, सर्वसंहारक नैसर्गिक वा मानवनिर्मित अरिष्टांमधून त्या मानवसमूहाची सुटण्याची धडपड असे सर्वसाधारण सूत्र या सर्वच चित्रपटांमध्ये आहे. अशाच अरिष्टपटातला पॉसिडोन अॅडव्हेंचर हा एक. एका सत्य घटनेवर आधारित.

हे अॅडव्हेंचर घडते ते भर समुद्रात. पॉसिडोन ही ग्रीक बोट न्यूयॉर्कपासून अॅथेन्सकडे चालली आहे. वर्षअखेरची रात्र आहे. जुने वर्ष संपवून त्याला निरोप देऊन नव्या वर्षाच्या स्वागतासाठी सर्व प्रवासी आतुर झाले आहेत. खाद्यपेयांची रेलचेल चालू आहे. नाचगाण्यांची धमाल उडाली आहे. प.र्टींची रंगत आणि जोष वाढत वाढत चालला आहे. १२ च्या ठोक्याला त्याचा उत्कर्षबिंदू गाठण्यासाठी सर्व बेभानपणे नाचताहेत. एकीकडे बोटीवरच्या मुख्य हॉलमध्ये हा जल्लोष चालू असतानाच एंजिनरूममध्ये वातावरण गंभीर बनले आहे. एक खळबळजनक वार्ता धडकते. 'सुमारे १३० मैलांवर समुद्रांतर्गत प्रचंड भूकंप झाला आहे!' विलक्षण काळजीयुक्त स्वरात विचारणा होते, 'बोटीला कोणता धोका नाही ना?' एक आश्वासक उत्तर मिळते, 'नाही; पण सावध राहा!' या संवादांच्या प्रतिक्रिया हवेत विरतात न विरताते तोच लांब अंतरावरून आकाशाला भिडू पाहणारे प्रचंड काही तरी बोटीच्याच दिशेने झेपावताना दिसते. क्षणभर सर्व एंजिनरूम दिग्मूढ होते, श्वास रोखले जातात. तोच संदेश येतो, 'भूकंपाने उसळलेली प्रचंड लाट तुमच्या दिशेने येत आहे, सावधान!' संदेश संपतो आणि ती भीषण ९० फुटी प्रचंड लाट बोट पोटात घ्यायलाच जणू उसळते आणि भयानक मारा करीत बोट उलटवून पुढे निघून जाते.

नववर्षाच्या स्वागताची आतुरता शिगेला पोहोचली आहे. शेवटचे सेकंद मोजण्याचे काम चालू आहे. तो क्षण पकडण्यासाठी सर्वजण सावधानतेने पण हसतमुखाने अत्युत्सुकतेने उभे आहेत. त्या क्षणाची टिपरी वाजवण्यासाठी ड्रमही क्षणभर थांबला आहे आणि तो क्षण वातावरणात घुमतो. प्रचंड जल्लोष होतो आणि त्याच वेळी कर्णकर्कश सायरन वाजतो. वातावरणावर एक जबरदस्त झिंग आहे. त्यातून सावरत जवळचा आधार शोधेपर्यंतच अघटित घडते. प्रचंड वेगाने सर्वजण एका बाजूकडे फेकले जातात. हॉलमधील वस्तूंसह घेतलेल्या आधाराच्या मोडक्या अवशेषांसह भयकारी वेगाने सारे एका बाजूवर आपटतात. काही क्षणांचाच अवधी जातो आणि पुन्हा एक भयकारी वेगात सर्व सापडतात. बोट संपूर्ण उलटी होते. विलक्षण चीत्कार काढीत, किंकाळ्या फोडत पुन्हा सर्वजण उलट्या झालेल्या हॉलच्या सीलिंगवर जाऊन कोसळतात. भीषण किंकाळ्यांनी हॉल घुसमटून जातो. बऱ्याच वेळानंतर एकेकजण थोडेसे सावध होतात, एकमेकाला शोधू लागता. कोण मेले, कोण जिवंत आहे याचा शोध सुरू होतो आणि मग पहिला प्रश्न उभा राहतो की यातून सुटायचे कसे? आणि येथून खऱ्या साहसाची सुरुवात होते आणि मानवी स्वभाववैशिष्ट्यांचे एक हृदयदर्शन घडते.

हॉलमधले कोसळलेले एक झुंबर उभे करून हॉलच्या एका दरवाज्यामधून बाहेर जाण्याचा प्रयत्न सुरू होतो आणि त्याच वेळी मृत्यूच्या दाढेत आपण अडकलो आहोत हे समजून देखील त्या साहसी प्रयत्नाला जबर विरोध होतो. एक विलक्षण नाट्य तेथे आकाराला येते; पण सर्वांचा विरोध पत्करून एक साहसी तरुण पुढे येतो. (जीन हॉकमन) आणि त्याच्याबरोबर आणखी आठ-दहा जण पुढे सरसावतात. यात सर्वजण आहेत. एक बोटीची माहिती असणारा तरुण आहे. बोटीवर उच्छृंखलपणे उनाडलेला एक छोटा पोरगा (इरिक शी) आणि त्याची बहीण (पामेल सु मार्टिन) अशी जोडी आहे. एक वृद्ध पतिपत्नींची जोडी आहे ज्यातली बाई जाम भेदरलेली आहे; पण उत्कृष्ट जलतरणपटू आहे. (तिचे नाव शेली विंटर्स). एक मिलिटरीमन (अर्नेस्ट बोर्गनिन) आणि त्याची आजारी बायको आहे. भावाच्या भीषण मृत्यूमुळे विद्ध झालेली बोटीची डान्सर कम सिंगर त्यात आहे. तिला संभाळून घेणारा एक म्हाताराही आहे. चित्रविचित्र स्वभावाची पण विलक्षण भेदरलेली, जिवाच्या आकांताने सुटण्यासाठी धडपडणारी; पण तरीही प्रत्येक पाऊल उचलण्यापूर्वी पुन्हा पुन्हा विचार करणारी, चर्चा करणारी, प्रसंगी हमरीतुमरीवर येणारी अशी विलक्षण स्वभावांची ही मोट बांधलीय आणि ती सांभाळतोय तगडा हिरो जीन हॉकमन. त्यांच्या वाटेने येण्यास तयार नसणाऱ्यांना तो विनवतो आहे, त्याचे शिव्याशाप ऐकवतो आहे अशाच वेळी एक प्रचंड स्फोट होऊन पाण्याचा प्रचंड वेगवान प्रवाह हॉलमध्ये शिरतो आणि पुन्हा एकदा हॉल प्रचंड किंकाळ्यांनी भरून जातो. आता मात्र सर्वजण त्या झुंबराकडे धावतात. कारण सुटकेचा तेवढा एकच मार्ग शिल्लक असतो आणि या झुंबड गर्दीमुळे एकही माणूस वर न पोहचताच ते झुंबर खाली कोसळते आणि पुन्हा एकदा आकांत उडतो. लवकर हालचाल केली नाही तर आपलीही हीच गत होईल हे समजून हॉकमनचे मार्गाक्रमण सुरू होते.

एंजिनरूमच्या दिशेने सर्वांचा प्रवास सुरू होतो आणि छोट्या छोट्या प्रसंगांतून मानवी स्वभावाचे अतिशय सुंदर दर्शन घडवत हा साहसी प्रवास चालू राहतो. बोटीत शिरणारे पाणी जबरदस्त गतीने बोटीचा ताबा घेत स्वैर धावत असते आणि जीवाच्या आकांताने

गांची धाव पुढे चालू असते. बोटीच्या प्रत्येक विभागात प्रचंड मोडतोड झाली आहे. काहीच समजत नाहीय अशा स्थितीत वेगाने मार्गाक्रमण ही एक जीवघेणी स्पर्धाच आहे जीवन आणि मृत्यू यामधली. या खेळात अनेक भीषण प्रसंग उद्‌भवतात. बोटीतले स्फोट चालूच असतात. प्रचंड आगी लागलेल्या असतात. या सर्वांना चुकवीत कधी वर, तर कधी थोडे खाली असे करीत प्रवास चालू राहतो. वाटेत २–३ जणांचे भीषण मृत्यू घडतात. पाण्याच्या खालून संपूर्ण एक विभाग पोहून पलीकडे पोहण्याच्या प्रयत्नात जलतरणपटू म्हातारीच गचकते. प्रचंड धुराड्यातून तळाकडे जाताना मार्गदर्शक माहितगार तरुण खाली कोसळतो आणि फिरणाऱ्या मृत्युचक्रात अडकतो. अखेरच्या टप्प्यात स्टीमएंजिनची गुदमरवून टाकणारी वाफ थांबवण्यासाठी अधांतरी चक्राला लोंबकळणारा साहसवीर नायकही खालच्या अग्निजलकुंडात कोसळतो; पण सुटकेचा शेवटचा मार्ग दाखवून. शेवटी तळाशी पोहोचतात व जिवंत बाहेर पडतात ते एकूण फक्त सहा जण! बाहेर एक हेलिकॉप्टर त्यांच्या शोधार्थ उभेच असते एका भीषण शोकांतिकेचा सहा जीवांच्या सुटकेत शेवट होतो. डोके चक्रावून टाकणाऱ्या साहसाने भरलेली आणि मानवी स्वभावांचे सूक्ष्म कंगोरे दाखविणारी अशी ही एक अटळ आपत्ती.

या चित्रपटाच्या निमित्ताने पुन्हा एकदा अलका चित्रगृहात इंग्रजी चित्रांचा जमाना सुरू झाला हे विशेष. पूर्वी गावात इंग्रजी चित्र म्हणजे अलकामध्येच येणार हे अगदी ठरून गेलेले. जणू इंग्रजी चित्रांचे माहेरघरच; पण मध्ये इंग्रजी चित्रांवर आयातबंदी आली आणि अलकाचे हे वैभव गेले. मग तेथे एकदम टांग टांग टांग अशा बोलावर घुंगरं नाचू लागली होती. अलकाचा हा बदलही अनेकांना रुचला नसला तरी जाम गर्दी खेचत होताच; पण आता पुन्हा अलकाचे जुने वैशिष्ट्य त्यांना परत गवसते आहे. ◻

## गीत गाता चल

सर्वसामान्य प्रेक्षकांना आकृष्ट करणाऱ्या टीनएजर्सच्या चित्रपटांपैकी ही आणखी एक कलाकृती. कथा टीनएजर्सची असूनही खूप वेगळी. काव्यमय वातावरणात नेणारी आणि पूर्वापार अध्यात्मिक कथेशी नाते सांगणारी खास कालेलकरी ढंगाची.

शाम हा एक अनाथ, उच्छृंखल तरुण. निसर्गावर विलक्षण प्रेम असणारा, नव्या नव्या दऱ्याखोऱ्या धुंडणारा, पशुपक्ष्यांशी हितगुज करणारा व निसर्गाच्या अबोध काव्यवृत्तीशी एकरूप होऊन जगणारा, त्यातच धुंद होऊन सुरेल गाणारा, मधुर बासरी वाजवून निसर्गालाही मोहिनी घालणारा. अर्थातच सर्वसामान्य मानवी व्यवहार, नातीगोती आणि व्यावहारिक संबंध यांची समज नसलेला. गावोगाव हिंडत जाणारा हा तरुण एका तमाशानर्तकीला भेटतो. तिच्या मोहपाशात न अडकता तिला दीदी म्हणून पुकारतो आणि रात्री न सांगताच पसार होतो. एका जत्रेत आमची हिंदी नायिका राधा त्याला भेटते. तिचे आईवडील त्याला घेऊन आपल्या घरी येतात. तिरस्कार आणि संघर्ष यातून त्यांचे प्रेम फुलत राहते; पण अखेर दोघांचे लग्न ठरताच निसर्गवेडा शाम पुन्हा मुशाफिरीला बाहेर पडतो; पण अखेर हे बंधन स्वीकारलेच पाहिजे याचा साक्षात्कार होऊन परत येतो असा हा सर्वसाधारण कथाभाग.

संपूर्ण चित्रभर अखंडपणे बासरीच्या धूनवर गाण्यांची बरसात चालू असते. टीनएजर्सकथेतल्या नेहमीच्या मालमसाल्याला इथे फाटा दिला आहे. चोरून भेटी, विरोध, जात, धर्म, खानदानकी इज्जत, शिक्षण, पळून जाणे, पाठलाग वगैरे येथे काहीच घडत नाही. खरे तर त्या अर्थाने फारसे काही घडतच नाही. साधे सरळ एक अबोध प्रेम फुलत राहते. कशाचाच विरोध नाही. उलट प्रोत्साहन आणि पाठिंबा यांच्या जोरावर उत्कर्षाला पोहोचते. संपूर्ण कथेला राधाकृष्णांच्या त्या चिरंतन प्रेमकहाणीची डूब देण्याचा प्रयत्न केला आहे. मग राधेला सलणारी कृष्णभक्त मीरा पण येथे आहे. अखेर ही मीराच त्याला राधेच्या प्रेमाची आठवण देते.

संपूर्ण कथा जवळपास निसर्गाच्या सान्निध्यात घडते. त्यामुळे संपूर्ण वातावरणात एक काव्य भरले आहे. त्याच्या जोडीला सुंदर चाली दिलेली सोपी गाणीही कथेला पोषक आहेत. कथा लिहिली आहे मधुसूदन कालेलकर आणि शरद पिलगावकर यांनी. चित्राचे मुख्य वैशिष्ट्य अर्थातच नवी फ्रेश जोडी सचिन आणि सारिका. दोघांनीही आपल्या भूमिका सहजतेने आणि सुंदर वठवल्या आहेत. रवींद्र जैन यांचे मधुर संगीत आणि हिरेन नाग यांचे कथा हळुवारपणे हाताळण्याचे कौशल्य यामुळे कथा सुंदर उतरली आहे. ◻ ◻




# अजय वढावकर

'चित्र-नाट्यसृष्टीत अपेक्षा वाढवणारे नाव

पुणे–मुंबईमध्ये लोकप्रिय ठरलेल्या 'अजब तुझें सरकार' ह्या मराठी चित्रपटाचा 'Teenage Hero' मास्टर सचिन आहे, तर 'Teenage Villain' आहे अजय वढावकर. चित्रपटाप्रमाणेच 'नटसम्राट'-सारख्या श्रेष्ठ नाटकातूनही अजय भूमिका करतोय. ह्या तरुण कलाकाराच्या कला-जीवनाची ही थोडक्यात ओळख...

...पाच–सात वर्षांचा अजय–चाळीचाळीं-तून, फारफार तर गल्लीमध्ये कार्यक्रम करणाऱ्या ऑर्केस्ट्रातून नाचतोय, नकला करतोय! – 'जिव्हाळा' ह्या चित्रपटाचे सहाय्यक छायालेखक श्री. दप्तरदार हे जिव्हाळ्याचे दिग्दर्शक राम गबाले ह्यांना अजयबद्दल सांगतात. गबाले ह्या छोट्या मुलामधले गुण अचूक हेरतात आणि एक लहानसा, पण तरी लक्षात रहाण्याजोगा रोल अजयला मिळतो...तो रुपेरी पडद्यावर अवतरतो.

बालनट म्हणून सुरुवात मराठी चित्रपटा-तून झालेला अजय वढावकर बालनट म्हणून पहिल्यांदा रंगभूमीवर पाऊल ठेवतो तो हिंदी नाटकात! 'रायगडाला जेव्हा जाग येते'च्या हिंदी रूपांतराच्या जवळपास शंभर प्रयोगांत 'राजाराम'ची भूमिका अजय करतो आणि मग मराठी रंगभूमीवर येतो...

वयाच्या दहाव्या–अकराव्या वर्षापासून रत्नाकर मतकरींच्या बालनाट्यातून अजय भूमिका करायला लागतो. त्याने मतकरींच्या जवळजवळ प्रत्येक बालनाट्यातून भूमिका केल्या आहेत. आजसुद्धा जेव्हा वेळ मिळेल तेव्हा तो बालनाट्यात आवर्जून काम करतो.

...'बालनाट्या'तून 'नाटका'मध्ये अजयचा प्रवेश झाला तो तात्यासाहेब शिरवाडकरांनी अनुवादलेल्या, इंडियन नॅशनल थिएटरनिर्मित 'बेकेट'पासून. अर्थात 'बेकेट'पूर्वी जयवंत दळवींचे 'सभ्य गृहस्थहो–' हे नाटक 'अत्रे थिएटर्स'तर्फे श्री. आत्माराम भेंडे बसवीत होते. त्या नाटकात बबन प्रभूंचा सब्स्टिटयूट अजय होता. लेखक दळवींचे म्हणणे होते की त्या नाटकात बबन प्रभूंनी काम करावे, तर तो रोल अजयने करावा असे दिग्दर्शक भेंडेचांच्या मनात होते. अखेर असे ठरले की ज्या वेळी बबन प्रभूंच्या तारखा जुळणार नाहीत, त्या प्रयोगात बबन प्रभूंऐवजी अजयने काम करावे!...परंतु काही कारणाने तेव्हा ते नाटक रंगभूमीवर आलेच नाही...

तर 'बेकेट' हे अजयचे पहिले नाटक. 'बेकेट'मध्ये 'थॉमस बेकेट' करणारे रवी पटवर्धन हे मतकरींच्या बालनाट्यांतून असत. पटवर्धन ह्यांनी सतीश दुभाषींना अजयचे नाव सुचवले–आणि अजयला 'बेकेट'मध्ये 'तिसरा हेन्री' ही भूमिका मिळाली... परंतु 'बेकेट' हे खऱ्या अर्थाने व्यावसायिक नाटक नव्हते.

...अजयचे पहिले आणि खऱ्या अर्थाने व्यावसायिक नाटक अखेर पुन्हा 'सभ्य गृहस्थहो–' हेच ठरले! जे पूर्वी 'अत्रे थिएटर्स'तर्फे यायचे होते ते 'सभ्य गृहस्थहो–' पुढे प्रत्यक्षात रंगभूमीवर आणले 'गोवा हिंदू असोसिएशन'ने. ह्या नाटकात प्रमुख भूमिका अजयलाच मिळाली...

ह्यानंतर मतकरींच्या 'पंचेचाळीस हेच लग्नाचं वय' ह्या नाटकात अजयला एक छोटा रोल मिळाला. 'सभ्य गृहस्थहो–' मधल्या मेनरोलनंतर 'पंचेचाळीस'मध्ये अगदी छोटा रोल स्वीकारणे म्हणजे जरा आश्चर्यच होते!–पण अजय नाटकाच्या बाबतीत मतकरींना गुरू मानतो. तो मतकरींच्या शब्दाबाहेर कधीच जात नाही.

...पण ह्या सर्व नाटकांपेक्षाही चांगले चालणारे नाटक अजयला मिळाले ते 'गोवा हिंदू'चे 'अखेरचा सवाल.' ह्या नाटकातही अजयची भूमिका लहानच होती; परंतु भूमिका लहान असली, तरी विजयाबाई

सुभाष सोनवणे

मेहता, प्रा. तोरडमल ह्यांच्यासारख्या ज्येष्ठ व श्रेष्ठ कलावंतांबरोबर काम करण्याचा मोह तो आवरू शकला नाही...

आणि 'सवाल'पासून अजयचे ग्रहच पालटलेले दिसतात. कारण, 'सवाल' चांगलं चाललं असतानाच अजयला 'नटसम्राट' ह्या प्रचंड नाटकात भूमिका मिळाली. भूमिका लहान असली तरी ती एका श्रेष्ठ नाटकातली भूमिका होती. 'नटसम्राट'मधला 'राजा' हा तसा 'लहान' आहे आणि त्याचबरोबर तो खूप 'मोठा'सुद्धा आहे. ही 'राजा'ची भूमिका अजयला मिळाली तीही आव्हान म्हणूनच! आधीच्या मोजून चारशेतीस प्रयोगांत 'राजा'ची भूमिका माधव आचवलने केली होती; चांगली केली होती. स्वतःची विशिष्ट प्रतिमा– 'राजा' हा एरवी लहान रोल असला तरी– चारशेतीस प्रयोगांतून माधवने निर्माण करून ठेवलेली होती आणि म्हणूनच ती भूमिका हे अजयला आव्हान होते. ते त्याने स्वीकारले... पेलले... आजही तो 'राजा' करतोय...

...एकीकडे अशी नाटकं चालू असतानाच दुसरीकडे चित्रपटांतही अजयची हळूहळू वाटचाल चालूच...

'अजब तुझे सरकार'मध्ये महत्त्वाची भूमिका अजयला मिळाली. राजा ठाकूर ह्यांच्यासारख्या मातब्बर दिग्दर्शकाच्या हाताखाली 'अजब तुझे'मध्ये अजयला काम करायला मिळाले, चित्रपटमाध्यमाबद्दल शिकता आले...

'जीद' ह्या हिंदी सिनेमात अजयला भूमिका मिळाली– तो सिनेमा लवकरच रिलीज होतोय! आणखी एक हिंदी सिनेमा अलीकडेच त्याला मिळालाय... चित्रण चालू आहे ..

सतीश दुभाषींसारख्या वेगवेगळ्या रंगांच्या आणि ढंगांच्या भूमिका आपल्याला करता याव्यात ही अजयची इच्छा आहे– त्यासाठी त्याची धडपड आहे... श्रीमती विजयाबाई मेहतांकडून नाटकाबद्दल जेवढं काही जास्तीत जास्त शिकता येईल, तेवढं तो शिकत असतो... अजय जो काय थोडाफार पुढे आलाय तो बालनाटयांतूनच. स्वतःची बालनाटयसंस्था काढायचं त्याचं स्वप्न आहे. लहान मुलांसाठी म्हणून जेवढी हवीत, तेवढी बालनाटये निघत नाहीत असे त्याला वाटते. त्याच्या मते बालनाटय हा प्रकार फारच उपेक्षित राहिला आहे. ह्या नाटयप्रकाराला योग्य ते स्थान आणि महत्त्व मिळणे अजयला अगत्याचे वाटते– त्यासाठी स्वतःच्या परीने तो आपला खारीचा वाटा उचलू बघतोय...

...'युसिस'मध्ये छोटया फिल्म्स् पाहिल्यावर लघुपट काढायचा विचार अजयलाही सुचला. त्याने एक लघुपट काढलासुद्धा!– ...अर्थात यशअपयश हा भाग प्रयत्नानंतरचा असतो. आधी अमुक धाडस, प्रयत्न करण्यामध्येच खरी कसोटी असते. त्या कसोटीला अजय उतरला. अंतिम निष्कर्ष-तात्पर्य वा परिणाम अजयला फारसे अनुकूल निघाले नाहीत...! पण त्याचा धडपडया, प्रयत्नवादी, उद्योगी स्वभाव त्याला नक्कीच फळ मिळवून देईल–! स्वतःच्या स्वप्नांना अजय प्रयत्नांनी साकारू शकेल! चित्रपट दिग्दर्शनाच्या क्षेत्रात सध्या अजयची उमेदवारी चालू आहे– तो उद्या कदाचित् त्या क्षेत्रात कर्तृत्व गाजवेलही... रंगभूमीवरही तो प्रामाणिकपणे धडपड करतो आहे. ती धडपड त्याचे रंगभूमीवरील स्थान अधिक स्थिर व अपरिहार्य करण्यास कारणीभूत ठरेलही...

# गोष्ट एका राजाची

पृष्ठ २ वरून

त्यातलाच हा निर्दय पॉलिनिसस रांडेनं दिलेलं कागदी फूल आपल्या बहिणीला अँटिगनीला भेट देण्याएवढा प्रेमळ आणि ते पाहून हरखून जाणारी ती तर त्याहून प्रेमळ! हे सारं राजा क्रिऑनच तिला उघड करतोय. कदाचित ह्या साऱ्यांत क्रिऑनचा खोटेपणा असू शकेल; पण ह्यातली कुठलीच घटना अँटिगनी नाकारताना दिसत नाही. म्हणजे एकदा त्यांच्या प्रेमाचा खोटेपणा स्वीकारल्यावर ते अँटिगनीच्या मरणाचं उदात्त कारण उरत नाही; पण त्याहून खरं हे की तिचं भावावर एवढं मोठं प्रेम असतं तर त्याच्या साऱ्या दुर्गुणांना तिनं निश्चित पाठीशी घातलं असतं. ती चवताळून राजावर तुटून पडली असती. म्हणजे दोन भावांमध्ये प्रेमाचा फरक करणारी अँटिगनीच खरं तर त्यापेक्षाही स्वतःवरच अधिक प्रेम करत असते आणि म्हणूनच हे मरण सुद्धा भावासाठी नसून तिच्यासाठीच स्वीकारलेलं असतं. म्हणूनच भावाच्या प्रेमाच्या खोटया भूमिकेवरही ती फार काळ उभी राहू शकत नाही.

मग अँटिगनी सुखाचं कारण पुढे करते. तिला राजा क्रिऑनसारखं बेगडी सुख नकोय. ते कोणाकडून ओरबाडून नको. पापातून नको. लाचारीनं नको. दिसेल ते चाटणाऱ्या कुत्र्यासारखं नको. तिला असं आयुष्यात सगळं काही पाहिजे आणि ते मिळायला तडजोड नकोय. मोबदला द्यायचा नाहीयेय आणि तसं विकत घेतलेलं सुखही नकोय. त्याच्यावर ती थुंकते. लहानपणचं निष्पाप सुंदर जग तिला हवंय. ते निष्पाप सुंदर सुख जर तिला मिळणार नसेल तर तिला जगायचंही नाहीयेय. खोटं सुख देणारं शरीर पण तिला नकोसं झालंय. आता सुखाचं सबळ कारण तिला सापडतं आणि त्याच्यापाशीच ती अडून रहाते आणि अखेर मरणही पत्करते. खरं तर

अँटिगनीच्या सुखाबिखच्या कल्पना चांगल्याच उदात्त आहेत; पण कशाचाच अर्थ तिला कळलेला नाही म्हणूनच ती क्रिऑनच्या सुखावर थुंकते. त्याला क्षणभर निरुत्तर करून सोडते. खरं तर कुठल्याच राज्यकर्त्याला सुख लाभत नाही. त्याच्या सुखापेक्षा समस्यास मोठ्या ठरतात. जबाबदाऱ्या अवजड असतात. त्याचं यश जसं मोठं तसं अपयशही मोठं असतं. म्हणूनच मुळात जे सुख ती क्रिऑनवर लादू पहाते—पाप करणे, खोटं बोलणं, प्रेत सडत ठेवणं, त्याकडे दुर्लक्ष करणं, स्वतःचा बाजार मांडणं या साऱ्यांतून अखेर आपलं सुख साधणं. खरं तर हे सारं करणंही क्रिऑनला सुखकारक ठरत नाही. सुखाकडे नेत नाही. या साऱ्या वास्तवातनं त्याला काही सुख मिळत नसतं. तर ती त्याच्या अगतिक कर्तृत्वाची केवळ परिणती असते. राजाचं दुःख हे जसं दुःख तसंच राजाचं सुख हे सुद्धा दुःखच असतं. अँटिगनीला मिळतं ते फक्त खोट्या पराभवाचं खोटं समाधान. आता तसं पाहिलं तर निष्पाप सुख तरी जगात कोणत्या जाणत्या माणसाला मिळतं? निखळ सुख आयुष्यात मिळणारच नाही. म्हणून मरणाऱ्या व्यक्तीचं मरण म्हणूनच हटवादी ठरतं. अँटिगनीच मरण म्हणून तितकंच आततायी ठरतं.

आता काही करून मरायचं एवढीच अँटिगनीची भूमिका; पण ती ठरवल्यावर जगण्याचा मोहही तिला सुटत नाही. जगणं आणि मरणं यांच्या सीमारेषेवर घुटमळताना म्हणूनच ही दुबळी स्त्री भेकडपणातच वावरते. मृत्यू पत्करण्याची पुरती निर्भयता ती मिळवू शकत नाही. म्हणूनच जगण्याची नाळ तोडण्याइतकी ती कठोरही होऊ शकत नाही. जीवनाची खरी ओढ तिला तोडता येत नाही म्हणूनच तेव्हाचं जग सुद्धा तिला रंगीत चित्रासारखं सुंदर दिसतं. गुलाबी, हिरवी, पिवळी पहाट तिला मोहवते. त्या वेळी तिला मृत्यूचीही भीती वाटते. मग ती दाई नॅनीच्या कुशीत आधार शोधते किंवा हिमॉनच्या मिठीत ती भीतीच विरघळवू पाहते. हुतात्मा बनू पाहणाऱ्या अँटिगनीला आपल्या कुत्र्याच्या पोरकेपणाची भीती वाटते तशीच हिमॉनच्या प्रेमाच्या सच्चेपणाचीसुद्धा अखेरच्या काळात शंका सलत राहते. ही सारी मनाच्या कमकुवतपणाची लक्षणं ठरतात. निर्भय होऊन मृत्यू कवटाळणाऱ्याला सारे पाश तोडावे लागतात. पार्थिव गोष्टीत रेंगाळण्याचा मोहही त्याला होत नसतो. अँटिगनीचं मरणच सामान्य असतं. शिवाय तिचं मरण स्वतःसाठीच आहे, दुसऱ्यांसाठी मुळीच नाही. तिच्या अहंतेचाच तो आविष्कार आहे. ह्या मृत्यूनं कोणाचं वाईट होत नसलं तरी कोणाचं विशेष भलंही होत नाही. आपल्या खोट्या हट्टासाठी आपलं सुंदर आयुष्य फुकाफुकी संपुष्टात आणणं हा केवळ भ्याडपणाच ठरतो. अँटीगनीला मरण्याचं बळ तिच्या हट्टातून येतं. शिवाय अँटिगनीमागे राज्यातलं कोणीच उभं राहिलेलं नाही. लोक नाहीत, समाज नाही. शिवाय त्यातून कोणतंच महान मानवी तत्त्वही पुरस्कारलं जात नाही. म्हणूनच अट्टाहासानं पत्करलेलं हे मरण एका अर्थी वांझच ठरतं.

या साऱ्यामागे भक्कमपणे उभा असतो तो राजा क्रिऑन. क्रिऑनचं काम तर फारच अवघड आहे. स्वतःचा क्षुद्र स्वार्थ सोडून, पडेल ती किंमत देऊन, लाटांशी झगडणारं एक बेवारशी जहाज त्याला समुद्रातून पार न्यायचंय. यादवीच्या काळात चालून आलेली ही अवघड जबाबदारी नाकारणं सोपं होतं. भ्याडपणाचं प्रतीक असतं. म्हणूनच ती खांद्यावर घेऊन त्याला पुढं जायचंय म्हणून त्याची भूमिका अवघड आहे. त्याचं कार्य रचनात्मक आहे. अँटिगनीच्या नकारात्मक मरणाएवढं ते सोपं नाही. म्हणूनच राजा क्रिऑनची भूमिका स्वच्छ वास्तववादी आहे. नव्या राजाला अव्यवहार परवडणारा नसतो. हुशार राजा नेहमीच काळाशी सुसंगत पावलं टाकतो. उचललेलं कार्य त्याला कणखरपणे पार पाडायचंय. एक सच्चा राजा म्हणून ते टिकवायचंय, वाढवायचंय. म्हणूनच यादवीनंतरच्या अस्थिर काळात तो विस्कळित व्यवस्था सुरळीत करू पाहतोय. स्थैर्य आणू पाहतोय. म्हणूनच ते आणण्यासाठी तो लोकांना जरब दाखवू इच्छितोय. देशद्रोह्याला सडत टाकून त्याच्या प्रेताच्या दुर्गंधीनं लोकांच्या नाकातले केस तो जाळू इच्छितोय. तसं झालं तरच लोक त्याच्या कायद्याला घाबरणार आहेत आणि स्थैर्य प्रस्थापित होणार आहे. अँटिगनीसारखं आकाशात भरकटणं म्हणूनच त्याला परवडणारं नाही. राजा क्रिऑनला जीवनाचं प्रेम नाही असं नाही. त्याचंही संगीतावर प्रेम आहे, तसाच जुनी दुर्मिळ हस्तलिखितं जमवण्याचा छंदही आहे; पण यात कोठेच न रेंगाळता तो आपल्याच वास्तववादी पायांवर खंबीर उभा आहे.

आता क्रिऑनला अँटिगनीबद्दल तसं कधी प्रेम नसलं तरीही आता मात्र त्याची खरी सहानुभूती तिच्याच मागे उभी आहे. एकीकडे ती त्याची रक्ताची भाची आहे म्हणून प्रेम, तर दुसरीकडे आपल्या मुलाची, हिमॉनची प्रेयसी म्हणून भावी सुनेबद्दलचं प्रेम तो उरात बाळगतोय. त्याच्या प्रेमाची, आस्थेची, बांधीलकी एकीकडे तिच्या रक्ताशी तर दुसरीकडे त्याच्या मुलाच्या भवितव्याशी आहे. ह्या प्रेमापोटीच तो तिला वाचवू पहातो अगदी तिला पकडून आणणाऱ्या सैनिकांच्या जिवाच्या बदल्यात. ह्या सहानुभूतीतूनच तिचा उपहास, उद्दामपणा, अपशब्द सारे अपराध तो मोठा होऊन पोटात घेतो आणि अखेरपर्यंत तिच्या मूर्ख मृत्यूपासून तिला परावृत्त करू पहातो; पण तिचं मरणाचं वेड तो आवरू शकत नाही. तिला मरायचंच असतं म्हणून मग तिचा मृत्यूही तो जितक्या कठोरतेनं घडवतो तितक्याच कठोरतेनं आपल्या मुलाच्या आणि राणीच्या आत्महत्येचा आघातही सहन करतो. कुटुंबाचा विनाश उघड्या डोळ्यांनी पाहून झाल्यावर हा कर्तव्यकठोर राजा त्याच संयत वृत्तीनं कारभारालाही सुरुवात करतो. अँटिगनीचा आग्रह, अहंकार, मूर्खपणापायी राजा क्रिऑन आपलं सर्व कौटुंबिक जीवन गमावून बसतो म्हणूनच त्या व्यवहारी पण संयमी राजाचा त्याग अखेर मोठा ठरतो. □ □


---


## अकरा कोटी गॅलन पाणी म्हणजे ?


चार लाख कोळसा खाण कामगार;
चार लाख खाण कामगार;
सतत मृत्यूच्या छायेत.



अपघाताचे वृत्त समजताच कोलीयरीत हलकल्लोळ माजला. शेकडो कामगारांनी खाणीला वेढले.




पंप बसवण्याच्या कामाला सुरुवात झाली !



संतप्त कामगार एरिया मॅनेजरचे ऑफिसवर चालून गेले. पण अपघात होताच अधिकाऱ्यांनी पलायन केले होते.

MANOOS ( Weekly )    100 Paise    Regd. No. PNC - 6



रशियन पंप बंद का पडला आहे ?

काण्ड्रा गावातील या विधवांना सरकार घरे देणार आहे ज्या घरांना फक्त छप्परच नसेल !

